
२२ जुलै १९६७ चाळीस पैसे

# माणूस



तुमचे जेवण

हाच माझा पगार

अण्णादुराई

इंजिनियर व्हायचं स्वप्न बाळगून आहे हा
तुमची पुरी करू शकाल त्याची इच्छा? जरूर
पुरी करू शकाल. त्यासाठी पंजाब नॅशनल
बँकेत एक मॉडिफाइड अकाउंट उघडा की झालं.

आपलं अकाउंट उघडा नि
त्याच्यासाठी बचत करायला
सुरवात करा. आमच्या रिकरिंग
डिपॉझिट स्कीमच्या आकर्षक व्याजाचा
उपयोगहि पाहा.

# पंजाब नॅशनल बँक

मला
इंजिनियर
व्हायचंय



समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : आठवा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** जून, २८

आम्ही नैरोबीला असताना आपला 'माणूस' साप्ताहिक झाला. त्या वेळी त्याचा दर्जा खालावू लागला आहे, असं मला वाटलं होतं, व तशी भीती मी आपल्याकडे व्यक्त केली होती. परंतु आपण नेटाने काम चालू ठेवलेत, हुशार व होतकरू मित्रांचं कडं आपल्याभोवती निर्माण केलंत व 'माणूस'चा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न केलेत याबद्दल मी व डॉक्टर आपले अभिनंदन करतो. प्रथम 'माणूस' मला नैरोबीला पाहायला मिळाला तेव्हादेखील तो इतका प्रभावी नव्हताच. त्या वेळी मी खोटी स्तुती केली नाही. इतकेच नव्हे तर सुधारण्याचा थोडा इशाराही दिला होता. आता मात्र 'माणूस' फारच चांगला निघतो. 'शिवसेना', 'दक्षिणायन', 'व्होल्गा' या लेखमाला फारच सुरेख आहेत. दिवसेंदिवस असेच यश लाभो, ही प्रार्थना.

**सुमति पटवर्धन**

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २.
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# ‘ शिवसेना ’ आणि मराठी माणूस

स. न. जुलै, ७

आपल्या लोकप्रिय ‘ माणूस ’ साप्ताहिकामधून प्रसिद्ध झालेली ‘ शिवसेने ’-वरील संपूर्ण लेखमाला वाचून झाल्यानंतर एका मुद्यावर थोडे लिहावेसे वाटते. पहिल्याच लेखामध्ये मराठी माणसाबद्दल काही मतप्रदर्शन केले आहे ते गैरसमजुतीवर आधारलेले वाटते व म्हणून ह्या पत्राचा प्रपंच ! मराठी माणूस आळशी, अकार्यक्षम, कामचुकार इत्यादी व तत्सम विशेषणांनी युक्त आहे, अशी (गैर) समजूत दुर्दैवाने मराठी माणूसच पसरवीत आहे. पूर्वी इंग्रज हा सर्वश्रेष्ठ व आपण पूर्णतया नालायक अशी समजूत पद्धतशीरपणे प्रसारित केली जात असे; आज ती ‘ इंग्रजी ’ माणसाची जागा, मराठी माणसाशी तुलना करण्यापुरती, मद्रासी दाक्षिणात्यांनी घेतली आहे आणि खुद्द आपण त्यांना मदत करीत आहोत. जणू काय प्रत्येक दाक्षिणात्य अत्यंत हुशार, इंग्रजीवर प्रभुत्व असलेला, वाटेल तितका वेळ, वाटेल ते काम करण्यास, केव्हाही, कितीही कमी पगारावर तयार, इ. इ. अल्पमोली, आखुडशिंगी, बहुदुधी गाईचा वारस आहे, हा प्रचार धादांत खोटा आहे. पूर्वी १९५० पर्यन्त जेव्हा ‘ डोमिसाईल ’ ची अट होती तेव्हा मुंबई राज्याची धुरा मराठी–गुजराथी यांनीच यशस्वी रीतीने वाहिली होती व ते राज्य अत्यंत प्रगतिपथावर असलेले समजले जात होते. त्या वेळी मराठी माणूसच मुंबई राज्य चालवीत होता. दाक्षिणात्य, मद्रासी इत्यादिकांचा इथे शिरकावही अपवादात्मक स्वरूपाचा होता, हे विसरता येणार नाही. शिवाय हे लोक येथे ‘ बाहेरून ’ आल्यामुळे त्यांना इथे काही ‘ पथ्ये ’ पाळावीच लागतात. ही पथ्ये म्हणजे नैसर्गिक गुण नव्हेत. मराठी माणूस स्वाभिमानी आहे. साहेबाला ‘ लोणी लावणे ’ (माफ करा स्पष्ट बोलण्याबद्दल.) त्याच्या रक्तात नाही. घड्याळाकडे तो पाहतो म्हणजे कामचुकार वा अकार्यक्षम नव्हे. याच्या उलट आपल्या एका मराठी सद्गृहस्थांनी दक्षिणेत एक कारखाना काढलेला आहे. त्या कारखान्याच्या मॅनेजरचा तिथल्या दाक्षिणात्य नोकरवर्गाबद्दलचा अनुभव इथल्यापेक्षा नेमका उलटा आहे. आपल्या गल्लीत कुत्राही ‘ शेर ’ असतो तसाच हा प्रकार आहे. तिथे दाक्षिणात्यांना— राहायला जागा नाही, खायला अन्न नाही आणि नोकऱ्या तर नाहीतच नाहीत. तेव्हा असे ‘ अडलेले ’ हे लोक मुंबईत येऊन जर सुरुवातीपासूनच

आपल्या 'धन्याशी' मुजोरीने वागू लागले, कामचुकारपणा करू लागले तर त्यांना येथे 'थारा' कोण देणार? पण त्यांच्या स्वभावाचे खरे अंतरंग ते इथे स्थायिक झाल्यावर जी मुजोरी व गुंडगिरी करतात त्यातच आढळत नाही का?

या संबंधात इतर प्रांत आम्हांला नोकऱ्यांत ८० टक्के प्रमाण मिळाले पाहिजे, असा हट्ट धरून अंमलात आणतात ते प्रांतीयवादी ठरू नयेत व महाराष्ट्र सर्वांना आसरा देत असूनही प्रांतीय ठरावा हे खरोखर दुर्दैवच होय.

**धुंडिराज ना. वैद्य**, कल्याण

**स. न.** जून, २८

नावीन्य, विविधता व अनेक विषयांची नावीन्यपूर्ण चिकित्सा करणारे आपले साप्ताहिक प्रत्येक अंकात जी प्रगती करीत आहे त्याबद्दल अभिनंदन. सदाशिव पेठकरांचा 'दिल्लीदरबार' व ग्यानबांची 'मुक्ताफळे' ही दोन सदरे अधिक विस्तृत द्यावीत; कारण त्यात केलेली चर्चा फारच मार्मिक असते. त्याचप्रमाणे भविष्याचे सदर बंद करावे. ते वाचून रिकाम्या मनाला उगाच क्लेश होतात. शेवटची एक सूचना म्हणजे 'माणूस'ची पाने तरी वाढवावीत किंवा किंमत २५ पैसे करावी. कारण ४० पैसे ही किंमत या महागाईच्या काळात परवडत नाही, व अंक घेतल्याशिवाय राहवत नाही.

**गणपत रेगे**, मुंबई.

**स. न.** जुलै, १

एक जुलैच्या अंकात समाप्त झालेली 'शिवसेने'वरील लेखमाला व चालू लेखमाला 'दक्षिणायन' या दोन्ही वाचल्या. दोन्ही विचारप्रवर्तक व अभ्यासपूर्ण वाटल्या. त्यामुळे हे प्रशंसापत्र लिहिल्यावाचून राहवेना.

आपल्या समाजात फुटीर प्रवृत्ती कशा बळावत आहेत, त्यांना जाणून बुजून अथवा अजाणतेपणी खतपाणी कसे मिळत आहे व याचा भविष्यकालातील संभाव्य परिणाम यांची समग्र माहिती मिळते. महाराष्ट्रीय माणूस हे लेख वाचून जागा होऊन स्वतःबद्दल गंभीरपणे विचार करू लागेल यात शंका नाही. दक्षिणेत जे घडत आहे त्याबद्दल प्रत्येक भारतीय नागरिकाला चिंता वाटते. आणि त्याचाच प्रारंभ महाराष्ट्रातही होतो की, काय ही शंका मनाला भेडसावते. 'शिवसेने'च्या चळवळीस योग्य दिशा न मिळाल्यास होणारे गंभीर परिणाम जाणवून देऊन 'माणूस'ने फार महत्त्वाची कामगिरी केली आहे. या दोन्ही समस्यांमधील विलक्षण साम्य ध्यानात घेऊन दोन्ही लेख एकाच वेळी देण्यात आपले संपादकीय कौशल्य दिसून येते.

**विनय कुबेर**, कराड

# आमची झोपमोड करू नका !

पाकिस्तानने आसाममधील आपली साडेसातशे बिघे जमीन जबरदस्तीने बळकाविली असल्याची बातमी परराष्ट्रमंत्री श्री. म. क. छागला यांनी गेल्या आठवड्यात लोकसभेत जाहीर केली. ही बातमी त्यांनी इतक्या थंडपणाने सांगितली की यात काही दखल घेण्याजोगा गंभीर प्रकार घडला आहे, असे त्यांना मुळी वाटलेच नाही. चीनसारख्या अण्वस्त्रधारी राष्ट्राची गोष्ट सोडाच; पण पाकिस्तानसारखे आपल्या मानाने दुबळे असलेले राष्ट्र बिनदिक्कतपणे आपला भूप्रदेश ताब्यात घेते आणि यात काही फार गैर घडलेले नाही अशा थाटात आपले परराष्ट्रमंत्री ही बातमी सांगतात हा साराच प्रकार इतका संतापजनक व आपल्या राष्ट्रीय गलथानपणाचा निदर्शक आहे की त्याबाबत पुनःपुन्हा लिहावयास लेखणीलाही उत्सुकता वाटत नाही !

परराष्ट्रमंत्री ही बातमी सांगत असताना काँग्रेस सदस्यांचे चेहरेही इतके मख्ख होते की, त्यांनाही परराष्ट्रमंत्र्यांप्रमाणेच पाकिस्तानकडून गंभीर प्रकार घडला आहे, असे मुळीच वाटले नाही. बरे, केवळ पाकिस्तानने आपला भूभाग जबरदस्तीने बळकावला आहे एवढे सांगूनच परराष्ट्रमंत्री थांबले नाहीत. ते पुढे असेही म्हणाले की, हा प्रदेश तूर्त पाकिस्तानकडेच राहू देण्यास भारत सरकारने मान्यता दिलेली आहे. एवढी क्षुल्लक (!) माहिती सांगितल्यानंतर श्री. मधू लिमये, श्री. सुरेंद्र मोहन बानर्जी, श्री. बलराज मधोक प्रभृति, विरोधी पक्षीय सदस्य का संतापावेत याचाच परराष्ट्रमंत्र्यांना राग आला. " आम्ही हा प्रदेश काही कायमचा देऊन टाकलेला नाही, " अशी प्रौढी सांगून छागलासाहेबांनी विरोधी पक्षीयांच्या संतापाबद्दल आपली नाराजी व्यक्त केली. म्हणजे काय गंमत आहे पाहा ! पाकिस्तानने काहीही कारण नसताना आपली कुरापत काढून आपला भूप्रदेश बळजबरीने जिंकला, याबद्दल त्याच्यावर रागावण्याऐवजी किंवा एका मामुली शेजारी राष्ट्राच्या उन्मत्त वर्तनाला पायबंद घालण्याचे आपल्यात सामर्थ्य नाही, याबद्दल शरमेने मान खाली घालण्याऐवजी परराष्ट्रमंत्री दटावत होते, कोणाला बरं ? आपल्याच लोकप्रतिनिधींना ! त्यांना म्हणे सभागृहात कसे वागायचे हेच माहीत नाही. मला तर असे वाटते की, पाकिस्तानने आपला काही भूभाग जबरदस्तीने जिंकला आहे, असे परराष्ट्रमंत्र्यांनी सभागृहात व्यक्त केले तेव्हा सर्व सदस्यांनी टाळ्या

वाजवून आपले अभिनंदन करावे, अशी त्यांची अपेक्षा असावी. एरवी छागलांसारखा प्रसिद्ध न्यायपंडित विरोधकांच्या शाब्दिक हल्ल्यावर एवढा संतापला नसता.

अशी अपेक्षा करण्यात छागलामियांचे काही चुकले असे जे मानीत आहेत ते मानोत बिचारे, पण मला तरी त्यांची अपेक्षा सर्वस्वी वाजवी वाटते. एकतर साडेसातशे बिघे म्हणजे काही फार मोठा भूमाग नव्हे की, त्याबद्दल मधू लिमये यांनी तावातावाने बोलावे ! अहो, भूदानाचा आणि ग्रामदानाचा पुरस्कार करणारा आपला हा देश. पाकिस्तानला आपण साडेसातशे बिघ्यांचे दान केले असे मानून भूदानाचे पवित्र कृत्य केल्याबद्दल सरकारचे अभिनंदन करावयाचे की हेम बरुआंसारखा हा प्रदेश परत केव्हा मिळविणार असला चावट प्रश्न विचारावयाचा ! बरे, त्यातून आपली परंपरा कोणती याचा काही विचार करावा की नाही. अशोक, बुद्ध, अकबर ही आपली राष्ट्रीय परंपरा आहे, असे पंडित नेहरूच नव्हते का नेहमी सांगत ? मग शेजाऱ्याने कुरापत काढली म्हणून आपण संतप्त व्हावे, हे आपल्या या पंडित नेहरूप्रणीत राष्ट्रीय परंपरेशी कितपत जुळते बरे, याचा सुरेंद्र मोहन बानर्जी, बलराज मधोक प्रभृतींनी विचार करावयास नको होता का ?

## क्षुल्लक प्रश्नांचा गाजावाजा

मंडळी, आपल्या देशापुढे किती बिकट प्रश्न उभे आहेत याची तुम्हांला, काही कल्पना आहे का ? आणि तुमचे आपले पाकिस्तानने प्रदेश जिंकल्याचेच तुणतुणे चालू आहे. अहो, संस्थानिकांना तनखे द्यायचे की बंद करायचे हा राष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न. म्हणूनच तर काँग्रेस महासमितीच्या बैठकीत त्यावर दिवसभर चर्चा झाली. ' सरंजामशाहीचे हे अवशेष खणून काढा, ' असे मोहन धारिया यांनी वीरश्री-युक्त उद्‌गार काढले ते काय उगाचच का ? हा झाला एक महत्त्वाचा प्रश्न. शिवाय सर्वसाधारण विमाव्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करावे की नाही, हा प्रश्नही– किती महत्त्वाचा आहे हे तुम्हांला कळणार नाही. आमचे जगजीवनराम बाबू यांना तर बिहारमधल्या दुष्काळापेक्षा हा प्रश्न जिव्हाळ्याचा वाटला व म्हणून तर ते या विषयावर पोटतिडिकीने बोलले. बिहारमधला दुष्काळ काय आज ना उद्या संपेल. बरे, मधल्या काळात उपासमारीने काही माणसे मरण पावली तर त्यात काय बिघडले ! नाही तरी उपोषण करून आत्मत्याग करण्याची या देशाची परंपराच आहे ! जे दुष्काळात उपाशीपोटी मेले त्यांनी राष्ट्रीय परंपरेचे पालन केले, असे फारतर कौतुकाने म्हणावे.

जी गोष्ट दुष्काळाची तीच परकीय आक्रमणाची. काही वेडगळ लोक म्हणतात की, नक्षलबारीमध्ये चिनी हस्तकांचे उपद्‌व्याप चालू आहेत. असतील चालू ! पण त्यांत ओरडण्याजोगे किंवा मंत्र्यांची झोप उडविण्याजोगे काय आहे ? मागेही चीन एकदा येऊन गेला होताच की ! त्या वेळी नाही का त्याने आपण होऊन माघार घेतली ! मग या वेळेलाच चिनी आक्रमणाचा बागुलबुवा कशासाठी निर्माण

करायचा. अहिंसा आणि जागतिक शांतता यांची तहान लागलेल्या या देशाने आपल्या राष्ट्रीय शिकवणुकीला स्मरून खरे म्हणजे असे सांगायचे कीं, ' माओबाबा, नक्षलबारी पुरेल का ? नाही तर असनसोल घे. '

ते चीनचेही जाऊ द्या. पूर्व सीमेवर म्हणे मिझो आणि नागा या जमातींनी भारत सरकारविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला आहे. नागाप्रदेश किंवा मिझो टेकड्या या भागात सैन्य बरोबर घेतल्याशिवाय जाण्याची एकाही भारतीय अधिकाऱ्याची छाती नाही अशी आजची तेथली परिस्थिती आहे. असेल हे सारे खरे. पण म्हणून त्याबद्दल काळजी करण्याजोगे काय आहे हे आम्हांस समजत नाही. त्यामानाने अरब राष्ट्रांवरील इस्रायलसारख्या दुष्ट राष्ट्राचे आक्रमण हा आपला आणखी एक जिव्हाळ्याचा प्रश्न. खरोखर इस्रायलसारखे राष्ट्र नष्टच झाले पाहिजे. त्या इस्रायलच्या मोझे दायानने कोणता भयानक गुन्हा केला ते माहीत आहे ना ? अहो, त्याने आपले राष्ट्र जिवंत राहावे म्हणून शत्रूवर हल्ला केला. केवढे हे अघोरी कृत्य ! अशा या इस्रायलला शिक्षा व्हावी म्हणून मागणी करण्यासाठी छागलासाहेब उडत उडत न्यूयॉर्कला गेले. यास म्हणतात तत्त्वनिष्ठा. आता कोणी म्हणेल की, ईजिप्त जाओ खड्डयात, नाहीतर इस्रायल जाओ समुद्रात. आपल्याला काय करायचे आहे ! मंडळी, तुमची ही संकुचित वृत्ती आमच्या उदारहृदयी भारत सरकारला साफ नामंजूर आहे ! आपल्या अडचणींचा बाऊ करण्याची कोती वृत्ती टाकून दिली पाहिजे. म्हणे चीन आणि पाकिस्तान, नागा बंडखोर आणि डावे कम्युनिस्ट देशाच्या स्वातंत्र्यास आणि सार्वभौमत्वास आव्हान देत असताना व्हिएटनाममध्ये काय होतंय आणि पश्चिम आशियात कोण मरतंय याची चिंता कशाला करावी ? छे: छे: आपले लोक एवढे संकुचित मनोवृत्तीचे आहेत म्हणूनच या असल्या कटकटी निर्माण होतात. अखेर आक्रमण काय किंवा स्वातंत्र्यरक्षण काय सारे मनाचे भ्रमच आहेत ना !

लोकांना पोटापुरते खायला मिळेल की नाही, देशाचे शत्रूंपासून रक्षण होईल की नाही या असल्या क्षुद्र आणि क्षुल्लक प्रश्नाबाबत ज्यांना वेळ वाया घालवावयाचा असेल त्यांनी खुशाल तसे करावे. आमची काही ना नाही ! पण आमचे भारत सरकार मात्र ईजिप्तच्या जनतेला खायला मिळत आहे की नाही याची चिंता करणार आणि उत्तर व्हिएटनामच्या स्वातंत्र्याचे रक्षण कसे होणार याच काळजीत दंग असणार. शांती, अहिंसा, विश्वबंधुत्व यांचाच आमच्या सरकारला ध्यास लागला आहे. ती आमची राष्ट्रीय परंपरा आहे. थोरांची शिकवण आहे. मग आमच्यावर विरोधक कसलेही खोटेनाटे आरोप करोत.

आम्ही आमच्या परंपरा-पालनात दंग आहोत. शू: ! आमची झोपमोड करू नका. कारण झोपमोड करणाऱ्याला कोणते प्रायश्चित्त घ्यावे लागते माहीत आहे ना !

**सदाशिव पेठकर**

# उर्दू वार्ता

## पुण्यातील मुस्लिमांची अरबांना आर्थिक मदत

दि. ४–७–६७ रोजी पुण्यातील बावाजान चौकामधील इस्लामिया स्कूलच्या हरुन हॉलमध्ये 'हिमायती ? अरब रिलिफ कमिटी 'च्या विद्यमाने एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात स्थानिक व पर-गावच्या प्रतिष्ठित मुस्लिम कार्यकर्त्यांनी भाग घेतला होता. वक्तव्ये केली होती, त्याचा वृत्तान्त 'उर्दू अखबार' (पुणे) ने खालीलप्रमाणे दिलेला आहे.

"मुंबईचे मौलाना मकसूद अहमद तुर्कीसाहेब म्हणाले, "इस्रायलने अरब राष्ट्रांवर जे आक्रमण केले आहे, तो समस्त मानवतेवरच हल्ला आहे व म्हणून अरबांच्या मदतीला धावणे मानव म्हणूनही आमचा धर्मच आहे."

'जमाते उलेमा–ए–हिंद 'चे जनरल सेक्रेटरी श्री. मौलाना असद मदनी

हिदायतखान

२२ जुलै १९६७

म्हणाले, "युरोपियन राष्ट्रे, विशेषत: ब्रिटन, अमेरिका–सिलेवी युद्धाचा बदला घेण्यासाठी अरबांविरुद्ध दंड थोपटून उभी आहेत. ज्यूविषयी त्यांना इतकी 'आत्मीयता 'वाटण्याचे कारण खरं म्हणजे ही सूडाची भावना आहे. शिवाय जॉन्सन व गोल्डबर्ग हेच खुद्द ज्यू आहेत.

जेरुसलेमसारखे आमचे पवित्र क्षेत्र इस्रायलच्या ताब्यात गेलेले आहे. तेव्हा आम्ही आता केवळ अरबांच्या धर्मभ्रष्टता वा सुखासीनतेवर तोंडसुख घेण्यात वेळ दवडण्यापेक्षा काहीतरी विधायक कार्य केले पाहिजे ! त्यांच्या संकटप्रसंगी कोरडी सहानुभूती दाखवून इतिकर्तव्यता संपत नाही. प्रत्यक्ष साहाय्याची त्यांना आता जरुरी आहे. परंतु दुर्दैव असे की, प्रत्यक्ष मदत तर दूरच राहिली, उलट, आमची काही उर्दू पत्र त्यांच्यावर टीका करण्यात धन्यता मानीत आहेत.

खरं म्हणजे उर्दू पत्रांनी–किमानपक्षी मुस्लिम मालकीच्या उर्दू पत्रांनी–तरी अरबांना मदत करण्याच्या बाबतीत पुढाकार घ्यावयास हवा. त्यांच्याविषयी हेतुपुरस्सर पसरविण्यात येणाऱ्या अफवांना शह देण्यासाठी आपल्या पत्रांमधून आघाडी उघडावयास हवी. गैरसमज दूर करावयास हवेत."

नंतर त्यांनी संकटग्रस्त अरब राष्ट्रांना मन:पूर्वक मदत करण्याचे पुण्यातील मुसलमानांना आवाहन केले.

आणि आश्चर्य असे की, अवघ्या चार तासांच्या अल्पावधीत केवळ मोमीनपुरा व गंजपेठ येथून १००० रुपये जमवण्यात आले. त्याची औषधे वगैरे अरब राष्ट्रांकडे रवाना केली जाणार आहेत. 'कुरेशी' समाजातील हनीफ पैलवान यांनी आपल्या आठवड्याच्या बाजाराची कमाई सुमारे ५०० रुपये देण्याचे जाहीर केले. तसेच उपस्थित लब्धप्रतिष्ठित मुस्लिमांनी प्रत्येक १००–१५० रुपयांच्या रोख रकमा तत्काळ दिल्या.

यापूर्वी याच स्तंभातून अरब–इस्रायलविषयीच्या भारतीय मुस्लिमांच्या भूमिकेविषयी चर्चा केल्याचे वाचकांना स्मरत असेल. मध्यंतरी आचार्य अत्र्यांच्या 'मराठा' दैनिकात भारतीय मुस्लिमांच्या समस्यांचा नि:पक्षपाती व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विचार करणारे एक व्यासंगी साहित्यिक श्री. हमीद दलवाई यांनी दोन लेख लिहून या विषयावर प्रकाशझोत टाकला होता.

ज्यूंसारख्या अल्पसंख्याकांच्या इस्रायल या राष्ट्राचे अस्तित्व न मानणे वा त्यांना नामोहरम करण्याच्या वल्गना करणाऱ्या अरबांना पाठिंबा देणे म्हणजे भारतीय मुस्लिमांनी भारतातील आपले अस्तित्वही धोक्यात आणणे, स्वत:हून स्वत:च्या पायावर दगड पाडून घेणे होय, असाच अभिप्राय श्री. दलवाईंनीही आपल्या लेखामधून व्यक्त केला होता, त्याचा इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

●

# मुक्ताफळे



## ☐ परिटाचे गाढव !

"एका वळणावर, डोक्यावर मैल्याचे टोपले वाहत असता, तो उद्ध्वस्त मानवी पिंड मला दिसला ! गुंडांचे वार झेलताना आणि झेपावणाऱ्या वाघावर गोळी घालताना, न आलेला माणसातल्या भीतीचा काटेरी अनुभव त्या क्षणी मी घेतला.–"

–सुप्रसिद्ध समाजसेवक बाबासाहेब आमटे यांना घडलेले हिंदू समाजातील अस्पृश्यतेचे हे व्याकूळ करणारे दर्शन आहे.

हिंदू समाजरचनेतील या कलंकाविरुद्ध एकनाथांपासून अगणित विभूती बंड करून उठल्या. महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, पू. आप्पासाहेब पटवर्धन, साने गुरुजी, हे या पिढीने पाहिलेले या पंढरीचे काही स्पृश्य वारकरी.

समाजातील बहुसंख्येने मलमूत्र निर्माण करावे ही रचना हिंदूसमाजरचनेवरील कलंक होय, यात शंका नाही. परंतु बाबासाहेब आमटे यांनी पाहिलेल्या भंग्याच्या डोक्यावरील मैल्याच्या टोपल्यात गावातील फक्त हिंदूंचा मैला होता की गावातल्या ख्रिश्चन, मुसलमानांचाही होता ? ख्रिश्चन किंवा मुसलमान समाजाने विसर्जित केलेले मलमूत्र, हिंदू समाजामधील याच कलंकित भंग्याने आजवर वाहिले असताना, हा कलंक फक्त हिंदू समाजाचा समजण्यात येतो तो कसा काय हे आम्हांला समजलेले नाही ! ही सगळी व्यवस्था दोषांसह हिंदू समाजाच्या माथी मारून या दोन धर्मीनी काय फक्त घाण करण्याचाच मक्ता घेतला आहे काय ? आमचे म्हणणे अस्पृश्यता हा फक्त हिंदू समाजावरील कलंक असेल तर भारतातल्या या दोन्ही परधर्मीयांनी आपली स्वतंत्र व्यवस्था करावी !

असो. हा कलंक कागदोपत्री नष्ट झाला असला, तरी समाजात अजून अस्पृश्य समाजाला बुद्धावस्थेतही त्रास होतो. या वर्गाला बुद्धवासी झाल्यानंतरही सरकारने सर्व शैक्षणिक सवलती चालू ठेवल्या आहेत, ही अतिशय चांगली गोष्ट आहे.

अस्पृश्य असणे हे दुर्दैव आहे, तसेच मागासलेल्या जातीत जन्माला येणे हे-

देखील दुर्दैव होय. या जातींत, शिक्षणाचा ओघ खेळलेला नसल्याने त्यांना सरकारने शैक्षणिक सवलती देणे भाग आहे.

अर्थात 'यावच्चंद्रदिवाकरौ' ही व्यवस्था चालू ठेवण्याची सरकारची इच्छा नसून कालांतराने या सवलती रद्द होऊन, फक्त गुणांच्या बळावर जातिपातीचा विचार न करता, सर्वांना प्रगतीची खऱ्या अर्थाने समान संधी लाभेल अशी अपेक्षा आहे.

परंतु आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वीस वर्षांनी नव्या नव्या जातींनी– 'आम्हांला मागासलेले म्हणा !' असा आग्रह आता सुरू केलेला पाहून आमची झोप उडाली आहे. हे काय गौडबंगाल आहे ? परवा पुणे येथे मलिन कपडेवाहक परटांच्या जातीची सभा झाली व त्यांनी सरकारला विनंती केली,– "आम्हांला मागासलेली जात ठरवा. आंध्र, मद्रास व महाराष्ट्र सोडून बाकी सर्व राज्यांत परीट मागासलेले समजतात. आम्हांलाही मागासलेल्या जातीच्या शैक्षणिक सवलती द्या !"

सवलत आणि सूट, संधी आणि साधकपण यांत काहीतरी गफलत झालेली दिसते. कलंकित स्पृश्य समाजात कुठून जन्माला आलो असे वाटावे अशी परिस्थिती सरकारने इतर विद्यार्थ्यांची करून टाकली आहे ! ज्या शिक्षणक्रमांना प्रवेश मिळण्यासाठी किमान ६० टक्के गुण प्रवेश–परीक्षांना मिळवावे अशी अपेक्षा असते, त्या परीक्षेत ४० गुणही न मिळालेल्या विद्यार्थ्यांना केवळ ते मागासलेले आहेत वा दलित आहेत म्हणून प्रवेशाची राखीव कुरणे सरकारने निर्माण केली आहेत. उत्तम विद्यार्थ्यांचे हे खच्चीकरण पद्धतशीर चालू असल्याने, "आम्हांला मागासलेली जमात म्हणा," असा आक्रोश नव्या नव्या जाती आता करू लागल्या आहेत.

पुणे विद्यापीठाने नियम केला की, पदव्युत्तर संशोधनासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना किमान दुसऱ्या वर्गात पदवी–परीक्षा उत्तीर्ण झाली पाहिजे. झाले ! पुणे कॉर्पोरेशनमध्ये कुणा बाबासाहेब चव्हाणांनी ठराव आणला– "ग्रामीण विद्यार्थ्यांना ही अट जाचक आहे. विद्यापीठाने ही अट काढून टाकावी."

बाबासाहेब, हे संशोधन आहे. बुद्धी नसताना विद्यार्थी संशोधनाला बसवले तर शोध कसे लागतील आणि अदमासे केव्हा लागतील ? बाबासाहेब, तुमच्या आमच्या समजशक्तीत एवढी तफावत कशी काय बुवा ? ग्रामीण लेखक पुढे आले ते त्यांच्या भिकार गोष्टी सवलतीने छापल्या म्हणून नाहीत. चांगले लिहून ते पुढे आले.

माफ करा. चूक झाली बाबासाहेब ! तुमचे बरोबर आहे. अनंत वर्षे संशोधन करण्याची आणि अनेक वर्षे डॉक्टरीसारख्या शिक्षणात घालवण्याची सवलत व संधी मागासलेल्या व ग्रामीण विद्यार्थ्यांना दिलीच पाहिजे ! आपल्या सरकारचा तोच हेतू दिसतो !!

हळू हळू आपला देश जगातला सर्वांत जास्त संशोधक व डॉक्टरीचे विद्यार्थी असलेला परंतु मागासलेला रोगिष्ट देश ठरेल, तेव्हा तुम्ही आम्ही नसू हे उभयतांचे भाग्य होय. परटाचे गाढव बाथरूममध्येच आपण घुऊ या !

## ☐ जाळ्यात गावला मासा !

उत्तर भारतात गेल्या निवडणुकीत हिंदूंनी काँग्रेसचा जो पाडाव केला त्याचे महत्त्वाचे कारण, जनसंघासारख्या पक्षाने गोवधबंदीचे भांडवल केले हे आहे. या बाबतीत काँग्रेस, प्रजासमाजवादी व कम्युनिस्ट यांचे एकमत आहे. गोवधबंदीसाठी पुरीच्या शंकराचार्यांनी उपोषण केले, दिल्लीत साधूंनी नंदराजावर गंडांतर आणले. अशा या काँग्रेसच्या मुळावर आलेल्या प्रश्नाचा विचार करण्याकरता, केंद्र सरकारने १२ जणांची एक समिती नेमल्याचे नुकतेच जाहीर केले आहे. यामुळे 'काँग्रेस जसा दाता नहीं, लेकिन जुतेबगैर देता नहीं !', 'इंगा दाखविला की, काँग्रेसवाले नांगी टाकतात' अशी आमच्या थोर नेत्यांची हेटाळणी करायची असेल त्यांनी खुशाल करावी. आम्हांला तर काँग्रेस सरकारने हा धूर्त पवित्रा टाकला आहे, असे वाटते. या समितीच्या सभासदांत पुरीचे शंकराचार्य व गोळवलकर गुरुजी यांना नेमण्यात आले आहे. 'गोवधबंदी करा' असे रान उठविणाऱ्या या मंडळींचे पाय, सरकारने त्यांच्याच गळ्यात टाकले आहेत. काँग्रेस सरकारने या मंडळींना सवालच टाकला आहे की, सगळ्या गाई व गोवंश वाचवून कारभार कसा चालवायचा ते सांगा ! या सगळ्या भाकडमाता ठेवायच्या कुठे ? या गाईंना चरायला न्यायला स्वयंसेवक लागतील ते कोण देणार ? शंकरदेखील एकच नंदी पाळतो. गाई गावात ठेवतो. पसारा नको. शंकराचार्यांना आता हे सांगावे लागेल की, गाईच्या दुधाचा चहा लोक पितील का ? आर्थिक प्रश्नाच्या भेंडोळ्या सुटू लागल्या की, ही भगवी मंडळी त्यात अचूक अडकतील, या हिशेबाने यांना या समितीवर घेण्यात आले आहे. इतक्या सगळ्या अडचणींतून मार्ग काढून संपूर्ण गोवधबंदी करा असा निष्कर्ष, श्री. ए. के. सरकार हे बंगाली माजी सरन्यायाधीश या समितीचे अध्यक्ष नेमलेले असतानाही समितीने काढलाच, तर समितीचे ऐकायला सरकार बांधलेले थोडेच आहे ! गोळवलकर गुरुजी किंवा पुरीचे शंकराचार्य यांनी सरकारकडे असा आग्रह धरला, की आमचे निष्कर्ष जसेच्या तसे स्वीकारणार असाल तरच या समितीवर काम करू, तर गोष्ट वेगळी होती. असा आग्रह त्यांनी धरलेला नाही. जाळ्यात देवमासे अडकले आहेत !

— ग्यानबा



समीर

# विचार वारे

## □ रशिया–चीन संबंध

जगातील बहुतेक सर्व देशांशी साम्यवादी चीनचे संबंध अधिकाधिक बिघडत चालले आहेत. त्यात विशेष लक्षात येणारी गोष्ट म्हणजे साम्यवादाचे माहेरघर असणाऱ्या रशियाशीही लाल चीनचे वैमनस्य दिवसेंदिवस वाढत चालले आहे. भारतात नुकत्याच येऊन गेलेल्या पत्रकार मंडळाचे प्रमुख आसनबेक टोकोंबीव्ह यांनी याबद्दल एका पत्रकार परिषदेत काही माहिती दिली. लाल चीनने रशियाची खूप वेळा कुरापत काढली आहे व रशियन सरहद्दीजवळ बरेच सैन्यही गोळा करून ठेवले आहे. तरीदेखील चीन रशियावर हल्ला करण्याची शक्यता दिसत नाही, कारण चीनचे लष्करी सामर्थ्य रशियाच्या सामर्थ्यापेक्षा खूपच कमी आहे.

इसवी सन १९६३ मध्ये सिंक्यांगमध्ये राहणाऱ्या व किरगीझ वंशाच्या बऱ्याच लोकांना रशियाला परतण्याची इच्छा होती; कारण सिंक्यांगमध्ये त्यांना काहीच काम मिळत नव्हते. त्यांच्यापैकी ज्यांच्याजवळ सोव्हिएट पासपोर्ट होते त्यांना परत येऊ देण्यात आले, परंतु ज्यांच्याजवळ सोव्हिएट पासपोर्ट नव्हते त्यांना सरहद्द ओलांडू देण्यात आली नाही. आता सिंक्यांगमधली परिस्थिती इतकी बिघडली आहे की त्या लोकांचे जीवन असह्य झाले आहे.

रशिया व चीन यांच्यांतील वैमनस्य नष्ट करण्यासाठी रशियाने चिनी सरकारशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न बऱ्याच वेळा केला होता. परंतु चीनने तो धुडकावून लावला होता. उत्तर व्हिएटनामला रशियाकडून जाणारी लष्करी कुमक चीनने वाटेत रोखून धरली होती हे याचेच उदाहरण आहे. पण खरी कसोटी लाल चीन साम्यवादी देशांची एकजूट होऊ देईल की नाही यात आहे. अशी एकजूट चीनला अनिष्ट वाटते असे दिसते.

सोव्हिएट पत्रकार पाहुण्यांनी भारतीय वृत्तपत्रसृष्टीवरही काही विचार प्रकट केले.

भारतीय पत्रकारांत मतभेद बरेच दिसतात, पण ते व्यावसायिक दृष्टिकोनातून उत्पन्न झालेले नसून तात्त्विक विचारातून निर्माण झालेले वाटतात. भारतीय वर्तमानपत्रे जगातील महत्त्वाच्या घडामोडींची बातमी देण्याच्या बाबतीत आघाडीवर आहेत. भारताच्या आर्थिक समस्यांची चर्चा बहुतेक वृत्तपत्रांतून गंभीरपणे केलेली आढळते.

## □ " आर्गोनॉमिक्स "

कुठल्याही देशांत आर्थिक सुबत्ता यायची असेल तर तेथे औद्योगिक विकास होणे आवश्यक आहे असा सिद्धांत परवा एक ब्रिटिश उत्पादन–तज्ज्ञ डॉ. कॉटलेट यांनी भारत–भेटीत मांडला. हा विकास होण्यासाठी माणसांचा व साहित्याचा शक्य तेवढा चांगला उपयोग करून घेतला पाहिजे. आता कुठल्याही देशाला औद्योगिक क्रांती पटणार नाही व प्रगतशील देशाला तर मुळीच नाही. त्यामुळे उपलब्ध साहित्याचा सर्वांत सफळ उपयोग करण्याचा मार्ग शोधून काढणे हे महत्त्वाचे झाले आहे. अशा रीतीने कारखाना अधिकांअधिक उत्पादनक्षम होण्याची पद्धत तयार करणे हे एक शास्त्र असून त्याला 'आर्गोनॉमिक्स' म्हणतात. डॉ. कॉटलेट हे 'आर्गोनॉमिक्सचे' तज्ज्ञ आहेत. साध्या शब्दांत सांगायचं म्हणजे माणूस ज्या वातावरणात व परिस्थितीत उत्पादनकार्य करतो तिचा अभ्यास म्हणजेच 'आर्गोनॉमिक्स' असे म्हणता येईल. त्यांत शरीरशास्त्र व मानसशास्त्राचाही समावेश होतो. " आम्ही यंत्राकडून अधिक काम करून घेत नाही, तर ते चालविणारा माणूस समजावून घेण्याचा प्रयत्न करतो. हल्लींच्या काळास यंत्रयुग म्हणत असले तरी खरी मिस्त यंत्र चालविणाऱ्या माणसावरच आहे."

ब्रिटनमध्ये ' आर्गोनॉमिक्स 'चा भर लष्करी क्षेत्रावर नाही. तर उद्योगधंद्यांवर आहे, पण अमेरिकेत परिस्थिती निराळी आहे. मात्र दोन्ही देशांत कामकऱ्याला आपले काम अधिक चांगले करता येईल, अशी यंत्रसामग्री तयार करण्याचा प्रयत्न सतत चालू आहे.

काळ–काम–वेगाचे तंत्र ( टाइम अँड मोशन स्टडीज ) आता उपयुक्त राहिलेले नाही. कारण हल्लीच्या इंजिनियराला केवळ उत्पादनाचे तंत्र माहीत असून भागत नाही तर संघटना, आर्थिक व्यवहार आणि कामकरी वर्ग यांचीही पूर्वीपेक्षा अधिक माहिती असावी लागते. अशा रीतीने जुन्या कल्पना सतत बदलत आहेत.

प्रगतशील देशांना अधिक इंजिनियरांची व तंत्रज्ञांची आवश्यकता आहे याचे कारण एखादा देश औद्योगिक दृष्ट्या जेवढा मागासलेला असेल तेवढ्या प्रमाणात त्याने उपलब्ध मंडळींचा व साहित्याचा उपयोग सुसंगतरीत्या करणे अधिक निकडीचे ठरते. अशा देशांत मजूर स्वस्त असले तरी स्वस्त मजुरी ही उत्पादन–प्रक्रियेतील इतर आवश्यक गोष्टींची उणीव भरून काढू शकत नाही.

# राजधानीतील जनसंघ राजवटीचे पहिले १०० दिवस

मो. ग. तपस्वी

२५ फेब्रुवारी १९६७ ची संध्याकाळ.

दिल्लीतील वातावरण उत्कंठेने भरलेले होते.

तोच पाच-पन्नास लोकांचा थवा नाचत ओरडत निघाला,

" जीत गया भई जीत गया...
दीपकवाला जीत गया "

आणि या हर्षोत्सवाला महोत्सवाचे रूप आले. ठिकठिकाणी मिठाई वाटली गेली. दिल्लीत सगळीकडे आठवडाभर एकच एक घोषणा निनादत राहिली......

" जनता के सहयोग से,
दीपकवाले जीत गए..."
" बहनों के सहयोग से
दीपकवाले जीत गए... "

झोपडपट्टीतील लोकांच्या मिरवणुका निघाल्या, भांगडा नाचनाचून गोरगरीब अमीरउमराव कुणीही थकले नाही. हा आनंद सर्वांनाच झाला होता. त्यात दिल्लीकर बहुजनसमाज सामील झाला होता. फळभाज्या विकणारे, फेरीवाले, टांगेवाले, रिक्षावाले, तंदूरची दुकाने चालविणारे, सर्वच काही जनसंघाचे सभासद नव्हते. पण त्यांनी

जनसंघाला मत दिले होते आणि ते मत विजयी ठरले होते. काँग्रेसच्या कारभाराची वीस वर्षांची मिरासदारी राजधानी दिल्लीत समाप्त करण्याचा मान त्यांच्या मताने मिळवला होता. आणि २३ मार्चला तर दिल्लीत नवी दिवाळीच साजरी झाली.

होय. नवी दिवाळी ! महिनाभर चाललेल्या त्या विजयोत्सवाचा जणू तो सांगता समारंभच ! घरोघरी लोकांनी सार्वजनिक आरास केली होती, सुंदर गुढ्यातोरणे आणि मोठमोठे मांडव टाकले होते, आणि दिव्यांच्या झगमगटाने संपूर्ण दिल्ली शहराला एका उत्सवनगरीचे रूप आणून दिले होते. त्या दिवशी जनसंघाचा कारभार दिल्लीत रीतसर सुरू झाला होता. कान किटवणारी वक्तव्ये आणि भाषणे, पल्लेदार परंतु पोकळ घोषणा, ती नाटकी स्मिते आणि खोटी आश्वासने यांचा जमाना त्या दिवशी समाप्त झाला आणि नवे चेहरे, नवे रक्त, नवा जोम आणि नव्या आकांक्षा यांनी भारलेल्या तळमळीच्या कार्यकर्त्यांचा नवा कारभार त्या दिवशी सुरू झाला.

१ जुलैला त्या कारभाराला शंभर दिवस पूर्ण झाले. आज दिल्लीकरांत उत्सवी उल्हास, किंवा विजयाचा जल्लोष राहिला नसून, शांतपणे आत्मचिंतन करण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. पक्षभेद आता विरला आहे. पक्षाचा अभिनिवेषही आता संपला आहे. आता या कारभाराचे कठोर मूल्यमापन करणेच देशहिताचे आहे. जनसंघाला दिल्लीकरांनी निर्मळ कारभाराला आवश्यक इतके घवघवीत बहुमत दिले. त्या दिल्लीकारांना या पहिल्या शंभर दिवसांत जनसंघाच्या कारभाऱ्यांनी काय दिले ? निदान काय देण्याचा प्रयत्न केला ?

## दिल्लीचे यक्ष–प्रश्न

दिल्ली राजधानी असूनही येथे स्वस्त घरे दुर्लभ आहेत आणि याला कारण कॉलोनायझर या नावाची एक जातच येथे पूर्वीच्या राज्यकर्त्यांच्या डोळ्यांदेखत वाढली आहे. हे कॉलोनायझर म्हणजे आधुनिक शोषणकर्तेच ! चक्क बनवाबनवी करून अनधिकृत जमिनीवर खुशाल घरे बांधायला काढणारी ही मंडळी कुठे तरी सावध संरक्षण लाभत असल्याशिवाय असला अव्यापारेषु व्यापार करायला धजत असतील असे म्हणणे भोळसट आत्मवंचना होईल. अशा प्रकारे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवून ही मंडळी लाखो रुपये कमावतात आणि बिचारा मध्यमवर्गीय माणूस मात्र नाडला-नागवला जातो ! कारण त्याला हजारो रुपये लावल्यानंतर कळते की ती जमीनच अनधिकृत आहे म्हणून ! तोच प्रकार प्लॉट लिलावाला काढतानाचा. याच कॉलनायझर्सच्या टोळीतील कुणी ना कुणी लिलावातील बोली वाढवीत ९० ते १०० रु. चौरस वारपर्यंत नेऊन पोचेल अशी व्यवस्था बरोबर करीत असतो. मध्यम प्राप्ती-गटातील लोकांच्या निवासाकरता ही जमीन घेताना सरकारकडून स्वस्त दराने घेतली जाते. मग म्हणे तिचा विकास करून प्लॉट वगैरे पाडण्यात येतात. परंतु तो विकास–खर्च लावून ठरीव भावाने हवी त्याला जमीन

विकण्याऐवजी ही मंडळी त्यांचा लिलाव करतात. अशा प्रकारे लिलावात घेतलेली जमीन हातोहात दिडी-दुपटीने तिथल्या तिथे विकत घेणारे या कॉलनायझर्सचे दलाल तयारच असतात आणि या दुष्टचक्रात सापडलेल्या दिल्लीतील रहिवास-जमिनींच्या किमती भरमसाट वाढत जातात. हा प्रकार येथे गेली वीस वर्षे चालत आला आहे. काँग्रेस कारभारात यावर कागदी कारवाया पुष्कळ झाल्या पण किमती थोपवता आल्या नाहीत. यामुळे घरांची भाडीही भरमसाट वाढत गेली. आज दिल्लीत तुम्हांला घरे केव्हाही मिळतील, पण एका खोलीला शंभर रुपये मोजाल तर ! !

जनसंघ प्रशासनाने यावर उपाय म्हणून मध्यम प्राप्ती-गटातील लोकांसाठी रहिवास-जागांची लिलावी विक्री सरकारमार्फतच आरंभ केली आणि याचा परिणाम म्हणून ३०० चौरस फूट प्लॉट किती तरी स्वस्तात म्हणजे ४० रु. चौ. वार या दराने लोकांना मिळू लागले. गोरगरिबांसाठी घरे बांधण्याकरता सहकारी समित्यांना प्रोत्साहन देण्यात आले असून आता त्यांना फक्त २० रु. चौ. वार या भावाने जमिनी मिळू लागल्या आहेत. असे ३ हजार प्लॉट विक्रीस काढण्यात आले आहेत. काही प्लॉट तर नळविहिरी आणि सेप्टिक-टँक बसवून, तसेच ग्राहकांना देण्यात आले आणि बाकी विकास त्यांचेवर सोपविण्यात आला. याचा परिणाम म्हणून कित्येक भागात घरभाडी १५ ते २० टक्क्यांनी उतरली. जे काम गेल्या सात-आठ वर्षांच्या प्रयत्नांनी साध्य झाले नाही ते येत्या तीन-चार महिन्यांत साध्य होईल, अशी आशा निर्माण झाली आहे.

उन्हाळा आला रे आला की दिल्लीत वीज जायची, वीजकेंद्रात बिघाड व्हायचा, पाण्याची ओरड व्हायची, नळांतून नुसत्या कोरड्या शिट्या वाजायच्या. या सर्व गोष्टी कशा दिल्लीकरांच्या वळणी पडल्या होत्या ! पण यंदाचा उन्हाळा त्याला अपवाद ठरला ! पावसाळा सुरू झाला तरी यंदा नळांना पाणी राहिले. आणि यासाठी जनसंघाने काय केले ? काही नाही. दिल्लीला पाणी १२० मैल लांबून आणण्यात येत होते ते फक्त २० मैलांवरून वळवण्याची व्यवस्था करून पाहिली आणि तीत यश आल्याने आता ती व्यवस्था कायम करण्याचे ठरविले आहे. उन्हाळ्यात दिल्लीत दर माणशी दररोज ४० गॅलन पाणी मिळत राहिले आहे. आणि आता पहिल्या झटक्यासरशी करविलेल्या पाहणीअंती असे आढळले आहे की, यमुनेचे पाणी तीन मैलपर्यंत खेचून नेण्यासाठी दिल्लीच्या शेजारीच हरियाना राज्यात स्टोअरेज विहिरी बांधून पाणीपुरवठा आणखी सुधारता येईल.

दिल्लीतील जनसंघाच्या कारभाराची आणखी एक कसोटी लागली ती ही की, दरवर्षी दिल्ली प्रशासनातील शाळा-कॉलेजांतून प्रवेश मिळण्याची भयंकर वानवा पडत असते; ती जनसंघ-कारभार कशी कमी करतो ते पाहावे. जूनअखेरीस प्रवेशाची ही धांदल सुरू होते. यंदा धांदल झाली नाही. आम्हांला प्रवेश मिळाला नाही, अशा तक्रारी ऐकू आल्या नाहीत. काही ठिकाणी तर रांग जरा लांब होती

यापेक्षा त्रास झाला नाही, असे थर्ड क्लासमध्ये पास झालेल्या मुलामुलींचे पालक आपल्या मुलाला कॉलेजात प्रवेश मिळवून परतताना म्हणत असल्याचे मी ऐकले आहे.

यालाही एक तळमळीने पार पाडलेली योजना कारणीभूत आहे. ती अशी की, दिल्लीच्या बारा विभागांत नेबरहूड स्कूल्स काढली. त्या माध्यमिक शाळांना ठराविक हायस्कुले वाटून दिली आणि हायस्कुलांनाही काही कॉलेजे दिली. त्यामुळे पास होताच वरच्या शाळेत प्रवेशाची पालकांना हमी मिळाली आणि एक मोठीच अडचण दूर झाली. आणि प्रवेश न मिळाल्याने नाइलाजाने शेजारच्या प्रांतातील कोणत्या तरी कॉलेजात जाणारी उदयोन्मुख मुले दिल्लीतच आपल्या आई-वडिलांच्या छायेत आणि देखरेखीखाली शिकण्याची सोय झाल्याने मनोमन सुखावली, आणि सुखावले त्यांचे पालकही.

राहिला प्रश्न भाववाढीला आळा घालण्याचा. याबाबत मात्र जनसंघ कारभाराला फारसे यश आलेले नाही. परंतु त्याला या क्षेत्रात करता येण्यासारखेच मुळी फारसे नाही. कारण भाव वाढत आहेत केंद्र सरकारच्या अर्थनीतीमुळे, त्याच्या अंदाजपत्रकातील करवाढीमुळे! या दोन्ही गोष्टींवर दिल्ली प्रशासनाचे काहीही नियंत्रण नाही, परंतु तरीही त्याला जे काही करता येण्यासारखे आहे ते त्याने केल्यामुळे लोकांत एक प्रकारचे सुप्त समाधान आहे, आणखी वाव देण्याची आणि आणखी वाट पाहण्याची त्यांची तयारी दिसते आहे. कॉलोनायझर मंडळींच्या रॅकेटचा जसा वर उल्लेख केला तसे दिल्लीत भाजीपाला आणि फळफळावळ विकणाऱ्यांचेही एक रॅकेट आहे आणि ते मोडण्याचे तर राहो, अगतिकपणे ते वाढू देण्याचेच काम या पूर्वीच्या प्रशासनाने केले आहे. बागवानांकडून गाडीच्या गाडी भाजी किंवा पेटच्याच्या पेटचा फळे विकत घेऊन टाकायची, ती शीतागारात ठेवून बाजारात त्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करायची आणि माल दुर्मिळ म्हणून त्याचा भाव चांगला वाढवल्यावर शीतागारातून काढून तो विकून अमाप नफा कमवायचा असा या रॅकेटचा खाक्या गेल्या कित्येक उन्हाळ्यांत चालू असायचा! पण यंदाच्या उन्हाळ्यात हिरव्या भाज्यांचे भाव यापूर्वीच्या उन्हाळ्यांतल्या भावापेक्षा कमी राहिले आहेत. कारण जनसंघाने मार्चमध्ये कारभार हाती घेताच हिरव्या भाज्या शीतागारात ठेवण्याची मनाई करणारा हुकूम काढला.

खवा आणि खव्याचे पदार्थ दिल्लीत तयार करण्यावर आणि बाहेरून दिल्लीत आणण्यावर प्रतिबंध घातल्यामुळे दुधाचे भाव आवाक्यात राहिले आहेत. आजही दिल्ली मिल्क स्कीमचे दूध ८४ पैसे आणि खासगी गवळ्यांकडचे १-०० ते १-१० रु. लिटर मिळत आहे. याचबरोबर रेशन कार्डावर ज्यांना साखर नको असेल त्यांनाही ती देऊन काळ्याबाजारात दिडी-तिडीने विकण्याचे प्रकाराला आळा घालण्यासाठी कार्डावरची साखर सोडणाऱ्यास साखरेच्या अडीचपट कणिक देण्याचा निर्णय लागू

करण्यात आला आहे. यामुळे गोरगरीब आपली साखर सोडून कणिक घेण्याकडे झुकू लागले आहेत. तसेच खेडेभागातून साखरेचा कोटा पन्नास टक्क्यांनी वाढवला आहे. रवा आणि सपीटदेखील रेशन कार्डावर देण्याची व्यवस्था झाल्याने त्यासाठीही जास्त भाव मोजण्याची आवश्यकता राहिलेली नाही.

## बस वाहतूक

कारभार हाती घेतल्याबरोबरच मुख्य कारभारी विजयकुमार मल्होत्रा यांनी बससाठी लागणाऱ्या रांगा कमी करण्याचा प्रयत्न आपण करू असे सांगितले होते. या शंभर दिवसांत ते तसा प्रयत्न करीत असल्याचेच नव्हे तर या रांगा हलकेहलके कमी होऊ लागल्याचेही प्रत्ययाला येऊ लागले आहे. त्यासाठी जाहीर टेंडरे माग-वून त्यांनी खासगी आणि सरकारी क्षेत्रातील पूर्वापार चालत आलेली स्पर्धा आणि हेवेदावे बाजूला ठेवून खाजगी मोटारमालकांना बसेस चालविण्याचे परवाने दिले आहेत आणि त्यामुळे दिल्ली बस यंत्रणेला फारसा आर्थिक ताण न पडता दिल्लीच्या रस्त्यावरील बसेसची संख्या वाढली आहे आणि साहजिकच बससाठी वाट पाहत तिष्ठणाऱ्या रांगा आणि वेळ दोन्ही कमी होत आहेत.

यामध्ये काँग्रेसी खाक्या बाधक बनतो आहे हे सत्य नाकारता येणार नाही. वास्तविक, लोकांसाठी असलेल्या सोई–सवलतींत सुधारणा करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाचे संबंधित राजकीय पक्षांनी स्वागत करायला हवे. परंतु प्रत्यक्षात मात्र तो कोरा सिद्धान्त ठरत असून या सुधारणांचे श्रेय आपल्या पक्षाला घेता येत नाही, इतकेच नव्हे तर ते जनसंघाला मिळत आहे याचेच वैषम्य वाटून या कामात खो घालण्याचा प्रयत्न चालू आहे. खासगी बसेस आणल्याच्या मुद्यावरून जनसंघाला बराच विरोध होतो आहे. हा विरोध सरकारी क्षेत्राचे कट्टर पुरस्कर्ते म्हणवणारे कम्युनिस्ट आणि त्यांच्या कामगार संघटना करीत आहेत आणि दुर्दैव असे की काँग्रेसही त्या प्रयत्नांना साथ देत आहे.

खासगी बसेस आणाल तर संप पुकारू अशी धमकी या संघटनांनी दिली होती. परंतु मल्होत्रांना भेटायला त्यांचे शिष्टमंडळ गेले असता त्यांच्या या धमकीतलाच नव्हे तर या प्रकरणाच्या संपूर्ण विचारसरणीच्याच शिडातला वारा मल्होत्रांनी काढल्यामुळे ती धमकी वाऱ्यावर विरून गेली आणि आज खाजगी बसेस काही मार्गावर धावू लागल्या आहेत. असल्या अडथळ्याच्या धोरणामुळे निवडणुकीत आधीच पराभूत झालेली काँग्रेस आपले वजन आणखीनच घालवते आहे, हे तिच्या लक्षात येत नाही, ही या प्रकारातील मौज आहे ! कारण, लोकांना बसेस हव्या आहेत आणि दिल्ली प्रशासन त्या कशा मिळवते, याच्याशी त्यांना काहीच करा-यचे नसते. उलटपक्षी मल्होत्रांनी चालवलेल्या या चांगल्या प्रयत्नांत कोण कोण कसकसे बाधक बनतात याची वर्णने वर्तमानपत्रात वाचल्यावर लोकांच्या मनावर काय परिणाम होत असेल ते सहज कळण्यासारखे आहे. तीच गोष्ट अनधिकारपणे

वाटेल ती जागा आधी गयावया करून मिळवायची आणि मग आपलीच आहे, असे सांगून ती बळकवायची असे वागणाऱ्या लोकांची. याचे अगदी बोलके उदाहरण म्हणजे दिल्लीतील नूतन मराठी विद्यालयाची शाळा. या शाळेच्या परिसरातील जागेवर हळूहळू अतिक्रमण करीत करीत पहाडगंज या भागातील काही इमारतीत लाकूड व्यापाऱ्यांनी आपली टाले उघडली. गेली सहा वर्षे ही टाले तेथून उठवण्याचे सर्व प्रयत्न फसले. अखेर परवा मे महिन्यात पोलीस उभे करून ती सर्व टाले तेथून पाडून उठवण्यात आली आणि आता नू. म. वि. ला मोकळे पटांगण, व्यवस्थित सीमा–कम्पाऊंड आणि महाद्वारे वगैरे बांधून घेता आले. हे काम जनसंघ राजवटीत चुटकीसरशी होते आणि आधी ते सहा–सहा वर्षे रेंगाळते. यांतील फरक जनसंघाने दाखवला नाही तरी लोकांना तो दिसतोच. त्याला कोण काय करणार ?

मुख्य बाजारातही अशीच अतिक्रमणे फेरीवाल्यांनी सर्रास चालवली होती. फुटपाथ तर त्यांनी चक्क दुकाने मांडून अडवले होतेच, पण शिवाय रस्त्याच्या भागावरही आपला पसारा मांडला होता. पोलीस कधीमधी यायचे, ते आले की तेवढ्यापुरते फेरीवाले गल्लीबोळात पळायचे आणि गेले की पुन्हा जैसे थे व्हायचे ! फार झाले तर पोलिसांची यात पोळी पिकायची. पण आता पोलीस तेच आहेत, फेरीवाले तेच आहेत, बाजारही तोच आहे; परंतु कारभारी बदलले आहेत हे कळताच सर्व दृश्य बदलले आहे. आता फुटपाथ मोकळे झाले आहेत. बिना परवाना फेरीवाले एकाजागी बसेनासे झाले आहेत आणि परवानाधिकारी गाडीवाले, दुकानदार फुटपाथ सोडून आपल्या हातगाडीवरच आपले दुकान थाटून भिंतीशी उभे राहू लागले आहेत. पण यातील काही फेरीवाल्यांना चिथावून काँग्रेसवाले बळेच आंदोलन करू पाहत आहेत. अनधिकृत जागावर काँग्रेस राजवटीत वाढलेल्या झोपडवस्त्या पाडून अधिकृत जागावर त्यांना गाळे बांधून देण्याचे काम काँग्रेस राजवटीतच मंजूर झाले होते. परंतु ते कधीच अंमलात आले नव्हते. जनसंघ आता ते अंमलात आणू लागल्याबरोबर काँग्रेसने दिल्लीत सत्याग्रह आरंभला आहे. अशाच एका वस्तीला शास्त्रीनगर हे नाव देऊन, तेथे शास्त्रींचा पुतळा वगैरे उभारून काँग्रेसवाल्यांनीच स्वस्त आशीर्वाद मिळवले होते. परंतु या असल्या अडथळ्यांनी जनसंघ प्रशासनाच्या सुधारणांचा वेग किंचित् मंदावत असला तरी तो थांबणे लोकच अशक्य करून टाकतील, असे दिसत आहे.

## पुढे काय ?

पण या सर्व सत्कार्याला पुढे काय हा मोठा पण आहेच ! दिल्ली महानगर परिषदेला आर्थिक अधिकार फार थोड आहेत. त्यामुळे आर्थिक नाड्या केंद्राच्या हाती आहेत. मंजूर झालेली रक्कमही पूर्णपणे कारभारी मंडळींच्या हाती पडत नाही, असे झाले आहे. चांगल्या कामाला लागणारा पैसा केंद्राच्या हाती, तर त्यातून राजकारणी हेतूने पक्षहित साधण्याकरताच केवळ विरोध करण्याची काँग्रेसची भावना

अशा दुहेरी पेचांतून जनसंघाला मार्ग काढावा लागत आहे. या साठी त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांच्या आचरणाकडे लोक डोळ्यांत तेल घालून पाहत आहेत. या जनता-जनार्दनात कर्तुमकर्तुम् शक्ती जागी झाली आहे. पूर्वीच्या भ्रष्ट प्रशासनातील वैगुण्ये दूर करताना कर्तव्यकठोर वागणारा जनसंघ, आपल्याच कार्यकर्त्यांचा संबंध आला म्हणजे कसा वागतो याकडे या 'जनार्दनाचे' बारीक लक्ष आहे. त्या वागण्यात जर पात्रे बदलून तोच प्रयोग पुन्हा सुरू झाला तर हा 'जनार्दन' क्षमा जाणत नाही, हे सत्य आता सर्वच राजकीय पक्षांना गेल्या निवडणुकीने पटवले आहे. जनसंघाच्या कार्याचे मोजमाप १०० दिवसांत करणे म्हणूनच कठीण आहे. पहिल्या शंभर दिवसांत ठरलेली दिशा पुढल्या शंभरांत कायम राहण्यावरच पुष्कळसे अवलंबून आहे. ●


## कै. य. गो. जोशी स्मृती कथास्पर्धा

कै. य. गो. जोशी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'प्रसाद' मासिक ही कथा-स्पर्धा आयोजन करीत आहे. या कथास्पर्धेत सर्वांनी भाग घ्यावा, अशी आम्ही विनंती करीत आहोत.

स्पर्धेसंबंधीचे काही नियम—

- स्पर्धेसाठी कथा स्वीकारण्याची तारीख ५ सप्टेंबर १९६७.
- कथा एकच धाडावयाची आहे.
- लांबीची मर्यादा नाही. पण जास्तीत जास्त २५०० शब्द.
- कथेला विषयाचे बंधन नाही.
- कथेचे अधिकार लेखकांकडे राहतील.
- पहिल्या तीन कथांना बक्षिसे मिळतील ती अशी :

**बक्षिस १ ले : ५०० रु., २ रे : ३०० रु., ३ रे : २०० रु.**

- कथांची प्रहिली निवड निवड, समिती करील. हीसमिती आलेल्या कथांतून २० कथा निवडील.
- या २० कथा 'प्रसाद' १९६७ दीपावली अंकात प्रसिद्ध होतील.
- बक्षिसाच्या कथा सोडून बाकीच्या १७ कथांना प्रत्येकी ७५ रु. मानधन दिले जाईल.
- ज्यांची निवड होणार नाही त्या कथा सप्टेंबरअखेर त्या त्या लेखकांकडे परत केल्या जातील.

संपादक 'प्रसाद'

**प्रसाद प्रकाशन, १८८६, सदाशिव, पुणे २.**

## एका पेशीमुळे

एका पेशीतून ओंकारलेले
गुलाबी आशेचे अंकूर !
बुद्धाच्या, येशूच्या, कृष्णाच्या–
क्रांतदर्शी प्रतिभेचे मानलेले !
आज पार कोळपून गेलेत !
वारुळातल्या मुंग्यासारखी
वासनेची धायपाती बने
गड्डुचा गड्डुचांनी फोफावलीत
या गड्डुचानाच गोंडस नाव
मानवाची कल्पांताची संस्कृति! !
हे गड्डे सोडून मैल न मैल–
हातपाय पसरले नुसते माळ !
कोटी कोटी वर्षांचे माळ !
रुक्ष, रणरणीत–दिशाहीन माळ !
मरता येत नाही म्हणून जगणारे!
सिगरेटच्या धुरात असह्यता भुलणारे! !
या माळावर कधीही
चुकूनसुद्धा बदल होणार नाही !
विधात्याच्या पृथ्वीचा–
एका पेशीमुळेच !
झाला तर नरक होईल.
स्वर्ग कधी होणार नाही ! !

*शिवाजीराव सावंत*

## आस्वाद

"एका पेशीमुळे" जगात नंदनवन न होता वाळवंट झाले असा आशय काही साजेशा शब्दांत शिवाजीराव सावंत यांनी मांडला आहे. मोठे लोक जन्म घेतात. आपल्या दिव्य जीवनाने आणि उपदेशाने जगाचा उद्धार करण्याचा ते प्रयत्न करतात; परंतु त्यांच्या-बरोबर ती मूल्ये लयाला जातात आणि जग पुनः अंधारात चाचपडतच राहते. मोठी माणसे स्वतःला मोठी करतात, पण जगाला सामान्य करून सोडतात, असे विरोधाभासाने म्हणता येईल. माळी, गुलाबी अंकुर असल्या प्रतीकांनी विरोध चांगला रंगविला आहे.

सुशील यांच्या 'तीन कविता' कणिका म्हणता येतील. 'मुक्तक' या काव्यप्रकारात त्या मोडतील. विचार, कल्पना, किंवा भावना एखाद्या गोळीबंद मोत्याप्रमाणे लहानशा कडव्यावजा कवितेत मांडला की, मुक्तक तयार होते. 'सांगाती' यात फार सूक्ष्म वेदना रंगविलेली आहे. व्यथा कर्तव्याच्या गोषातून बाहेर यायला नडते आहे, ही प्रतिमा बहारदार वठली आहे. श्वास संपल्यानंतर तरी 'सांगाती' खास येईल हे सांगण्यात प्रेमावरची अपार श्रद्धा दिसते. सिंहावलोकन हे कित्येकदा तापदायकच होते असे नाही. ते तर तेजोभंग करणारे ठरते. प्रियजनाच्या डोळ्यांतील अश्रू पाहून कोणते संवेदनाक्षम मन हतबुद्ध होणार नाही? पण हतबुद्ध होणे

तीन कविता

## सांगाती

'एक व्यथा खोल खोल कुठे तरी दडली आहे
कर्तव्याच्या गोषामधुन बाहेर यायला नडली आहे
कळणार नाही, दिसणार नाही; पण माझ्या श्वासाअंती
सारे सारे बंध तोडून येइल माझ्या सांगाती–'

## निरोप

जा उडुनि विहंगा मारित स्वैर भराऱ्या
बघु नकोस वळुनी अश्रूंना या खाऱ्या
तू वळून बघता अगतिक होतिल पंख
अन् विद्ध मनाला अधिकच करतिल डंख,

## ज्योती

मी तर ज्योति नित जळणारी
प्रकाशुनी तम काजळणारी
गळती मोती जळते काया
रे अवकाशा तुज फुलवाया
जळता ज्योती दिसे परंतु–
व्यथा दिसेना कुणा–
समर्पणाचा शब्द लाघवी
ठाऊक ना यातना !

*सुशील*

कित्येकदा प्रगतीच्या आड येते. म्हणून तर विहंगाला ' मागे वळून पाहू नको ' असा प्रेमळ इशारा द्यायचा. शेवटच्या कणिकेत पहिल्या कणिकेतलीच व्यथा पण जरा निराळ्या प्रकारे चित्रीत केलेली आहे. ज्योतीचा प्रकाश दिसतो. त्याच्या साहाय्याने मार्ग शोधणारे असतात, पण ज्योतीची व्यथा ते जाणू शकत नाहीत. पहिल्या दोन कणिकांतली एकात्मता तिसऱ्या कणिकेत असती तर ती अधिक परिणामकारक झाली असती. समर्पण हा शब्द मोठा आकर्षक वाटतो, पण त्याच्याबरोबर येणाऱ्या यातनेची कल्पना कोण करते ? नेहमीच्या कणिकेपेक्षा काहीशी थोराड वाटणारी ही कणिका शेवटच्या वृत्तवैचित्र्याने अधिक उत्कट वाटते.

*गोपीनाथ तळवलकर*



# तृषार्त मी

सौ. मंदाकिनी चिपळूणकर

सुशीलेच्या अन् माझ्या लग्नाच्या आड जर कोणती गोष्ट येत असेल तर तिचा मुलगा प्रसन्न. म्हणजे असं की, तिनं आपल्या पहिल्या नवऱ्यापासून–प्रभाकरपासून–घटस्फोट घेतला होता. त्याच्या रुपारंगावर ती भाळली, पण त्याचं अंतरंग तिला नंतर कळलं. जेव्हा त्याचे-जवळ राहणं अगदीच अशक्य झालं तेव्हाच तिनं घटस्फोटाचा निर्णय घेतला व ती मुलाला घेऊन वेगळी राहून नोकरी करू लागली. तिथंच तिची-माझी भेट झाली अन् चमत्कारासारखं प्रथमदर्शनी प्रेम नाही, पण काहीशी जवळीक मात्र निर्माण झाली.

प्रसन्न 'प्रसन्न' आजकाल मला प्रसन्नचाच ध्यास लागला होता. मी 'बाबा' बनण्याचे धडे घेत होतो. आणि प्रसन्न मात्र मला 'एक चांगले मित्र' असंच म्हणत होता.

प्रसन्न मोठा गोड मुलगा होता. काहीसा कृश, भेदक डोळ्यांचा! चेहऱ्यावर सदा मुक्तहास्य पसरलेलं असे, अन् ते पडलेल्या पुढच्या दातांतून सदोदित ओघळत असे. अशा या मुलाबरोबर जमवून घेणं ही आमची–खरं म्हणजे माझी–अडचण होती! प्रसन्न एखादी मुलगी असता तर ते एवढं कठीण वाटलं नसतं मला. कारण आजवरच्या आयुष्यात मुलींशी कसं वागावं हे मला बरंच माहीत झालं होतं. पण मुलाबरोबर–तेसुद्धा प्रसन्नसारख्या मिस्किल मुलाबरोबर–कितपत जमेल याची मला धास्तीच वाटत असे.

सुशीला मला नेहमी म्हणे, "आता काय लहान आहेस कारे? मुलांची सवय नाही म्हणतोस ते! चांगला तिशीला आलास, आता केव्हा सवय व्हायची?" पण मी म्हणे, "अग, पण म्हणून काय एकदम सहा वर्षांच्या मुलापासून सवय करू का?" यावर एकदम गंभीर होत सुशीला म्हणे, "हे बघ मधू, प्रसन्न माझा मुलगा आहे. जर तुझं माझ्यावर मनापासून प्रेम असेल तर तू त्याच्यावरही प्रेम करशील, याची मला पक्की खात्री आहे!" मी काही न बोलताच तिच्याकडे पाहत राही. पण मनात मी म्हणे, "होय ग बाई, काय तू माझ्यावर मोहिनी टाकली आहेस कुणास ठाऊक! आजपर्यंत स्वच्छंदी प्राण्याप्रमाणे वागणारा मी, कुठलीच गोष्ट आयुष्यात seriously घेत नव्हतो. पण तू भेटलीस अन् सगळं बदललं–आत्ता बॉसला सांभाळून घेतो–कारण नोकरी धरून ठेवलीच पाहिजे–नाहीतर नोकरी-बरोबर तूही जायचीस. पुढच्या आयुष्याचा विचार करायला मी तुझ्यामुळेच शिकत आहे"–आता उथळपणा करून चालणार नव्हतं. पाणी जोखून वागलं पाहिजे होतं. प्रसन्नची मर्जी सांभाळायला पाहिजे होती.

'प्रसन्न! प्रसन्न!' आजकाल मला प्रसन्नचाच जणू काही ध्यास लागला होता. मी 'बाबा' बनण्याचे धडे घेत होतो रोज. सुशीलेनं आमची दोघांची ओळख करून दिली तेव्हा, "माझे एक चांगले मित्र" अशी माझी त्याला ओळख करून दिली होती. तेव्हापासून तो मला 'चांगले मित्र' असंच म्हणत असे. पहिल्या दिवशी मी त्याला भेट म्हणून कळीची मोटार दिली. ती त्याला चालवायलाच

येईना. त्यामुळं त्यानं ती रागानं भिरकावून दिली व ती मोडलीच. सुशीला रागावली तसा तो रडायलाच लागला. " असू दे ग सुशीला, या मोटारी असल्याच नाही का रे प्रसन्न ?" मी त्याला विश्वासात घेत म्हटलं. त्यानं माझ्याकडे आशेनं पाहिलं, मान हालवली. "मोटर चालू झाली नाही तर कुणीही चिडेलच की नाही ?" तो मजेनं हसला—म्हणजे मी माझा पहिला घडा तर चांगला गिरवला होता. हो, मुलाची बाजू पण जरा विचारात घेतली पाहिजे. नाही का ?—आम्ही दोघं एकमेकांची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न करीत होतो, हे लक्षण मला चांगलं वाटत होतं. खरं म्हणजे प्रसन्न मोठा गमत्या स्वभावाचा मुलगा होता. कधी तो मुद्दाम खोड्या करी तर कधी चुकूनच त्याच्या हातून खोड्या घडत. एकदा ऑफिसमधून मी सरळ सुशीलेच्या घरी गेलो. सुशीलेनं दार उघडल्याबरोबर मी गाल फुगवून तोंड पुढे केलं. प्रसन्न मागे होताच. तो हळूच म्हणाला, " काय हो 'चांगले मित्र', तुम्ही बँडमध्ये आहात का ? नेहमी बिगुल वाजवल्यासारखं तोंड फुगवता ते ?" सुशीला अन् मी चपापलो, पण मग आम्ही ते हसण्यावारी घालवलं. आम्ही दोघं कधीही बोलत असलो तरी प्रसन्न दोघांच्या मध्ये घुसे, मध्येच बोले. मला प्रथमप्रथम राग येई, चीड येई. पण थोड्याच दिवसांत माझ्या लक्षात आलं, की आम्हा दोघांबरोबरच कुठलीही गोष्ट करण्याचं त्याला आवडतं. त्यात खोडसाळपणाचा जराही भाग नाही. माझी चीड थोड्याच दिवसांत नाहीशी झाली. उलट, त्याची मला हळूहळू इतकी सवय झाली की, मी ऑफिसात, क्लबात सगळीकडे त्याच्याच गंमती सांगू लागलो. सगळं ठीक जमायला लागलं, असं पाहून आम्ही लग्नतिथी ठरवली. त्याच्या आधी एक आठवड्याची गोष्ट ! सुशीलेला कुठं कामाला जायचं होतं, म्हणून ती प्रसन्नला माझ्यावर सोपवून गेली. तो जरा भ्याला. "आई, तू कुठं जातीस?" त्यानं वाकडं तोंड करीत विचारलं.

" मी आत्ता येते राजा. मधू आहे ना तुझ्याजवळ. इतके दिवस नाही का तू त्याच्याजवळ खेळत, बोलत ?"

" पण आई... " तो रडत तिचा पदर धरीत म्हणाला.

" अरेरे, असाच का आमचा मुलगा रडका ?" मी त्याला उचलून घेत म्हटलं. सुशीला निघून गेली. पण आम्ही दोन अस्वस्थ आत्मे खोलीत घुटमळत राहिलो. जरा वेळ तो घरभर फिरला, थोडा वेळ खेळण्याशी खेळत राहिला, सगळीकडे पसारा केला. मी त्याला गोष्ट सांगण्याचा प्रयत्न केला पण त्याचं लक्षच नव्हतं. मग मीही तो नाद सोडला अन् वर्तमानपत्र वाचत बसलो. " मी जरा शेजारच्या मन्याशी खेळायला जाऊ का ' चांगले मित्र ' ?" त्यानं विचारलं.

" तुझी आई जाऊ देते का तुला ? ठीक आहे मग जा. पण जपून खेळ हं. "

' हो हो ' करून उड्या मारीतच तो बाहेर धावला. पंधरा-वीस मिनिटं अगदी गाढ शांतता पसरली. नंतर दारातून एक चिंतातुर चेहऱ्याची लठ्ठशी बाई प्रसन्नचं बोट धरून आत आली. मी वर बघितलं. बापरे, त्याच्या हनुवटीवरून रक्त गळत

होतं. शर्टावर, शर्टावरून पँटवर अन् पँटवरून जमिनीवर ! मी खुर्चीवरून ताडकन उठत विचारलं, " हे काय झालं ?" त्या बाई–मन्याची आईच असावी बहुतेक, अपराधी मुद्रेनं त्या म्हणाल्या, " प्रसन्न पडला. मला वाटतं, त्याला बरंच लागलं असावं. तुम्हांला काय वाटतं ?" मी मनात म्हटलं, " काय वाटतं, कप्पाळ ! आता सुशीला माझी छानच किंमत करील. प्रसन्नला पहिल्यांदाच ती माझ्यावर टाकून गेली अन् मी त्याला चांगलंच सांभाळलं !" मी पुढं होऊन प्रसन्नची जखम पाहिली. जखम जरी खोल होती तरी स्वच्छ होती. प्रसन्न रडत होता पण घाबरे-पणानं नव्हे. सोशीक दिसत होता. मी त्याला म्हटलं, " चला, आपण दवाखान्यात जाऊन औषध लावू या का ?" तो मला खेटून चालत होता. कधी विश्वासानं माझा हात पकडीत होता. त्यानं सर्वस्वी माझ्यावर भार टाकून दिला होता. दवाखान्यात मलमपट्टी करण्यापूर्वी डॉक्टरांनी नाव विचारलं, " तुम्ही याचे वडीलच ना ?" सगळं सांगत बसण्यापेक्षा मी ' हो ' असं पुटपुटलो आणि प्रसन्नकडे " ठीक ना? " असं डोळ्यानंच विचारलं. उत्तरादाखल तेच ते तोंडभर मुक्तहास्य सगळ्या रक्तभरल्या ओठावरून ओघळलं. पण ह्या हास्यानं मला गोड झिणझिण्या आल्या. आमच्या दोघांत एक नवीनच प्रेमाचा मृदू धागा उत्पन्न झाला. डॉक्टरांनी एक-दोन टाके घालायचे ठरवले–तसं म्हणजे डाग राहू नये म्हणून. मी जरा घाबर-तच होकार दिला. प्रसन्न भीतिभीत म्हणाला, " खूप दुखेल का हो ?"

" हो राजा, थोडं तरी दुखणारच ! पण मी आहे ना तुझ्याजवळ." मी त्याला प्रेमानं थोपटत म्हटलं. माझ्या एकदम लक्षात आलं की, सुशीलेसारखंच राजा म्हणून त्याला संबोधलं. तो माझा हात घट्ट पकडीत, मला बिलगत म्हणाला, " मग ठीक आहे. आता मी मुळीच घाबरत नाही."

या घटनेनंतर एका आठवड्यानं आमचं लग्न झालं. त्याच दिवशी विशेष म्हणून प्रसन्नचे टाके काढण्यात आले. त्याचा उत्साह अगदी ओसंडून वाहत होता. घरभर धमाकूळ घालत होता. त्याला लग्नातली विशेष कुठली गोष्ट आवडली असेल तर ती आमच्यावर अक्षता फेकण्याची ! पठ्ठ्या मुठी भरभरून तांदूळ फेकीत होता ! पण नंतर आम्ही चार दिवस बाहेरगावी जायचं ठरवलं तेव्हा मात्र हा सगळा आवेशाचा मुखवटा गळून पडला.

" पण तुम्ही कुठं जात आहात ?" त्याने विचारले. " कामाला बेटा." मी डोळे मिचकावीत सुशीलेकडे पाहत म्हटलं. तिनं डोळे मोठ्ठे करून आपला कोप-दर्शवला.

" पण मग मी का यायचं नाही कामाला ? "

" अरे, ज्यांची लग्नं होतात ना त्यांनीच जायचं असतं."

डोळे विस्फारीत तो उत्तरला, " पण मला वाटलं की, माझंसुद्धा आत्ताच लग्न झालं म्हणून !" घ्या. आहे की नाही पोराची गंमत ! शेवटी त्याला पुढे केव्हा-

तरी असल्याच कामाच्या ट्रिपवर न्यायचं ठरवलं, तेव्हा कुठं स्वारी आजी-आजोबां-बरोबर त्यांच्या घरी जायला तयार झाली.

आमचा नवा तीन खोल्यांचा ब्लॉक प्रसन्नला कितपत आवडेल अशी मला भीती वाटत होती. पण त्यानं सगळा ब्लॉक हिंडून बघितला, स्वतःची छोटीशी खोली निरखून पाहिली. मग गंभीरपणे म्हणाला, " आहे खरी छोटीशी, पण अगदी रॉकेट-सारखी वाटते. छान आहे." स्पोर्ट दिसतो आहे बेटा, मी मनाशी म्हटलं. त्या छोटयाशा जागेत सामावून राहण्याकरिता आम्हांला खूपच धडपडावं लागे. सुशिलेनं लग्न झाल्यावर नोकरी सोडली होती. लग्न म्हणजे पोरखेळ नव्हे हे मला हळूहळू पटत होतं. दर वेळी 'मी'च्या ऐवजी 'आम्ही–आपणच्या'च्या भाषेत बोलावं लागे. आणि आम्ही म्हणजे 'तिघेजण' असू. प्रसन्नच्या सारख्या काहीतरी मागण्या असत. सुशीलेच्या सारख्या काहीतरी तक्रारी असत. मी दमूनभागून कामावरून येई. तेव्हा बूट मोजे काढून स्वस्थ पाय ताणून पडावं असं मला वाटे. पण प्रसन्नला हीच वेळ खेळण्याची, दंगामस्ती करण्याला सोईची वाटे. पहिल्यापहिल्यांदा मी त्याच्याशी खेळे. तो माझ्या येण्याची वाट पाहत राही. त्याबद्दलही मला आनंद वाटे. पण रोज त्याच Routine मधून जाण्याचा मला कंटाळा येऊ लागला, थकवाही वाटू लागला. शेवटी एक दिवस मी त्याला म्हटलं, " हे बघ प्रसन्न, मी काम करून घरी येतो ना त्यामुळे खूप दमतो बघ, नंतर मी तुझ्याशी खेळलो तर चालेल ना तुला ?" त्याचा चेहरा एकदम पडला व स्वर रडका झाला. मला अपराध्यासारखं वाटू लागलं अन् तसं वाटायला लागलं आहे या जाणीवेनं मी उगीचच रागावलो. मी चिडून ओरडलो, " हं, गप बस. रडायला काय झालं ! मला जरा तरी विसावा नको का ? मी पण घरात कुणीतरी आहेच की !" प्रसन्न गप्प झाला, जेवताना व नंतरही. पण नंतर झोप-ण्याच्या वेळी कपडे बदलून चटकफटक करीत तो आला. मी वाचणं थांबवून त्याच्या-कडे पाहिलं. तोंड स्वच्छ धुतलं होतं, केसाचं जंगल पण छान विंचरलं होतं. " अहो, 'चांगले मित्र' तुम्ही जरा पाच मिनिटं माझ्या खोलीत येता का ? एकटेच हं ! मला तुमच्याशी काही बोलायचं आहे." तो शांत गंभीर आवाजांत म्हणाला. खरंच याला मघाच्या प्रकाराबद्दल काही वाटत असेल म्हणून मी गेलो. स्वारी बिछान्यावर जाऊन तोंडापर्यंत पांघरूण घेऊन पडली. मी पलंगाच्या कडेला टेकलो. तो गप्पच. मीही गप्प. पाच मिनिटं गेली तरी तो गप्पच. नंतर एकदम म्हणाला, " बरं, मग काय बोलायचं आपण ?" काय मुलगा आहे ! मला खूप हसू आलं. मघाचं सगळं प्रकरण विसरून आम्ही खूप गप्पा मारल्या. त्याने शाळेतले मित्र सांगितले, त्याचं ते क्रिकेटीअर्सच्या फोटोचं आल्बम दाखवलं (आत्तापर्यंत मी ५० वेळा तरी ते पाहिलं असेल !) माझा हात घट्ट धरून तो बघता बघता झोपीसुद्धा गेला. मलाही कसं मोकळं वाटायला लागलं–त्यानं कितीही सैतानगिरी केली, मी त्याला कितीही रागे भरलो तरी समझोता न करता झोपी जाणं आम्हांला दोघांनाही आवडत नसे.

म्हणून मग आमचीही रात्रीची 'पाच मिनिटं' बोलण्याची प्रथाच पडली. तरी काही वेळेला खटकेबाज प्रकार घडतच. एखादे दिवशी कामावरून यावं तरी दारातच स्वागताला सुशीला त्याची तक्रार घेऊन उभी असे. घरी प्रसन्न शहाण्यासारखा वागे. पण शाळेमध्ये मात्र तो भयंकर असे. एके दिवशी बोलता बोलता सुशीला म्हणाली, "आज प्रसन्नच्या गाण्याच्या बाई त्याच्यावर खूप रागावल्या." मी एकदम कठोर बापाची मुद्रा धारण केली. "प्रसन्न, हे काही आपल्या घरात चालणार नाही हं! काय खोडी केलीस बाईंची?"

"बरं बाबा सांगतो. आम्ही काहीजण गाण्याच्या तासाला किंचित् आवाज करीत होतो,--दंगा नव्हे बरं का—बाई म्हणाल्या, 'गप्प बसा. पुन्हा मला माझा आवाज चढवलेला आवडणार नाही'" तशी मी म्हटलं, "आवाज चढवायचा नसेल तर लाउडस्पीकर का आणत नाही?" अगदी निष्पाप निरागस चेहऱ्याने हे सांगणाऱ्या त्या बाळाकडे पाहून मला खूपच हसू येत ह्तें, पण मी ते आवरून त्याला म्हटलं, "प्रसन्न, असं बोलतात का बाईंना? त्या तुझ्या बाई आहेत ना? उद्या तू जाऊन गायनबाईंची क्षमा मागितली पाहिजेस. समजलं?"

एका संध्याकाळी मी घरी आलो तर हा रेडिओ ऐकत बसला होता. मी विचारलं, "काय म्हणते शाळा?"

"ठीक आहे की; पण मी नलीला मात्र माझ्या कानात काही सांगू देणार नाही, अहो का काय? ती मन्याच्या कानात कुजबुजली ना तर त्याला एकदम गोवर आला बघा." त्यानं हसत हसत उत्तर दिलं. असा वात्रट मुलगा कुठं असेल का? इतक्यात सुशील आली अन् म्हणाली, "मी तुम्हांला सांगणारच होते बघा, मी आज याच्याजवळ वाघ्याला बिस्किटं आणायला पैसे दिले. तर यानं त्याचं केलं असेल असं वाटतं तुम्हांला? अहो, त्या पैशांचं ह्यानं नलीला चॉकलेट घेऊन दिलं." मला आश्चर्य वाटलं. "म्हणजे हा तर चक्क गुन्हा आहे, तुला माहीत आहे प्रसन्न, या गुन्ह्याकरता माणसांना तुरुंगात टाकतात!" मी त्याला काही बोलू न देता पुढं म्हटलं. "एक तर असं करणं वाईट आहे, आणि दुसरं म्हणजे एवढासा चिमुरडा तू—मैत्रिणीला चॉकलेट कसलं देतोस!" मी तावातावानं बोलत होतो पण हा पठ्ठया चक्क शिटी वाजवून तोंडानं गाणं म्हणत होता. मी खाडकन रेडिओ बंद केला. "माझ्याकडे लक्ष दे, मी तुला बोलतो आहे ना? आजपासून आठ दिवस तू रेडिओ लावायचा नाहीस." प्रसन्न रागीटपणे माझ्याकडे पाहत म्हणाला, "मला तुमचं काही ऐकायचं नाही— मला आजोळी वाटेल तेवढे पैसे देत होते, मी वाटेल तितका वेळ रेडिओ लावत असे. मी लावणार जा." मी पाय आपटीत त्याच्या अंगावर ओरडलो, "जा तर मग तिकडंच राहायला. हो चालता." तो एकदम घाबरला अन् स्वतःच्या रॉकेटमध्ये घुसला. छोटीशी बॅग उघडून त्यात कपडे भरायला सुरुवात केली, मध्येच उठून धाडकन खोलीचं दार बंद करून घेतलन—आम्ही

बघतो आहो असं पाहून. आम्ही दोघंही जरा चमकलोच. दाराला कान लावला तेव्हा बारीक हुंदक्यांखेरीज काहीच ऐकू येत नव्हतं. साधारण अर्धा-पाऊण तास असाच गेला, मग तो रॉकेटमधून बाहेर आला. चेहऱ्यावर अश्रूंचे डाग स्पष्ट दिसत होते. माझ्याकडे पाहत म्हणाला, "मी इथंच राहणार आहे. पण तुम्ही आवडता म्हणून राहतो असं समजू नका." आम्ही सगळेजण जेवायला बसलो. पण आम्ही दोघं काहीबाही बोलत होतो, पण तो छोटा खाली मान घालून अन्न चिवडीत असताना कसलं जेवण न् कसलं बोलणं! शेवटचा भात कालवीत असताना त्यानं मान वर करून विचारलं, "काय हो 'चांगले मित्र' गुन्हा म्हणजे काय हो?" एक सुटकेचा निःश्वास माझ्या नकळतच बाहेर पडला. म्हणजे पोर बोलायला लागला म्हणायचा तर! "अं अं, गुन्हा म्हणजे, एकादी वस्तू आणायला पैसे दिले आणि ती वस्तू न आणता जर ते पैसे दुसरीकडे वापरले, तर तो गुन्हा ठरतो."

"हं–हं. म्हणजे, तुम्ही आईला भाजी आणायला एक रुपया दिलात आणि उर-लेले पैसे जर तिनं तिजजवळ ठेवलेत, तर तो गुन्हा, असंच ना?"

सुशीलेनं हसण्याची उकळी दाबण्याचा प्रयत्न केला. "हं, तसंच थोडंसं. पण आईबाबांचं वेगळं आहे. बाबांचा पैसा तो आईचा पण पैसा असतो."

"बरं पण, माझंपण वेगळंच का असू नये? मी पण तुमच्यातलाच नाही का?" या त्याच्या केविलवाण्या प्रश्नावर मी काय उत्तर देणार?

एक दिवस प्रसन्नच्या खऱ्या बाबांना काय लहर आली कुणास ठाऊक! गेल्या दोन वर्षांत चार ओळींनंसुद्धा त्यानं मुलाची चौकशी केली नव्हती. पण आता कदाचित् त्याला बायकोचा नवा संसार बघायची इच्छा झाली असेल! तो धूमकेतू-सारखा अचानक एक दिवस उगवला– त्या दिवशी त्यानं प्रसन्नला स्कूटरवरून खूप फिरवून आणलं, खूप खायला घातलं, सिनेमाला नेलं. प्रसन्न घरी आला तो अगदी उत्साहित होऊन– आल्या आल्या मला म्हणाला, "चांगले मित्र, तुम्ही स्कूटर केव्हा घेणार? म्हणजे बाबांसारखी आपल्याला मज्जा करता येईल." "कधीच नाही." मी त्रासिक आवाजात उत्तरलो. प्रभाकरला तो 'बाबा' म्हणतो अन् मला मात्र 'चांगले मित्र!'– त्या रात्री मी सुशीलेला म्हटलं, "सुशीला, प्रभाकराशी मी कशी बरोबरी करणार! तो सडाफटिंग, नाचरा! उलट मला इथं दरक्षणी प्रस-न्नला रागवावं लागतं, काम करायला लावावं लागतं– तो प्रभाकर दर वेळी याला नवी चूष दाखवणार अन् त्याला फितवणार!" सुशीला यावर शांतपणे म्हणाली, "मधू, मला एकच गोष्ट माहीत आहे. आपल्यावर खरं प्रेम कोण करतं हे मुलांना बरोबर कळतं.– मला वाटतं की तू प्रसन्नवर स्वतःच्या मुलासारखं प्रेम करतोस. बस्स, मग upset व्हायचं काही कारण नाही. सगळं ठीक होईल."

"तथास्तु" मीही म्हटलं.

दुसरे दिवशी घरात प्रसन्नचा नवाच नवतार वावरत होता. तो स्वतःच्या वस्तू

उचलीना, आंघोळीला जाईना आणि गेल्यावर बाहेरच पडेना—त्यानं वाघ्याला साफ केलं नाही, त्याला खायला दिलं नाहीन्—मी खेळकरपणे विचारलं, " काय रे बैठा संप का ?" मी वरवर त्याला असं म्हटलं खरं पण माझं रक्त नुसतं उसळचा घेत होतं—त्याच्या त्र्यागाचं कारण मला माहीत होतं. झोपायला जाईपर्यंत त्यानं अस्सा त्रास दिला. दुसऱ्या दिवशीही तीच अवस्था होती. सकाळी सुशिलेनं त्याला उठवलं तसा तो उठला पण चहाला न येता खोलीतच बसून राहिला. मी सहज डोकावून पाहिलं तर ती स्वारी पायांच्या बोटांत पेन्सिल धरून वहीत काहीतरी खरडत होती. शिट्टीवादन जोरजोरानं चालू होतं. मला राग आला. मी खोलीत शिरून त्याची पेन्सिल खेचून घेतली अन् त्याला उभं करीत म्हटलं, " पाच मिनिटांत तोंड धुणं, कपडे घालणं आटप. वाघ्याला साफसूफ कर, त्याला खायला प्यायला दे. त्याचं सर्व मी करीन असं तू कबूल केलं आहेस ना ? आणि आता त्याला उपाशी ठेवतोस ? लाज नाही वाटत तुला ? माझी दाढी होत आहे तोपर्यंत या सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत." मी परत बजावलं. माझी पाठ वळली न वळली तोच खोलीतून धाडधाड आवाज आले. वाघ्या बसे ते खोकं त्यानं जमिनीवर आदळलं, आतली गोधडी वगैरे सर्व घाण जमिनीवर टाकली. मोठमोठ्यांदा रडत—ओरडत तो म्हणाला, " तुम्ही मला मुळीच आवडत नाहीत, तो कुत्तरडा पण आवडत नाही. तो मेला तरी मला काही वाटणार नाही." मला इतका संताप आला की मी काय करतो आहे हे कळायच्या आतच मी त्याला एक सणसणीत थप्पड ठेवून दिली. त्याला मारण्याची ही पहिलीच वेळ होती, त्यामुळे मी दिवसभर अस्वस्थ होतो. तो मुळीच मला जुमानीत नव्हता. असाच संघर्ष नेहमी चालणार की काय, हा विचार मला सतावीत होता. साधारण ४–४॥ ला सुशीलेचा फोन आला, " मधू, प्रसन्न अजून शाळेतून आला नाही रे ! रोज २॥ लाच येतो, पोलीसला कळवू काय ?" मी आवाज शक्यतो नॉर्मल ठेवायचा प्रयत्न करीत म्हटलं, " छे: ग, येईल आत्ता, रमला असेल मित्रांबरोबर." माझं अपराधी मन मला टोचण्या देऊ लागलं. माझी काही चूक नाही असं मी स्वतःलाच पुनःपुन्हा बजावीत होतो तरी पण पोराचं काही बरंवाईट झालं तर... चूक माझी, अपराध माझा ठरला असता. जरा वेळानं परत सुशीलेचा फोन आला, " मधू, प्रसन्न सरळ प्रभाकरकडे गेला. तो म्हणतो म्हणे की मला घरी जायचंच नाही. पण प्रभाकरच लवकरच त्याला आणून पोचवीत आहे. काय करायचं रे आपण? "

" काही करायचं नाही. तुका म्हणे स्वस्थ राहावे, जे जे होईल ते ते पाहावे " मी खेदाने म्हटलं.

मी लवकरच घरी परतलो. खरंच प्रसन्न परत नाही आला तर—म्हणून सुशीलेजवळ असावं याकरता लवकरच घर जवळ केलं. दार उघडलं तोच प्रसन्नचा आवाज कानांवर आला. अहाहा ! तृषार्ताला पाण्याचा थेंब मिळाल्यावर जो आनंद होत असेल, त्या आनंदाची जाणीव मला तो आवाज ऐकल्यावर झाली. पहिल्यांदाच त्या

मलाबद्दलच्या माझ्या भावना, माझं प्रेम कळून आलं. खऱ्या पित्याला होईल असं काहीतरी मला त्या क्षणी वाटलं. प्रसन्न त्याच्या आईशी काहीतरी बोलत होता. मी आलेला त्याला ताबडतोब कळलं असावं. कारण तो लगेच धावत बाहेर आला. तोंडावर अपराधी छटा दिसत होती. पण डोळे आनंदानं फुलले होते. माझ्या पुढ्यात येऊन आपलं एक बोट वर करीत तो म्हणाला, " माझ्या या बोटात कुसळ गेलं आहे. बघता का जरा ?" मी अद्याप कपडेही उतरवले नव्हते. तरी मी तसाच खाली वाकून त्याचा तो छोटा कोवळासा हात हातात घेतला. हा क्षण फार म्हणजे फारच महत्त्वाचा होता. आतल्या आवाजानं मला इशारा दिला, ह्या वेळेस त्याच्या कलानं घ म्हणून. कुसळ अगदीच बारीक होतं तरी मी म्हटलं, " हं, बराच मोठा काटा दिसतो आहे. आईच्या सुईनं ताबडतोब काढून टाकला पाहिजे." मी त्याच्याकडे पाहिलं. बरोबर. हेच उत्तर त्याला हवं होतं. त्याच्या चेहऱ्यावरची अनिश्चितता पुसली गेली, अन् तिथं हसू खेळू लागलं. धावत जाऊन त्यानं आईची सुई आणली. मी काटा काढीत असताना त्यानं मला खऱ्या बाबांकडे काय झालं ते सांगितलं. " त्यांनी काही माझा काटा काढलाच नाही. उलट म्हणाले, 'अगदीच भागूबाई दिसतोस तू. या काटयाचं झाड येतं का पाहू तुझ्या बोटातून !' असं म्हणून ते खूप हसायला लागले." प्रसन्न त्या दिवशी पडला तेव्हा घाबरला होता, तसाच काटा शिरल्यामुळे पण घाबरला होता. त्याला सुरक्षितता हवी होती, पण प्रभाकरनं उलट त्याला चिडवलं. यामुळे तो खूपच रागावला होता. इतके दिवस तो त्याला 'बाबा, बाबा' करी, पण आज–आता तो त्याचं नावही घ्यायला तयार नव्हता.

" मी आज सकाळी फार वाईट वागलो नाही ? या गुन्ह्याला काय हो शिक्षा बाबा ? तुम्हांला माहीत आहे बाबा, मी घरी आलो तर वाघ्या माझे हातपाय काय चाटायला लागला, उड्या काय मारायला लागला–सकाळी मी त्याला मारलं, पाडलं ते कसं हो तो विसरला ?" त्याची पोपटपंची चालू होती.

" अरे, तो तुझ्यावर प्रेम करतो म्हणून ! त्याला तू आवडतोस ना, म्हणून."

" मी त्यांना म्हटलं, मला राणीच्या बागेत न्या म्हटलं तर नाही म्हणाले. कबूल केलं होतं मागच्या वेळेस त्यांनी न्यायचं–तरीसुद्धा–असं करावं का माणसानं ? खोटं बोलावं का ? त्याचे ओठ कापू लागले.

" चुकलंच त्यांचं, त्यांनी असं मुळीच करायला नको होतं." मी म्हटलं.

" खरं म्हणजे, तसल्या रद्दी जागेत मी राहणारच नव्हतो. मी खरं तर तुमच्यावरच रागावलो होतो–तसा मी वाघ्यावर पण रागावलो होतो. ते मला खायला देतात, फिरवतात, पण तुम्ही माझी काळजी घेता नाही का ? मी तुम्हांला खूप त्रास देतो. जसा मला वाघ्या देतो...तरी पण तुम्हांला मी आवडतो ना बाबा ?"

त्याचे ते मधात भिजलेले शब्द ऐकताना माझा मी उरलोच नाही–मी त्याला नुसताच सारखा कुरवाळीत उभा राहिलो—

●

'सीताराम एकनाथ'

## खऱ्याखुऱ्या माणसांच्या जित्या-जागत्या गोष्टी

व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांच्या केंद्रस्थानी नेहमी माणसं असतात. पूर्ण माणसं असतात. एखाद्या भावनेविषयी, एखाद्या मनःस्थितीविषयी त्यांची कथा घोटाळत नाही. एखादाच प्रत्ययकारी अनुभव हे तिचे केंद्र सहसा नसते; तर तिच्या केंद्रस्थानी निरनिराळ्या प्रकृतींची, वैशिष्ट्यांची, लकबींची खरीखुरी माणसं असतात. ही माणसं काही कृती करतात, काही विशिष्ट परिस्थितीत गुरफटली जातात आणि त्यातून निर्माण झालेल्या घटनांमधून कथेची वर्तुळे विस्तारत गेलेली दिसतात. जुन्या भाषेत सांगायचं म्हणजे व्यंकटेश माडगूळकरांच्या कथा नेहमी व्यक्तिप्रधान आणि घटनाप्रधान असतात. त्यांच्या कथेतील प्रत्येक वाक्य काहीतरी 'घडल्याचं, घडत असल्याचं' सांगत असतं. आणि त्यातून त्या कथेतील व्यक्तींच्या रेखाकृतीची एकेक रेषा सुस्पष्ट होत जाते. स्वभावातले बारकावे, लहरी, खाचाखोचा उमटत जातात. त्यांच्या कथांतील प्रसंग हे त्यांतील माणसांच्या स्वभाव वैशिष्ट्यांमुळेच निर्माण होतात, आणि त्या प्रसंगांतून कथासूत्रापेक्षा त्या त्या माणसांची वैशिष्ट्यं जाणवल्याचं समाधानच पुरेपूर मिळतं. आणि ते पुरेसं असतं. यामुळं माडगूळकरांची कथा कुठं रेंगाळत नाही, सरपटत नाही. चित्रपटाच्या फिल्मप्रमाणं ती सरसर चालत राहते आणि त्यात गुरफटलेल्या नानाढंगी, बहुरंगी माणसांचं जीवन 'फोकस' टाकून चित्रीत करते. निरनिराळ्या घटनांच्या त्रिमितिचित्रणानं! त्यामुळं त्यांच्या कथा नेहमीच ठसठशीत, जिवंत वाटतात. अगदी 'जित्याजागत्या' असतात.

# पुस्तके

हे माडगूळकरांचं नेहमीचंच आहे. मराठी नवकथेचं अगदी वेगळं, स्वयंपूर्ण स्वरूप त्यांची कथा व्यक्त करते. 'सीताराम एकनाथ' हा कथासंग्रह याला अपवाद नाही. यातही अगदी नेहमीच्या जीवनात भेटणारी खरीखुरी माणसं आहेत. (शेवटचा 'पाठमोरा म्हातारा' तर अगदी वाच्यार्थानं खरा! आबा चांदोरकर. बाकीची माणसं लाक्षणिक अर्थानं खरी.) त्यातही नाना प्रकृती (आणि विकृती). या तेरा गोष्टींमध्ये ग्रामीण स्वभावाची कितीतरी अंगं दिसून येतात. कलंदराचं जिणं जगणारा निलाजरा विनायककाका मणंग जीवनातही आपल्यापरीनं सुख शोधून आरामात असतो; तर तमाशाच्या नादानं दारिद्र्यात बुडलेले मास्तर मनानं अजून त्याच कैफात वावरतात आणि चालू परिस्थितीची जाणीव झाली म्हणजे व्यथित होतात. तात्या, आप्पा आणि आत्या यांसारखी कडवट माणसं दिवसभर उगंच वैतागत, चिडत, किरकिरत राहतात; कुबडचा अमीनसारखा गरीब दीनवाणा चुकून आडात पडतो आणि पुन्हा वर भावाचा मार निमूटपणे सोशीत राहतो. तालेवार दिराच्या मत्सरानं जळफळणारी गंगू स्वतःच्या जिवाचा संताप करून घेते, तर निर्दय काळजाचा सीताराम एकनाथ सुंद्रा माळणीच्या–कोंडाच्या–जीवनाचं वाटोळं करून मजेत असताना त्याची त्या दोघीजणी माळावर हत्या करतात. एक ना दोन, खेडेगावांत जगणाऱ्या माणसांच्या स्वभावाच्या आणि वागण्याच्या कितीतरी छटा या कथांतून माडगूळकरांनी दाखविल्या आहेत. ही सारी माणसं प्रातिनिधिक आहेतही आणि नाहीतही! प्रातिनिधिक आहेत ती अशा अर्थानं, की ग्रामीण जीवनाच्या रसरशीत नि रांगडचा स्वभावाचं ती पुरेपूर दर्शन घडवितात. त्यांचे रागलोभ, त्यांची बोलणीचालणी, त्यांचे हेवेदावे, सगळं ठसठशीत चितारतात. पण इतकं करून त्यात साचेबंदपणा नाही. ठरीवपणा नाही. प्रत्येक माणूस हा एक वेगळं व्यक्तिमत्त्व आहे. त्याला स्वतःची उंची आहे;–किंवा सपाटपणा असला तरी तो त्याच्या स्वतःच्या स्वभावाचा आहे. म्हणूनच ही चित्रं जित्याजागत्या जीवनाचं दर्शन घडवितात.

### उत्कृष्ट निवेदन

या प्रत्येक माणसाच्या मनात शिरून त्याच्याशी माडगूळकर क्षणार्धात एकरूप होतात. त्यामुळं त्या त्या पात्राच्या मनातले विचार स्पष्ट करून सांगण्याची, त्याच्या स्पष्टीकरणार्थ काही निवेदन करण्याची त्यांना गरजच भासत नाही. सगळं काही ते गृहीत धरूनच चालतात आणि त्या त्या व्यक्तीच्या लहान-मोठ्या कृतींतून त्याचं मन प्रकट करतात. त्या वेळी ते जणू त्या व्यक्तीतच विरघळलेले असल्याने हे त्यांना चटकन साधून जाते. आपल्याला जो प्रसंग वर्णन करायचा असेल तो स्वतःच्या डोळ्यापुढे कल्पनेनं स्पष्ट पाहणं ही समर्थ कथालेखकाची कसोटी समजण्यात येते. माडगूळकर तर तो तो प्रसंग स्वतः अनुभवतात आणि मगच लेखणीने साकार करतात. घरादाराची पर्वा न करता तमाशाच्या नादानं मुंबईला चैनीत राहिलेल्या भावाला पाहून बापूला काय वाटलं असेल ते जसं त्यांना स्वच्छ जाणवतं, तसंच चार

लोकांदेखत धाकटचा भावांकडून खेटरानं मार खाल्ल्यानंतर बंडाच्या मनाची होणारी स्थितीही ते पाहू शकतात. आणि इतकं पाहूनही भावनेच्या डोहात विवश-तेनं डुंबण्याचा भाबडेपणा मात्र ते चतुराईनं टाळतात. फक्त काय काय घडलं ते सांगत राहतात आणि हवा तो परिणाम साधून घेतात. एका वाक्याचंही भाष्य न करता, कुठल्याही अर्थवाही प्रतिमा न वापरता, केवळ काय काय घडलं ते सांगून डोळचाला टिपं आणण्याचं सामर्थ्य 'एक प्रसंग' यासारख्या कथेत येतं ते त्या-मुळेच ! माडगूळकर उत्कृष्ट निवेदक आहेत. निरनिराळचा भावोर्मींनी स्वत: न भोवंडता त्यांचा परिणाम मात्र रंगवून सोडायचा हे त्यांचं कौशल्य अजब आहे. ते त्यांच्या कथांचे 'निर्माते'ही आहेत आणि 'निवेदक'ही आहेत. पण कथा सांगण्याच्या ओघात त्यांच्यातील निवेदक इतका प्रभावी ठरतो, की निर्माता कुठे दिसेनासाज्ञ होतो. आणि हेच त्याचं यश आहे. त्यामुळंच या कथांमध्ये कृत्रिमता नावालाही शिरत नाही. जणू-या साऱ्या गोष्टी स्वयंभू आहेत, घडलेल्या आहेत. आणि माडगूळ-करांनी फक्त इथं त्या सांगितल्या आहेत. शेवटच्या कथेतील आबा चांदोरकरात आणि इतर कथांमधील कल्पित माणसांत परिणामाच्या दृष्टीनं काही फरक नाहीच; म्हणूनच या 'जित्याजागत्या' गोष्टी वाटतात.

माडगूळकरांची भाषाशैली मोठी आकर्षक आहे. ती लालित्यपूर्ण नाही, सुकुमार नाही, सालंकृत नाही. पण गोष्ट सांगायला जशी हवी तशी आहे. नेटक्या शब्दांची वाक्यं. फापटपसारा न मांडता, रेघ मारल्याप्रमाणं सरळ हेतू सांगणारी ! ग्रामीण शब्दांचा आवर्जून वापर न करता नकळत सहजरीत्या 'गावरान' वातावरण उभं करणारी. पाच-सहा वाक्यांच्या फेकीत साऱ्या प्रसंगाचं चित्र उभं राहतं. आणि संभाषणातल्या सहज बोलीवरून टपाटपा पावलं टाकत कथा पुढं सरकत राहते. उत्सुकता टिकवून धरते, आणि मोक्याच्या जागीच संपते. या सगळचा कथांचे शेवट अगदी लक्षात राहण्यासारख आहेत. सहज म्हणून शेवटचं वाक्य पुन्हा वाचलं, तरी त्यातल्या साक्षेपी परिणामकारकतेमुळं सबंध कथेतल्या प्रसंगाचा गोफ मनात उलगडू लागतो. घोळू लागतो.

'सीताराम एकनाथ'ची ही दुसरी आवृत्ती आहे. पहिल्या आवृत्तीत सहा कथांची भर घालून ही आवृत्ती तयार केली आहे. यातल्या काही कथा १९४७–४८ इतक्या जुन्या आहेत. पण त्यातल्या जिवंत प्रवाहामुळं आजच्या कुठल्याही कथेच्या जोडीनं वाचल्या जाण्याची त्यांची निश्चितच पात्रता आहे. 'नवकथांचा वेगळा प्रवाह' असे मी त्यांना म्हटले ते त्यामुळेच.

**निशिकांत मिरजकर**

[ 'सीताराम एकनाथ'– व्यंकटेश माडगूळकर – किंमत साडेचार रुपये – मौज प्रकाशन–पृष्ठे १५२ ]

# व्होल्गा जेव्हा लाल होते

२२ जुलै १९६७

१८९७ च्या उन्हाळयातली गोष्ट. लिऑं ट्रॉटस्की आणि ग्रेगरी सोकोलोव्हस्की हे दोघेजण निकोलेव्हच्या रस्त्यावरून फेरफटका मारीत होते. एवढ्यात कोणीतरी येऊन बातमी सांगितली– 'पीटर्सबर्गच्या तुरुंगात वेत्रोव्हा नावाच्या तरुणीनं स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या केलीय.' ही बातमी ऐकताच ट्रॉटस्की कमालीचा अस्वस्थ झाला. तो सोकोलोव्हस्कीला म्हणाला, "ग्रेगरी, आता नुसता विचार पुरे झाला. काही तरी केलं पाहिजे. इथले काही कामगार–कार्यकर्ते तुझ्या ओळखीचे आहेत ना ?"

"हो," सोकोलोव्हस्की सांगत होता. "इथला इव्हॅन मुखिन नावाचा एक चांगला कार्यकर्ता माझ्या परिचयाचा आहे. आपण त्याच्याकडे जायचं का ?"

सतरा वर्षांचे ते दोघे तरुण आपल्याकडे आलेले पाहून मुखिनला आश्चर्यच वाटले. परंतु त्या तिघांची पहिली बैठक चांगलीच रंगली. झारशाहीविरुद्ध कामगारांची संघटना उभारली पाहिजे, एवढे या पहिल्या बैठकीतच ठरले. त्यानंतर ते तिघेजण वारंवार भेटू लागले. लवकरच ट्रॉटस्कीच्या खोलीवर एका नव्या कामगार संघटनेची पाटी झळकू लागली– (साऊथ रशियन वर्कर्स युनियन.)



वि. स. वाळिंबे

८

ही कामगार संघटना स्थापन केल्यानंतर युक्रेनमधल्या कामगारांना संघटित करण्यासाठी ट्रॉटस्की अहोरात्र खपू लागला. आठवड्यातून तो एकदा ओडेसालाही जाऊन येत असे. प्रवासाचा खर्च वाढू नये म्हणून तो बोटीच्या डेकवरच झोपत असे. त्याचप्रमाणे शक्यतो प्रवासात फारसा वेळ जाऊ नये यासाठी बराचसा प्रवास तो रात्रीच करी. शुक्रवारी रात्रीच्या बोटीने ओडेसाला जायचे व शनिवारी किंवा रविवारी रात्री तेथून निघून निकोलेव्हला परतायचे असा त्याचा परिपाठ असे. ओडेसाला जाण्यात आणखीही एक हेतू होता. ओडेसा हे बंदर असल्यामुळे पश्चिम युरोपमध्ये प्रसिद्ध होणारे क्रांतिवाङ्मय बोटीवरच्या खलाश्यांमार्फत तेथे येत असे. ट्रॉटस्की हे वाङ्मय मोठ्या शिताफीने निकोलेव्ह येथे आणत असे व तेथून ते दक्षिण रशियातल्या निरनिराळ्या शहरी धाडले जाई. या काळात ट्रॉटस्की इतके परिश्रम करीत असे की झिव्हसारखे त्याचे निकटचे सहकारीदेखील थक्क होऊन जात. 'ट्रॉटस्कीच्या उत्साहाला आणि कष्टांना सीमा नव्हती,' असे झिव्हने आपल्या आठवणीत नमूद केले आहे.

ट्रॉटस्कीच्या कार्याचा हा झपाटा पाहून अॅलेक्झांड्रा सोकोलोव्हस्काया पुन्हा त्याच्याकडे नकळत आकर्षित झाली. ट्रॉटस्की मार्क्सवादावर टीका करीत असल्यामुळे ती प्रारंभी त्याच्यावर रुष्ट झाली होती. परंतु आता सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या ध्येयधोरणाला अनुरूप असेच ट्रॉटस्कीच्या नव्या कार्याचे स्वरूप असल्यामुळे अॅलेक्झांड्राच्या मनातील त्याच्याबद्दलचा प्रारंभीचा राग केव्हाच विरघळून गेला होता. त्यामुळे तीही ट्रॉटस्कीबरोबर साऊथ रशियन वर्कर्स युनियनच्या कामकाजात भाग घेऊ लागली. अॅलेक्झांड्राचा सहवास लाभू लागल्यामुळे ट्रॉटस्कीही प्रसन्न होता. या आनंदाच्या भरात त्याने युनियनच्या चार प्रमुख नेत्यांचे छायाचित्र काढण्याचे ठरविले. या छायाचित्राच्या वेळी अॅलेक्झांड्रा ट्रॉटस्कीजवळ उभी होती. ते छायाचित्र पाहिले की ट्रॉटस्कीसंबंधी अॅलेक्झांड्राच्या मनात कोणती भावना निर्माण झाली होती याची कल्पना येते. ट्रॉटस्कीच्या बुद्धिवैभवाने आणि अंगीकृत कार्यावरील निष्ठेने भारावून गेल्याचा भाव अॅलेक्झांड्रा छायाचित्राच्या वेळीही लपवू शकली नाही. या छायाचित्रात ट्रॉटस्की व अॅलेक्झांड्रा यांच्यासमवेत अॅलेक्झांड्राचा भाऊ इल्या व ट्रॉटस्कीचा मित्र झिव्ह यांचाही समावेश आहे. या छायाचित्राच्या चार प्रती काढण्यात आल्या व प्रत्येक प्रतीवर चौघांनी स्वाक्षऱ्या करून नव्या कार्याची स्मृती म्हणून त्या आपल्या संग्रही ठेवल्या. झिव्ह लवकरच वैद्यकीय शिक्षणाच्या शेवटच्या वर्षासाठी कझानला जाणार होता म्हणून त्याला दिलेल्या छायाचित्राच्या प्रतीखाली ट्रॉटस्कीने लिहिले–'कृतिविना निष्ठा मृत्युसमान आहे.' ट्रॉटस्कीने हे शब्द खोडून टाकावेत, असे अॅलेक्झांड्राने सुचविले. तिचा तो प्रेमळ आग्रह ट्रॉटस्कीने मान्य केला.

ट्रॉटस्की आणि अॅलेक्झांड्रा यांच्या प्रयत्नांमुळे युनियनच्या कार्याचा व्याप वाढू लागला. कामगारांच्या न्याय्य अधिकारांसाठी लढणे हे या युनियनचे उघड सांगितले जाणारे उद्दिष्ट होते. परंतु मूळ उद्दिष्ट होते ते मार्क्सवादी संघटना उभारण्याचे. सध्याची निरंकुश झारशाही उलथून पाडून तिच्या जागी श्रमजीव वर्गाची अधिसत्ता स्थापन करण्यासाठी क्रांतीची पूर्वतयारी करण्याकरिता ही सारी धडपड होती. त्यासाठी युनियनच्या निवडक सदस्यांच्या शहराबाहेर जंगलात गुप्त बैठकी भरत व त्या वेळी ट्रॉटस्कीने ओडेसाहून आणलेल्या ''कम्युनिस्ट जाहीरनाम्या'चे वाचन होई. या बैठकीमध्ये जी गाणी म्हटली जात त्यांचे ध्रुपद 'क्रांती आता अटळ आहे' अशाच आशयाचे असे. नेस्तेरंको या सुताराने तर कार्ल मार्क्सवरच गीत रचले होते. 'महान द्रष्ट्याचे आगमन' असे त्या कवितेचे शीर्षक होते. ट्रॉटस्कीने लिहिलेले प्रचारसाहित्यही या अशा बैठकीमार्फतच निरनिराळ्या शाखांमध्ये वाटले जात असे. हे प्रचारसाहित्य छापण्यासाठी मुखिनच्या घरामध्ये छोटासा छापखानाही सुरू करण्यात आला होता.

ट्रॉटस्कीच्या पत्रकांनी कामगारजगतामध्ये खूपच खळबळ निर्माण होई. त्याच्या

लेखणीतला आवेश आणि अत्यंत नेटक्या शब्दांत आपले विचार सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचविण्याचे त्याचे कौशल्य या दोन गुणांमुळे त्याचे साहित्य मोठ्या आवडीने वाचले जाऊ लागले. निकोलेव्हमधल्या कोणत्याही कारखान्यांमधील कामगारांवर अन्याय होवो, ट्रॉटस्की ताबडतोब त्यासंबंधीची सर्व माहिती मिळवून त्या माहितीच्या आधारे मालकांच्या अरेरावीवर तिखट शब्दांत हल्ला चढवी. कामगारवर्गातील ट्रॉटस्कीची हळूहळू वाढत चाललेली लोकप्रियता गुप्त पोलिस खात्याच्या नजरेस येत होती. निकोलेव्हमधल्या पोलिस प्रमुखांनी ट्रॉटस्कीच्या लोकप्रियतेला आवर बसावा यासाठी नवाच परिपाठ सुरू केला. ते स्वतः प्रत्येक कारखान्यात जाऊन कामगारवर्गाच्या अडीअडचणींची माहिती मिळवीत व त्या अडीअडचणी दूर करण्याची मालकांना विनंती करीत. कारण कामगारावरील अन्यायामुळेच ट्रॉटस्कीला आणि त्याच्या साऊथ रशिया वर्कर्स युनियनला कामगारजगतात प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली आहे हे त्यांच्या ध्यानात आले होते. एकदा का आपणच प्रतिष्ठेचे मूळ नाहीसे केले की कामगार ट्रॉटस्कीकडे जाणार नाहीत अशी त्यांची अटकळ होती. परंतु पोलिसांच्या या वर्तनाचा परिणाम नेमका उलटा झाला. ट्रॉटस्कीच्या दडपणामुळे पोलिसखाते जागे झाले आहे हे कामगारांनाही समजत नव्हते असे नाही; त्यामुळे ट्रॉटस्कीसंबंधीच्या आदरात भरच पडली.

केवळ किरकोळ आणि जुजबी पत्रके काढून ट्रॉटस्कीसारख्या लेखणीवर नितांत प्रेम करणाऱ्या व्यक्तीला स्वस्थ बसणे शक्य नव्हते. त्याने 'अवर कॉज' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. पाठ दुखू लागली तरीदेखील तो संपूर्ण दिवसभर खुर्चीवर बसून 'अवर कॉज' चा मजकूर लिहीत बसे. 'अवर कॉज'चा जवळ जवळ संपूर्ण अंक त्याच्या एकट्याच्याच लिखाणाने भरलेला असे. ट्रॉटस्कीच्या या गुप्त वृत्तपत्राचा खप केवळ निकोलेव्हपुरताच मर्यादित राहिला नाही. युक्रेनमधल्या अनेक शहरांत तो धाडला जात असे. 'अवर कॉज' हे पत्र कोठे निघते याचा पोलिसांना नेमका सुगावा लागलेला नव्हता. परंतु त्यांना ट्रॉटस्कीचा संशय येऊ लागल्यामुळे त्याच्यावर पोलिसांची सारखी पाळत राहू लागली. त्याच्याकडे जाणाऱ्या–येणाऱ्यांकडून माहिती काढण्याचे प्रयत्न वारंवार होऊ लागले. काही जणांनी तर ट्रॉटस्कीच्या गोतावळ्यात मिसळून जाऊन तेथल्या हालचाली पोलिसांना कळविण्याचा धंदाच सुरू केला. मार्क्सवर मोठी आवेशपूर्ण गीते रचणारा नेस्तेरंकोदेखील पोलिसांचा 'खबऱ्या' झाल्याचे ट्रॉटस्कीला जेव्हा कळले तेव्हा त्याला धक्काच बसला. आता तो अधिक सावधगिरी बाळगून हिंडू फिरू लागला. त्यामुळे ट्रॉस्कीच्या हालचालीसंबंधी पोलिसांना मिळणाऱ्या बातम्या अपुऱ्या असत. ट्रॉटस्की आणि त्याचे सहकारी काय करीत आहेत याची पुराव्यानिशी माहिती पुरविणाऱ्यास पैशाची आमिषे दाखविली जाऊ लागली.

'अवर कॉज'चा तिसरा अंक १८९८च्या जानेवारीमध्य बाहेर पडल्यानंतर ट्रॉटस्की श्विगोव्हस्कीला भेटण्यासाठी त्याच्या मळ्यावर गेला. पोलिस मळ्या भोवती घिरटचा घालीत आहेत हे ट्रॉटस्कीच्या कानावर घालण्यासाठी अॅलेक्झांड्राची धाकटी बहीण मारिआ मळ्यात गेली. या वेळी अॅलेक्झांड्रा येकाटेरिनोस्लाव्ह या गावी होती. ट्रॉटस्कीला अटक होण्याचा संभव आहे असे तिला कळताच लगबगीने निकोलेव्हला परतली व श्विगोव्हस्कीच्या मळ्यावर गेली. पोलिसांचे काम आता अधिकच सोपे झाले होते. श्विगोव्हस्कीच्या मळ्यात ट्रॉटस्की, अॅलेक्झांड्रा व मारिआ यांना अटक करण्यात आली. झिव्ह कझान विद्यापीठामधील आपला शिक्षणक्रम आटोपून निकोलेव्हला परतताच तोही पकडला गेला. ट्रॉटस्कीजवळ जे कागदपत्र सापडले त्याआधारे निकोलेव्ह शहरात युनियनच्या कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली. एका महिन्याच्या आत युनियनच्या दोनशे कार्यकर्त्यांना तुरुंगाच्या गजाआड बंद करण्यात आले. जानेवारी म्हणजे कडक थंडीचा महिना. त्यातून राजबंदी म्हणून सवलती देण्यास अधिकाऱ्यांनी नकार दिलेला. त्यामुळे या कार्यकर्त्यांना तुरुंगात फार सहन करावे लागले. एकाने तर या त्रासास कंटाळून आत्महत्त्या केली. एकजण भ्रमिष्टासारखा वागू लागला.

ट्रॉटस्कीचा हा पहिला तुरुंगवास होता. यापुढे त्यास या जीवनाची बरीच ओळख होणार होती. पुढच्या आयुष्यात त्याने एकंदर वीस तुरुंग पाहिले. ट्रॉटस्कीला अटक झाल्याची बातमी कळताच त्याच्या आईवडिलांना परमावधीचे दुःख झाले. हातातोंडाशी आलेला आपला हा हुशार मुलगा लवकरच इंजिनियर होईल अशी स्वप्ने पाहणाऱ्या या मातापित्यांचा, त्याच्या तुरुंगवासाची बातमी ऐकताच धीर सुटला. स्वतः ट्रॉटस्की मात्र तुरुंगवासाविषयी बेफिकीर होता. त्याची कोठडी इतर कोठड्यांपेक्षा काहीशी दूर होती. त्यामुळे त्याला बाहेर काय चालले आहे याची काहीच माहिती मिळेना. आपल्यापैकी कोणाकोणाला अटक झाली आहे, पकडलेल्यांपैकी कोणाची सुटका झाली आहे, हे काहीच कळत नव्हते. थंडीचे निवारण व्हावे अशी कोठडीत कोणतीच व्यवस्था नसे. त्यामुळे इतर कार्यकर्त्यांप्रमाणे ट्रॉटस्कीलाही बराच त्रास सहन करावा लागला. सारी रात्र केवळ साध्या गवताच्या चटईवर झोपून काढावी लागे. सारा दिवस कोठडीत बसून काढावा लागत असल्यामुळे भावी जीवनाची रूपरेषा आखण्यावाचून मनाला दुसरा विरंगुळा नव्हता.

निकोलेव्हच्या तुरुंगात तीन आठवडे काढल्यानंतर ट्रॉटस्कीला खेर्सनच्या तुरुंगात हलविण्यात आले. येथेही तो बाहेरच्या जगापासून दूरच पडला होता. कारण भेटीगाठीची बंदी होती. शिवाय वर्तमानपत्राचा तुकडाही आत येणे अशक्य होते. खेर्सनच्या तुरुंगात ट्रॉटस्की तीन महिने होता. या तीन महिन्यांत त्यास कधी आंघोळीला पाणी मिळाले नाही की कधी कपडे धुता आले नाहीत. शिवाय कागद

नाही. पेन्सिल नाही. पुस्तके नाहीत. काही नाही. अशा एकाकी अवस्थेत वेळ जावा म्हणून कविता रचण्याचा छंद त्याने मनाला लावून घेतला. पहिली कविता पाठ झाली की दुसरी कविता रचावयाची. या कामात तो मार्क्सवादाने भारून गेला असल्यामुळे प्रत्येक कवितेवर मार्क्सवादी विचारसरणीची छाप असे.

तीन महिन्यांनंतर एके दिवशी तुरुंगाधिकारी ट्रॉटस्कीच्या खोलीत आला तो उशी, गरम पांघरूण, साबण चहा, साखर आदी वस्तू घेऊन! या वस्तू आपल्याला कोणी धाडल्या आहेत हे तुरुंगाधिकाऱ्याला न विचारताही ट्रॉटस्कीला कळले होते. त्याने जरी वडिलांची मदत घेण्यास नकार दिला होता तरी आपला मुलगा तुरुंगात हालअपेष्टा सहन करीत असताना आई-वडिलांना स्वस्थ बसवणे अशक्य होते. आपल्या मुलाला कोणत्या तुरुंगात ठेवले आहे याची डेव्हिड ब्रोन्स्टेईन सतत चौकशी करीत होते. शेवटी ट्रॉटस्की खेर्सनच्या तुरुंगात आहे हे कळल्यानंतर त्यांनी 'एवढ्या वस्तू तरी आमच्या मुलाला नेऊन द्या' अशी तेथल्या अधिकाऱ्याला गळ घातली, इतकेच नव्हे तर या अधिकाऱ्याने डेव्हिड ब्रोन्स्टेईन यांना आपल्या मुलास भेटूही दिले.

खेर्सनच्या तुरुंगात तीनएक महिने काढल्यानंतर ट्रॉटस्कीला ओडेसाच्या तुरुंगात हलविण्यात आले. तेथे त्याला राजबंदी म्हणून बऱ्याच सवलती मिळू लागल्या. एकतर इतर गुन्हेगारांपेक्षा त्याला वेगळे ठेवण्यात आले होते. शिवाय तुरुंगाच्या ग्रंथालयातील पुस्तके वाचावयास मिळू लागली. क्वचित बाहेरून पुस्तके मागविण्याची परवानगी देण्यात आली. कागदपेन्सिलीची सोय झाल्यामुळे वाचनाबरोबरच लेखनाचीही व्यवस्था झाली. पुस्तकांच्या देवघेवीमुळे तुरुंगाबाहेर सांकेतिक भाषेत निरोप पोचविण्याचे काम सुकर झाले. झिव्ह व शिवगोव्हस्की याच तुरुंगात होते. त्यामुळे तेही वारंवार भेटू लागले. 'आता मी पक्का मार्क्सवादी झाला आहे,' असे ट्रॉटस्कीने झिव्हला पहिल्याच भेटीत सांगितले. झिव्हने हे संभाषण अॅलेक्झांड्राला कळविले तेव्हा ती म्हणाली, "माझी खात्री होती की हा बुद्धिमान तरुण एक दिवस योग्य मार्गावर खचित येईल. आता यापुढे तो सांगेल ते सारे ऐकायचे."

ओडेसाच्या तुरुंगात अनेक धर्मग्रंथ होते. ट्रॉटस्कीने ते सारे वाचून काढले. तेथेच त्याने फ्रेंच, जर्मन, इंग्रजी व इटालियन या भाषांचा अभ्यास केला. प्लेखानोव्हचा 'दि मोनिस्टिक कन्सेप्शन ऑफ हिस्टरी', अँटोनियो लॅब्रिओलचा 'ए केज इन हिस्टॉरिकल मटेरिआलिझम', डार्विनचा 'ओरिजिन ऑफ स्पेसिज' आदी ग्रंथही त्याच्या वाचनात आले. डार्विनच्या ग्रंथाबद्दल मॅक्स ईस्टमन या आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रात ट्रॉटस्की म्हणतो, 'हा ग्रंथ म्हणजे विश्वाच्या महाप्रचंड मंदिराचे जणू प्रवेशद्वारच आहे. या ग्रंथातील सूक्ष्म निरीक्षण व सखोल

प्रतिपादन खरोखरच अजोड आहे. मला आश्चर्य वाटते ते एवढेच की विश्वाच्या उपपत्तीची सांगड घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या डार्विनसारख्या प्रकांडपंडिताचाही देवावर विश्वास असावा. एका बाजूला तर्ककर्कश विद्वत्ता आणि दुसऱ्या बाजूला हा असला धर्मभोळेपणा एकाच मेंदूत कसा काय नांदू शकतो ! '

१८९८ व १८९९ ही दोन वर्षे ट्रॉटस्कीने ओडेसाच्या तुरुंगात काढली. सरकारने आमच्यावरील आरोपाची चौकशी करून एकदा काय तो निर्णय करावा पण सध्याची अनिश्चिततेची अवस्था संपली पाहिजे, अशा आशयाचा अर्ज ट्रॉटस्की प्रभृति सर्व स्थानबद्धांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे धाडला. १८९९ च्या नोव्हेंबरमध्ये सरकारकडून या अर्जास जे उत्तर आले त्यात ट्रॉटस्कीला चार वर्षे पूर्व सैबेरियात हद्दपार म्हणून राहण्याची शिक्षा सुनावण्यात आली. अ‍ॅलेक्झांड्राला व तिच्या दोन भावांनाही हीच शिक्षा मिळाली. डॉ. झिव्हची हद्दपारीची मुदत एक वर्षाने कमी होती याशिवाय कोणास एक वर्ष, कोणास दोन वर्षे हद्दपारीची अशा इतर दुय्यम कार्यकर्त्यांना शिक्षा सांगण्यात आल्या. दोन वर्षांच्या एकांतवासानंतर सैबेरियात का होईना, पण माणसात राहावयास मिळणार आहे या जाणिवेने सर्वचजण आनंदित झाले.

सैबेरियाला जाण्यापूर्वी अ‍ॅलेक्झांड्राशी विवाहबद्ध होण्याचे ट्रॉटस्कीने ठरविले. परंतु वडिलांच्या परवानगीशिवाय त्याला लग्न करता येण्यासारखे नव्हते. कारण रशियन कायद्याप्रमाणे अद्याप तो सज्ञान नव्हता. एक महिन्यापूर्वीच त्याला एकविसावे वर्ष लागले होते. वडिलांना न विचारता लग्न करावयाचे असेल तर आणखी किमान अकरा महिने थांबावयास हवे होते. परंतु सैबेरियात आपल्याला आणि अ‍ॅलेक्झांड्राला एकत्र राहावयाचे असेल तर तेथे जाण्यापूर्वीच विवाहबद्ध होणे आवश्यक आहे हे ट्रॉटस्कीच्या ध्यानात आले ! नाही तर त्या दोघांना निरनिराळ्या गावांत दिवस काढावे लागले असते. अ‍ॅलेक्झांड्राशिवाय राहणे ही गोष्ट त्याला आता मानवण्यासारखी नव्हती. म्हणून तुरुंगाधिकाऱ्यामार्फत त्याने विवाहासाठी वडिलांची परवानगी मागितली. डेव्हिड ब्रोन्स्टेईन यांचा या विवाहाला विरोध होता. एकतर अ‍ॅलेक्झांड्राच्या नादानेच आपला मुलगा मार्क्सवादी चळवळीकडे खेचला गेला अशी त्यांची तक्रार होती. शिवाय अ‍ॅलेक्झांड्रा ट्रॉटस्कीपेक्षा दहा वर्षांनी मोठी होती. वडिलांच्या विरोधास न जुमानता अ‍ॅलेक्झांड्राशी लग्न करण्याचे ट्रॉटस्कीने ठरविले. परंतु कायदा वडिलांच्या बाजूने होता. त्यांतून तुरुंगाधिकाऱ्यांनी या लग्नास परवानगी देण्याचे ठरविले तर त्यांची तोंडे बंद करण्यास डेव्हिड ब्रोन्स्टेईन यांनी आपली पिशवी सैल करण्याचे ठरविले होते.

ओडेसातील स्थानबद्धांची तुकडी सैबेरियाला धाडण्यासाठी प्रथम मॉस्कोला नेण्यात आली. इतर शहरांतले स्थानबद्ध मॉस्कोला येऊन पोहोचल्यानंतर सर्वांची एकदमच सैबेरियाकडे रवानगी होणार होती. मॉस्कोच्या तुरुंगात असताना लेनिन

हे नाव प्रथमच ट्रॉटस्कीच्या कानांवर पडले. मग त्याने तुरुंगात 'दि डेव्हलपमेंट ऑफ कॅपिटालिझम इन रशिया' हा लेनिनचा ग्रंथ वाचून काढला. हा ग्रंथ वाचून झाल्यानंतर मार्क्सवादाच्या प्रचारासाठी आपण कादंबरी लिहावी असा ट्रॉटस्कीचा विचार होता. परंतु तो कधीच कृतीत उतरला नाही.

मॉस्कोच्या तुरुंगात ठेवण्यात आलेल्या स्थानबद्धांना आठवड्यातून दोनदा आपल्या आप्तेष्टांना भेटण्याची परवानगी देण्यात आली. आपली प्रेयसी म्हणून ट्रॉटस्कीने अॅलेक्झांड्राचे नाव कळवले. यामुळे त्या दोघांची आठवड्यातून दोनदा भेट होऊ लागली. एरवी दोघे एकाच तुरुंगात असूनही परपस्परांना भेटू शकत नव्हते. या भेटीगाठीच्या निमित्ताने ट्रॉटस्कीने अॅलेक्झांड्राशी आपल्याला विवाह करण्याची परवानगी देण्याविषयी मॉस्कोच्या तुरुंगाधिकाऱ्यांचे मन वळविले. आपल्या वडिलांना याची गंधवार्ताही लागणार नाही, अशी त्याने दक्षता घेतली. १९०० च्या प्रारंभी मॉस्कोच्या तुरुंगात लिऑं ट्रॉटस्की व अॅलेक्झांड्रा सोकोलोव्हस्काया यांचा विवाह झाला.

झारशाहीच्या तुरुंगात सत्तावीस महिने काढल्यानंतर १९०० च्या मेमध्ये ट्रॉटस्की आणि अॅलेक्झांड्रा या नवदांपत्याचा सैबेरियाच्या दिशेने प्रवास सुरू झाला. 'साऱ्या प्रवासात ट्रॉटस्की अॅलेक्झांड्राभोवती भिरभिरत होता' असे झिव्हने लिहिले आहे. मंगोलियाच्या सीमेवरील इर्कुत्स्क येथपर्यंत सर्वांनी एकत्र प्रवास केला. त्यानंतर प्रत्येकाचा मार्ग वेगळा होणार होता. ट्रॉटस्की व अॅलेक्झांड्रा लेना नदीच्या तीरावरील उस्त-कत या खेड्यात राहावयास गेले. चारपाचशे वस्तीच्या या छोटेखानी खेड्याभोवती दाट जंगल पसरले होते. परंतु भोवतालच्या या निसर्गसौंदर्याकडे लक्ष द्यायला ट्रॉटस्कीला फुरसत नव्हती. एकतर तो लेखन-वाचनात दंग असायचा किंवा अॅलेक्झांड्राच्या बाहुपाशात विसावलेला असायचा.

मार्क्सवादासारख्या समुदायवादी विचारसरणीत प्रेम, मृत्यू, मैत्री, दया, आशा, निराशा आदी व्यक्तिगत जीवनातील भावभावनांना काही स्थान आहे की नाही यासंबंधी चिंतन करण्यात ट्रॉटस्कीचे तासच्यातास जाऊ लागले. सैबेरियातील वास्तव्यात या दांपत्याला दोन मुली झाल्या. झिना आणि नीना. ट्रॉटस्कीचे विधिलिखित असे होते की त्याच्या आयुष्याशी ज्यांचे जीवन निगडित झाले आहे त्यांच्या नशिबी दुःखदायक शेवट यावयाचा. झिन आणि नीना याही या नियमास अपवाद ठरल्या नाहीत. उस्त-कत येथे राहावयास गेल्यापासून ट्रॉटस्कीला दरमहा किरकोळ खर्चासाठी एकोणीस रुबल्स मिळू लागले. परंतु चौघांचा खर्च त्यात भागेना म्हणून त्याने एका व्यापाऱ्याकडे हिशेब लिहिण्याचे काम सुरू केले. पण या रुक्ष कामात त्याचे लक्ष लागेना. एकदा त्याने चाळीस पौंड शिशाचे बिल करण्याऐवजी सोळाशे पौंडांचे केले. असला निष्काळजी हिशेबनीस त्या व्यापाऱ्यास परवडण्यासारखा नव्हता.

हिशेबनिसाचे काम सुटल्यानंतर ट्रॉटस्की 'ईस्टर्न रिव्हयू' या वृत्तपत्राचा स्थानिक

बातमीदार म्हणून काम करू लागला. हे काम त्याच्या स्वभावाशी जुळण्यासारखे होते. 'अँटिड ओटो' या टोपण नावाने तो हे लिखाण करीत असे. पुढल्या जीवनात जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी ट्रॉटस्कीवर अनेक वेळा वृत्तपत्रीय लिखाण करण्याची पाळी आली. 'ईस्टर्न रिव्ह्यू'मधले लिखाण हा त्याचा केवळ प्रारंभ होता. सरकारी परवानगी मिळाल्यानंतर ट्रॉटस्की कुटुंब व्हेर्खोलेनस्क या गावी राहावयास आले. हे गाव उस्त-कतपेक्षा बरेच मोठे होते. शिवाय इतर काही राजबंदीही तेथे राहत होते. त्यामुळे दिवसाचे लेखन-वाचनाचे काम आटोपले की ट्रॉटस्की या राजबंद्यांबरोबर प्रचलित परिस्थितीविषयी चर्चा करीत असे. या काळात त्याचे मत अराजकवादाकडे आकर्षित होऊ लागले. शिक्षणमंत्री बोगोलेपोव्ह यांच्या खुनापाठोपाठ गृहमंत्री सिपॅगिन यांच्या खुनाची बातमी येऊन थडकताच पूर्व सैबेरियातील राजबंद्यांत नवा उत्साह संचरला. जो तो क्रांतीचा क्षण नजीक आल्याचे भविष्य वर्तवू लागला. क्रांतीसाठी दहशतीचे वातावरण निर्माण करावे की नाही यासंबंधी वादविवाद होई तेव्हा ट्रॉटस्की दहशतवाद हा क्रांतीचा मार्ग नसल्याचे प्रतिपादन करी.

सैबेरियातील रेल्वेकामगारांमध्ये सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे कार्य सुरू होताच ट्रॉटस्की या कामगारांसाठीही प्रचारसाहित्य लिहू लागला. रशियातून इतर प्रचारसाहित्यही मागविण्यात येऊ लागले. त्यातच लेनिनची 'व्हॉट इज टु बी डन ?' ही गाजलेली पुस्तिका व 'इस्क्रा'चे काही अंक ट्रॉटस्कीच्या हाती पडले. लेनिनच्या लिखाणामुळे ट्रॉटस्कीची वैचारिक दिशा स्थिर होऊ लागली. लेनिनचे 'इस्क्रा'मधील लिखाण इतके प्रक्षोभक होते की राजबंद्यांना सैबेरियातून पळून जाऊन नवे कार्य हाती घेण्याची प्रेरणा व्हावी. हे धाडस प्राणांवर बेतण्याचा धोका माहीत असून सैबेरियातून पळून जाण्याचा विचार बळावू लागला. हळूहळू एकेक राजबंदी या ना त्या मार्गाने पलायन करू लागला. ट्रॉटस्कीलाही स्वस्थ बसवेना. त्याने अॅलेक्झांड्रा सांगेल तसे करण्याचे ठरविले. अॅलेक्झांड्रा धीराची बाई होती. दुसरी मुलगी अवघी चार महिन्यांची असतानाही तिने आपल्या सुखाचा विचार न करता ट्रॉटस्कीला सांगितले, " लिआँ, तू पश्चिम युरोपात जाऊन लेनिनला भेटावंस असं मला वाटतं. "

एका अंधाऱ्या रात्री ट्रॉटस्कीने व्हेर्खोलेनस्क सोडले. बैलगाडीत खच्चून गवत भरले होते व त्यात तो लपला होता. पोलिसांना संशय येऊ नये म्हणून अॅलेक्झांड्राने पलंगावर ट्रॉटस्कीच्या शरीरासारखी आकृती तयार करून तिच्यावर जाडसर पांघरूण घातले. 'ट्रॉटस्की आजारी असून त्याला कोणीही भेटावयास येऊ नये' असे तिने पोलिसांच्या देखत कार्यकर्त्यांना बजावल्यामुळे पोलिसांना हा बनाव कळू शकला नाही. चार दिवसांच्या बैलगाडीतील प्रवासानंतर ट्रॉटस्कीने समारास जाणारी आगगाडी पकडली. व्हेर्खोलेनस्क येथून निघण्यापूर्वी त्याने बनावट पासपोर्टही तयार करून घेतला होता. या पासपोर्टवर कोणते नाव लिहावे असा तो विचार करीत

असताना त्याला ओडेसातील तुरुंगाधिकाऱ्याचे नाव आठवले. तेच नाव स्वतःसाठी वापरण्याचे ठरविताच त्याने पासपोर्टवर सही ठोकली–' ट्रॉटस्की. ' बनावट पासपोर्टसाठी घेतलेले हे नाव त्याला कायमचे चिकटले.

समाराला पोचल्यानंतर ट्रॉटस्कीने ' इस्का 'चा प्रतिनिधी क्लेअर याची भेट घेतली. ट्रॉटस्कीच्या बुद्धिमत्तेने क्लेअर प्रभावित झाला. त्यामुळे अशा या बुद्धिमान तरुणाला लेनिनकडे पाठविण्याचे क्लेअरने ठरविले. ट्रॉटस्कीही याच संधीची वाट पाहत होता. क्लेअरने ट्रॉटस्कीला सांगितले, ' मी तुझ्याबद्दल क्रुपस्कायाला पत्र लिहितो. त्यात ट्रॉटस्की या नावाचा उल्लेख करणे धोक्याचे ठरेल. कारण जर का हे पत्र चुकून पोलिसांच्या हाती पडले तर तुला आणि तुझ्या पासपोर्टला इथेच अडकून पडावे लागेल. म्हणून तुला या प्रवासात दुसरे एखादे टोपण नाव घ्यावे लागेल. मी क्रुपस्कायाला कोणचे नाव कळवू ? "

" ठीक आहे. ' पेरो ' असे माझे नाव लिहा. " ट्रॉटस्कीने उत्तर दिले.

नंतर क्लेअरने क्रुपस्कायाला पत्र लिहिले—' पेरो ' नावाचा तरुण कमालीचा बुद्धिमान आहे. तो जणू लहानसा गरुडच आहे म्हणेनास ! त्याला तिकडे पाठवू का ?'

क्रुपस्कायाचे उत्तर येईपर्यंत क्लेअरने ट्रॉटस्कीला पक्षसंघटनेचे काम करावयास सांगितले. या कामांसाठी तो खार्कोव्ह, पोलताव्हा, किएव्ह या शहरी जाऊन आला. परंतु हे काम त्याला नीट जमू शकले नाही. कुशल संघटकाच्या अंगी आवश्यक असणाऱ्या गुणांचा ट्रॉटस्कीमध्ये अभाव आहे हे क्लेअरला आढळून आले. म्हणून त्याने ट्रॉटस्कीला समाराहून निघणाऱ्या ' सदर्न वर्कर ' या पत्रासाठी मजकूर लिहिण्याचे काम दिले. ट्रॉटस्कीचे ' सदर्न वर्कर ' मधून ' पेरो ' या नावाने प्रसिद्ध होणारे लिखाण इतके चांगले होते की ते लेनिनच्या वाचनात येताच त्याने क्लेअरला कळविले, ' पेरोला इकडे धाडून दे. '

समाराहून ट्रॉटस्की लंडनला जाण्यासाठी निघाला. पण क्लेअरने दिलेले पैसे व्हिएन्नाला पोचेपर्यंत संपून गेले होते. तरीही ट्रॉटस्की डगमगला नाही. तो थेट ऑस्ट्रियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या कचेरीत गेला व तेथल्या व्हिक्टर अॅडलेर या पक्षप्रमुखाकडून थोडेसे पैसे मिळविले. त्या आधारावर ट्रॉटस्कीने झुरिचपर्यंतचा प्रवास पुरा केला. तेथे पुन्हा पैशाचा प्रश्न निर्माण होताच ट्रॉटस्कीने कोणताही संकोच न करता पहाटे तीन वाजता अॅक्सेलरॉडचे दार ठोठावले. अॅक्सेलरॉडने दिलेल्या पैशामुळे स्वारी अखेर लंडनला येऊन पोचली. स्टेशनपासून लेनिनच्या घरी जाण्याइतकेही पैसे उरले नव्हते. म्हणून त्याने टॅक्सी केली. ट्रॉटस्की लेनिनच्या घरापाशी पोचला तेव्हा सकाळचे सहा वाजले होते. लेनिन नेहमी लवकर उठत असे. पण आज मात्र तो सहा वाजून गेले तरी उठलेला नव्हता. ट्रॉटस्कीने दरवाजा ठोठावण्यास प्रारंभ केला. क्रुपस्कायाने दार उघडताच ट्रॉटस्की म्हणाला " मी पेरो. खाली टॅक्सी उभी आहे. तिचे पैसे द्यायचे आहेत. ' (क्रमशः)

# क्री डां ग ण

**विबल्डन | अ‍ॅथ्लेटिक्स | कुस्तीगीरांचे मैदान**

**समीक्षक | मनोहर रेगे |**

## ☐ आशेचा किरण !

नव्वद वर्षांचे हौशी टेनिसपटूंचे विबल्डन संपले ते अनुभवी नि दर्जेदार खेळाडूंच्या अनपेक्षित 'निकालां'नी ! उदयोमुख आणि ऐटदार तरुणांनी त्यांच्या जागा यंदा पटकाविल्या. मॅन्युअल संताना, रॉय इमर्सन, रामनाथन् कृष्णन्, मॅरिआ ब्युनो असे पुरुष आणि महिला प्रारंभीच गडबडले आणि चार्ली पॅसारेल, निकोला पिलिक्, मार्टी रिस्सेन, रोझ् मेरी कॅसल्स यांचा टेनिस क्षितिजावर सर्वांनी कौतुकाने पाहावे असा उदय झाला. ऑस्ट्रेलियाचे न्यूकोंब आणि अमेरिकेच्या मिसेस बिली जीन किंग यांनी अनुक्रमे पुरुष व महिला विभागांचे एकेरी विजेतेपद संपादिले. पण विबल्डनला हौशी खेळाडूंपासून व्यावसायिक टेनिसपटूंच्या कचाटचात सापडवण्याचा घोर ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि फ्रान्स यांना लागला आहे. बरोबरच आहे. उघड माथ्याने पैसे मागणारा तो धंदेवाईक आणि चोरून हात पुढे करणारा तो हौशी यांत आता व्याख्येपलीकडे अंतर राहिले आहे कोठे ? त्या अर्थाने विबल्डनचे हौशीपण केव्हाच संपले !

या विबल्डनमध्ये भारत कुठे दिसतो का ? पहिल्या फेरीत कृष्णन् आणि त्यानंतर प्रेमजितलाल, श्याम मिनोत्रा, जयदीप मुकर्जी हे एकामागून एक ढासळले. आणि अखिल भारतीय लॉन टेनिस संस्थेचे चिटणीस आर. के. खन्ना यांना घाई झाली ती 'डेव्हिस कप' जिंकण्याची ! गेल्या वर्षीचा उपविजेता भारत यंदा ब्राझील किंवा दक्षिण आफ्रिका आणि जपानबरोबर येत्या सप्टेंबरपूर्वी पूर्व–विभागात खेळणार आहे. पण कृष्णन्–मुकर्जी–लाल यांचा फॉर्म लक्षात घेता भारताचे भवितव्य कठीणच दिसते. त्यातून दक्षिण आफ्रिकेला ब्राझीलने जिंकले तर आपली आणि ब्राझीलची गाठ पडणार त्यांच्या कोर्ट्सवर आणि दक्षिण आफ्रिका आली तर त्रयस्थ मैदानावरच त्यांच्या क्लिफ् ड्रिस्डेल आणि बॉब हेविट् यांच्याबरोबर आपणांला लढत द्यावी लागणार ! चित्र मोठे विदारक आहे. नशीब आणि भारतीय खेळामधील लहर यांवरच तूर्त आपण अवलंबून राहूया. कदाचित् आर. के. खन्नांना कुठे आशेचा किरण दिसतही असावा, कुणी सांगावे !

## ❑ शिबिरातील शुकशुकाट !

पुढील वर्षीच्या मेक्सिको-ऑलिंपिक्सची पूर्वतयारी म्हणून यंदा अजमेरला जून-जुलै महिन्यांत ॲथलेटखेळाडूंचा एक शिक्षण-वर्ग भरविण्यात येणार होता. जयपूरहून आलेली बातमी सांगते की, सबंध भारतामधून १३५ पैकी ३९ खेळाडूंनीच तेथे हजेरी लावली. २ जुलैपर्यंतचे हे चित्र आहे. म्हणजे शिक्षण-शिबिर सुरू झाल्यानंतर आठवड्यानंतरचे !

सैनिकी संघ (१५), राजस्थान (१०), पश्चिम बंगाल (१०) व महाराष्ट्र (४) येथूनचा हा हजेरीपट आहे. इतर राज्यसंघ आणि रेल्वेज्, पोलीस, विद्यापीठ मंडळे अशा संस्थांमधून कुणीही अजमीरला फिरकले नाही. समाधानकारक असा त्यांच्याकडून खुलासाही नाही.

राष्ट्रीय ॲथ्लेटिक फेडरेशनने भरविलेला हा पहिला शिक्षण-वर्ग आणि त्याची ही तऱ्हा ! नवीन-नवीन खेळाडू शोधून त्यांच्या खेळांत शास्त्रीय वाढ करावयाची हा हेतू. ऑलिंपिक्समध्ये भारताने नावारूपाला यावे ही त्यामागील उदात्त प्रेरणा. पण कुणाचा पाठिंबाच नाही ! कुठे काही आर्थिक अडचण, रजेचा घोळ, कौटुंबिक कारणे पण काही सांगा तरी. तेही नाही.

जागतिक स्पर्धांचे महत्त्वच मुळी आमचे खेळाडू जाणत नाहीत. तितके मनावरही ते घेत नाहीत. तशी दूरदृष्टीही नाही. पण परदेशचा एखादा दौरा येऊ द्यात हेच ॲथलेटपटू उड्या मारावयास लागतील. नजीकचे भवितव्य ते लक्षात घेतील. मग गांभीर्याने जोरदार सराव करतील. पण शिक्षण म्हटले की नाव नको ! किंबहुना असे शिक्षण-वर्ग टाळण्याची वृत्तीच अधिक. कशाला मेंदूला त्रास घ्या ! आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात आपण दिव्यत्वाने चमकू ही प्रखर भावना निर्माण झाल्याखेरीज खेळाडू अंग मोडून क्रीडांगणावर धावणार नाहीत. तशी प्रेरक-शक्ती त्यांच्यांत रुजणे हीच आजची नितांत गरज आहे.

## ❑ शास्त्रशुद्ध अभ्यास

पुण्याच्या डेक्कन जिमखाना मैदानावर गेल्या मे महिन्याच्या ७ तारखेला पै. नरहरी चोरगे (आगरवाले व दरगा तालीम कसबा) आणि पै. विश्वनाथ चौधरी (सुभेदार वस्ताद तालीम, पुणे) या दोन कसदार पैलवानांत अत्यंत चुरशीची लढत झाली आणि सव्वीस मिनिटांच्या त्या जिवंत आणि जोमदार कुस्तीने २२,००० प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. त्यानंतर जून महिन्यात बिहार दुष्काळ निवारण निधीसाठी सुमारे ३५ छोट्या छोट्या कुस्त्या याच मैदानावर आयोजित केल्या होत्या. पण प्रेक्षक होते जेमतेम दीडहजार ! हे दृश्य काय सांगते ? पुणे राष्ट्रीय तालीम संघ यांपासून काही बोध घेईल काय ?

वृत्तपत्रांतून कुस्त्या वेळेवर सुरू होत नाहीत, जाहीर केलेल्या जोड्या लागत नाहीत आणि निकाली म्हणून पुकारलेल्या कुस्त्या ठराविक वेळ देऊनच ठेवलेल्या आढळतात अशी टीका सुरू झाल्यावर चालकांनी कंत्राटदारांवर त्या जबाबदारीचे खापर फोडले आणि तेवढ्यापुरते ते वादळ शमले.

परंतु जिथे नामांकित पहिलवान लढणार म्हटल्यावर हजारो शौकिन जमतात, तिथे हौशी शिकाऊ कुस्ती खेळणाऱ्याच्या जोड्या उभ्या राहू लागल्या तर गर्दी का होत नाही हा मुख्य प्रश्न आहे. कुस्तीगीर हा आता एकटा राहिलेला नाही. त्याच्यात काही कस निर्माण करावयाचा असेल, काही कर्तृत्व त्याच्यामधून ओसंडायाचे असेल तर त्याला आर्थिक साहाय्याची अत्यंत गरज आहे. आणि केवळ सरकार, तालमींच्या पाठिंब्यावर त्याला अवलंबून राहणे अशक्य आहे. रोजचा भरपूर आणि भारदस्त व्यायाम करावयाचा म्हटला तर त्याला महिना ३०० रुपयांची गरज आहे. म्हणूनच तालीम संघांनी कुस्ती-शौकिनांना विश्वासात घेतले पाहिजे. कंत्राटदारांनीही केवळ नफ्यावर दृष्टी न ठेवता तालीमपेशा कसा ऊर्जितावस्थेला येईल याचा काळजीपूर्वक अभ्यास करून आपल्याकडे जमा होणाऱ्या गंगाजळीचा ओघ मोठ्या प्रमाणात या कुस्तीगीरांकडे वाहवला पाहिजे. या आर्थिक साहाय्यानेच त्यांना प्रोत्साहन मिळणार आहे. त्यांची शरीरयष्टी गुटगुटीत होण्याला मदत होणार आहे. त्यामधूनच त्यांच्या कर्तृत्वशाली भवितव्याची मुहूर्तमेढ रोवली जाणार आहे. आणि या प्राचीन कलेचा खरा साक्षीदार सामान्य प्रेक्षक आहे. त्याला भव्य मैदानावर हातांत पैसे घेऊन जायची ओढ लागली पाहिजे. त्याला वारंवार दर्जेदार लढती पाहावयाला मिळणे जरूर आहे, नि त्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम वैचारिक पुण्याने पैलवान आणि प्रेक्षकांचे नाते जोडले पाहिजे. पुणे राष्ट्रीय तालीम संघ याचा खरोखरीच विचार करणार आहे काय ? ●

लंडन : ६५ वर्षांचे सुप्रसिद्ध नौकापटू सर फ्रॅन्सिस चिचेस्टर यांनी सुमारे तीस हजार मैलांचा जलप्रवास करून जगपर्यटन केले. नऊ महिने ते समुद्रात होते. २७ ऑगस्ट १९६६ ते २९ मे १९६७. इंग्लंडच्या राणीने आपल्या साऱ्या प्रथा मोडून या साहसवीराचा उघड्यावर येऊन मानसन्मान केला आणि 'सर' हा किताब त्यांना बहाल केला.

# भिंतीच्या तेंबड्या

सुधाकर राजे

## ☐ अल्लाच्या घरचे कॉन्व्हेन्ट स्कूल

पाकिस्तानची उत्पत्ती कशी झाली, हे बहुतेक सुशिक्षित माणसांना माहीत आहे. –पण पाकिस्तानची व्युत्पत्ती कशी झाली हे किती साक्षर लोकांना माहीत होते ? ऑक्सफर्ड डिक्शनरी या जगन्मान्य इंग्रजी शब्दकोशाने दिलेली ही व्युत्पत्ती नुकतीच आपल्या लोकसभेत गाजली– पी म्हणजे पंजाब, ए म्हणजे अफगाण सरहद्द, के म्हणजे काश्मीर, आणि इस्तान म्हणजे बलुचिस्तानातला मुसलमानव्याप्त प्रदेश. मिळून पाकिस्तान. आता बोला ! आतापर्यंत माझी आपली अशी जातीयवादी समजूत होती, की नापाक हिंदूंचा संसर्ग नको म्हणून पाक मुसलमानांनी स्थापलेले राज्य ते पाकिस्तान ! पाक म्हणजे पवित्र हा उर्दू शब्द अन् स्थान म्हणजे जागा हा संस्कृत शब्द अशा वर्णसंकरातून पाकिस्तानची व्युत्पत्ती झाली असे सांगणारे सांगतात. पण ऑक्सफर्डकारांना उर्दूही येत नसावे अन् संस्कृतही येत नसावे. तेव्हा सगळाच (अज्ञानातला) आनंद आहे !

पाकिस्तान हा उर्दू शब्द आहे, इंग्रजी नाही असे आपल्याकडचे शेंबडे पोरही सांगेल. पण ऑक्सफर्डकारांच्या मते म्हणूनच ते शेंबडे आहे. दुसरी गंमत म्हणजे पाकिस्तान आणि कुराण या दोन्हींत तोच क असला तरी इंग्रजी स्पेलिंग करताना पाकिस्तानातल्या कचा के होतो पण कुराणातल्या कचा क्यू कसा होतो हे एक अल्ला अन् दुसरे ऑक्सफर्ड साहेबच जाणोत.

पी म्हणजे पंजाब अन् के म्हणजे काश्मीर हा सरळ हिशेब झाला. पण पी म्हणजे प्लायमाऊथ का नाही ? अन् के म्हणजे कन्याकुमारी का नाही ? खरे म्हणजे जिना साहेबांनी के म्हणजे काश्मीर ते कन्याकुमारी असा दावा अगदी ऑक्सफर्ड साहेबाला साक्षी ठेवून केला असता तर झाले ते पाकिस्तान अन् उरले ते बाकिस्तान असा गोंधळच शिल्लक राहिला नसता. आता ए म्हणजे अफगाण सरहद्द हा शोध मात्र चविष्ट काबुली चण्याइतका मजेदार आहे. ए म्हणजे अफगाणिस्तान असा माझ्यासारख्याने भोळसट तर्क केला असता. पण तसे नाही महाराजा ! ए म्हणजे फक्त अफगाणिस्तानची सरहद्द– पुढे नाही. का ? अफगाणांनी आधी ब्रिटिशांना व मग पाकिस्तान्यांना बरीच धूळ चारलेली असल्याने ए चे स्पेलिंग बेटे सरहद्दीवरच थबकले असावे. बरे, अफगाण सरहद्दीलाच ए लागतो तर खुद्द अफगाणिस्तानाला काय लागणार ?–अर्थात् ए–वन् ! पण हे सांगायची जिगर

असलेला पाकिस्तानी पाणिनी अजून जन्माला आलेला नाही.

अन् शेवटी इस्तान. उत्तर प्रदेशांत कुठल्याही इस्कूलमध्ये जाणाऱ्या पोराने इस्तान चट्कन ओळखले असते. पण निरक्षर बलुचिस्तानात या अक्षर–वाङमयाचा अजून प्रसार झालेला नसल्याने इस्तान म्हणजे बलुचिस्तानातला प्रदेश अन् तोही नेमका मुसलमानव्याप्त असा थेट मराठी नवकाव्याला शोभणारा अर्थ ऑक्सफर्ड साहेबाने शोधून काढला. साहेबाचे डोके अती तल्लख यात शंकाच नाही; कारण इस्तान या अक्षरांपैकी नेमक्या कुठल्या अक्षरांत साहेबाला मुसलमान दिसला हे माझ्यासारख्या कल्पनादरिद्री माणसाला कधीच समजायचे नाही.

जाऊ द्या. एकूण पाकिस्तान हा अस्सल इंग्रजी शब्द असा तयार झाला हे वाचून शब्दसृष्टीच्या पाश्चिमात्त्य परमेश्वराच्या आद्य लीलेचे कौतुक वाटले. शिवाय इंडिया हे आपल्या देशाचे साहेबानेच ठेवलेले नाव कसे तयार झाले असेल, याचाही साक्षात्कार झाला. इन् म्हणजे अर्थात् इंग्लंड. म्हणजे वास्तविक पाहता इंग्लंड हा इंडियाचा प्रांत आहे. अन् डिया ? डिया म्हणजे सगळे अमेरिकन ख्रिस्ती. याला आधार काय ? उत्तर : आधार हवाच कशाला ? इस्तान म्हणजे बलुची मुसलमान असा अर्थ होऊ शकतो तर डिया म्हणजे अमरिकन ख्रिस्ती असा अर्थ व्हायला काहीच हरकत नाही.

## ☐ झिंज्या उपटण्याचे देशकार्य

जगात दुसऱ्याला टोपी घालून पैसे कमावणारी माणसे बरीच असतात. पण आपला हिंदुस्थान दुसऱ्याला टोप घालून पैसे कमावतो हे माहीत नव्हते. भारतीय माणसांच्या केसांपासून तयार केलेल्या टोपांची म्हणे परदेशांतल्या फॅशनेबल मंडळीत इतकी मागणी आहे की एक किलो टोपाच्या निर्यातीने जेवढे परकीय चलन आपल्या देशाला मिळते तेवढे एक किलो चांदी निर्यात करूनही मिळत नाही असे परवा वाचले. घ्या, म्हणजे आता दर डोई एक मत असे न म्हणता दर डोई निदान किलो-भर परकीय चलन असे म्हणायला पाहिजे. आणि आता हिंदुस्थानच्या भरभराटीची समस्याही सुटली अशी मला ‘ बालंबाल ’ खात्री वाटते. अहो, दर पंधरा दिवसांनी कोटी कोटी डोकी भादरण्यात आली तर परकीय चलनाचा अक्षरशः पाऊस पडेल. ते काही नाही, यापुढे प्रत्येक देशभक्त पुरुषाने केशवर्धिनी तेल वापरलेच पाहिजे अन् ठरलेल्या दिवशी सरकारी सलूनमध्ये न चुकता हजर झाले पाहिजे. आधुनिक बायकांची बॉबकटची फॅशन हा एक थिल्लरपणा नसून देशभक्तीचे ते एक 'शिरोधार्य' उदाहरण आहे हेही आता उघड आहे. मला वाटते ज्या मध्यमवर्गीय स्त्रियांना एवढी फॅशनेबल देशभक्ती पेलण्यासारखी नाही, त्यांनी चौकांतल्या नळावर एक-मेकींच्या झिंज्या उपटण्याचे देशकार्य तरी कटाक्षाने चालू ठेवावे, तेवढेच परकीय चलन. काय ?

●



# दक्षिणायन

द्रविड मुन्नेत्र कळघम ! ...या पक्षाचे नाव पूर्वी बाहेरच्या जगात विशेष परिचित नव्हते. हा एक ब्राह्मणेतर पक्ष आहे, एवढेच आम्हांला माहीत होते. ब्राह्मणेतर पक्ष म्हणजे एका दृष्टीने नकारात्मक कार्य करणारा पक्ष ! त्याने काँग्रेस-सारख्या अखिल भारतीय पक्षाचा चेंदामेंदा केला आणि कामराज किंवा सुब्रह्मण्यम-सारखे रथी-महारथी भुईसपाट केले. या घटनेने आम्ही स्तिमित झालो होतो. या पक्षाची विचारसरणी मद्रदेशीय समाज जीवनात खोल रुजलेली आहे हे उघड होते. त्या पक्षाचा अभ्यास करण्याची त्यामुळेच आम्हांला जरुरी भासली.

'द्रविड मुन्नेत्र कळघम' हे रामस्वामी नायक्करांच्या द्रविड कळघमचे अपत्य आहे. मद्रास प्रांतात १९२० पूर्वी राजकीय कार्य करणाऱ्या 'जस्टिस पार्टीशी' या पक्षाचे नाते आहे. याच संदर्भात डी. एम. के. चा इतिहास तपासून बघायला हवा.

आमचे सारे जीवन पुण्यात गेलेले आहे. महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाशी आम्ही चांगले परिचित आहोत. त्याबद्दलच्या काही आठवणीही आम्ही ऐकल्या आहेत. साधारणपणे सत्तावीस-अठ्ठावीस साली पुण्यात ब्राह्मण-ब्राह्मणेतरांमधील तेढ फार विकोपाला गेली होती. प्रत्यक्ष मारामाऱ्या कधी झाल्या नाहीत; परंतु वातावरण त्या विषाने भरलेले असे. गणपतीच्या दिवसांत 'छत्रपती मेळा' जेधे मॅन्शनमधून निघे. त्यातील 'आला छत्रपती मेळा। भटांनो पळा पळा आता।' हे पद त्या वेळी मनाचा थरकाप करीत असे. पुण्यापेक्षाही सातारा-कोल्हापूर या भागांत त्या चळवळीचे स्वरूप जास्त हिंस्र होते. सत्यशोधकी तमाशे त्या वेळी गावोगाव हिंडत आणि केशवपीत ब्राह्मण स्त्रियांची सोंगे काढून प्रचार करीत. 'शेटजी आणि भटजी' हे दोन वर्ग समाजाचे शत्रू आहेत, असे त्या वेळी उघड उघड

द्र वि ड मु न्ने त्र क ळ घ म

# नवी विटी नवे राज्य

श्री. ज. जोशी ❦ विद्याधर पुंडलीक

## ८

बोलले जाई. शेटजींना या चळवळीची झळ विशेष लागू शकली नाही. परंतु बऱ्याचशा भटजींची मात्र खेड्यापाड्यांतून हकालपट्टी झाली. पुरोहित वर्गाचे माहात्म्य नष्ट करण्यासाठी त्या वेळी 'सत्यशोधकी लग्ने' या नावाचा लग्न-प्रकार अस्तित्वात आला होता. वधू-वरांचे हातात हात द्यायचे आणि उपस्थितांनी टाळ्या वाजवायच्या, एवढाच विधी त्या लग्नात असे. वैदिक मंत्रांना आणि उपचारांना सर्वस्वी फाटा द्यावा, असा आग्रह असे.

महाराष्ट्रातील ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद इतका चेतण्यास सामाजिक कारणे तशीच होती. तेव्हा बहुतेक सर्व सरकारी नोकऱ्या आणि अधिकाराच्या जागा ब्राह्मण-वर्गाने व्यापलेल्या असत. शिक्षण क्षेत्र तर त्या जातीचे राखीव कुरणच होते. राजकारण, समाजकारण, वृत्तपत्रीय व्यवसाय, इत्यादी सर्व ठिकाणच्या मानाच्या जागांवर ब्राह्मणच असत. ब्राह्मणेतर वर्गास मोलमजुरी करण्याशिवाय तेव्हा गत्यंतर नव्हते. त्यांच्या सर्व वाटा रोखलेल्या होत्या. या दोन वर्गांच्या संस्कृतीत त्या वेळी जमीन–अस्मानाचा फरक होता. त्यामुळेच ब्राह्मणेतर वर्गाला ब्राह्मणांविषयी द्वेष आणि मत्सर वाटणे साहजिक होते. या द्वेषातून महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ पोसली गेली. आणि फक्त तीस–चाळीस वर्षांत मोक्याच्या जागांवरून ब्राह्मण लोक हळूहळू कमी होत गेले.

मद्रासकडे जाताना पुण्यातील आणि महाराष्ट्रातील ब्राह्मण–ब्राह्मणेतर चळवळीचा हा इतिहास आमच्या मनात घोळत होता. अनेक विचार आणि प्रश्न निर्माण होत होते. हिंदू समाजाच्या त्या वेळच्या परिस्थितीत ब्राह्मण–ब्राह्मणेतर चळवळीची निर्मिती नैसर्गिक होती, असे आमचे मत आहे. त्या चळवळीशिवाय बहुजन समाजाची प्रगती झाली नसती, हे स्पष्ट आहे. एखाद्या मोठ्या चळवळीत काही वेडे-वाकडे अन् विकृत प्रसंग घडतात, परंतु त्यांचा बाऊ प्रमाणाबाहेर करण्यात किंवा डांगोरा पिटण्यात अर्थ नाही. ज्या वेळी एखादा वर्ग समाजात सर्व प्रकारच्या जागा

अडवून बसतो, त्या वेळी त्या वर्गाला या ना त्या उपायांनी खाली खेचणे हे इतर समाजांचे कर्तव्य ठरते.

महाराष्ट्रातील चळवळीप्रमाणेच मद्रासमध्येही चळवळ झाली. महाराष्ट्रात ब्राह्मणांप्रमाणेच शहाण्णव कुळी मराठे हेही तितकेच तुल्यबल होते. मराठ्यांनी तर येथे राज्यच केलेले होते. त्यामुळे त्यांना ती परंपरा होती. परंतु मद्रदेशात तसे काही नव्हते. तेथील ब्राह्मणेतर समाजात स्वतंत्र क्षत्रित जात नाही. तिच्या राजकीय स्वामित्वाची परंपरा तामिळनाडच्या अलीकडच्या इतिहासात नाही. त्यामुळे तेथील चळवळीस फार लवकर धार चढली. मद्रदेशातील ब्राह्मण—ब्राह्मणेतर प्रश्न त्यामुळेच जास्त ज्वलंत आहे.

"ब्राह्मणवर्ग हा द्रविडीस्तानात मूळचा नव्हताच; किंबहुना चातुर्वर्ण्यावर आधारलेली समाजरचना आमच्याकडे नव्हतीच. द्राविडी समाजात पूर्वी सात निरनिराळे वर्ग होते. परंतु जाती नव्हत्या. उत्तरेकडून आर्यांचे द्रविडीस्तानात आगमन झाल्यावर आर्य ब्राह्मणांनी चातुर्वर्ण्य व्यवस्था येथे निर्माण केली. आणि ब्राह्मण वर्ग उदयास आला. त्या काळापासूनच पुरोहित वर्गाचे माहात्म्य आमच्या समाजजीवनात अपरंपार वाढले. त्यांनी कर्मकांडाचा आणि पोथीनिष्ठेचा प्रचार केला आणि स्वतःचा वर्ग इतर समाजांपासून अलग काढून कायम सोवळ्यात ठेवला," असा तामीळ इतिहासकारांचा दावा आहे. ब्रिटिशांनी मद्रास प्रांत जिंकल्यावर ब्राह्मण वर्गाने नवयुगाचे पाणी जोखले आणि इंग्लिश भाषेत प्रावीण्य मिळविले. त्यामुळे शिक्षण, नोकऱ्या आणि राजसत्तेतही त्याला महत्त्वाचे स्थान मिळाले. जन्मजात मोठेपणा, कर्मठ धर्मनिष्ठ ब्राह्मण आणि बडा सरकारी नोकर, या तिन्ही भूमिका ब्राह्मण वर्गातच एकवटल्या गेल्या.

ब्राह्मण वर्गाच्या या माहात्म्यामुळे ब्राह्मणेतर वर्गाच्या मनात किल्मिष निर्माण होणे अगदी साहजिक होते. आणि त्यामुळेच दक्षिण भारतातील कित्येक भागांत ब्राह्मणाचे मुखावलोकन अशुभ समजण्यापर्यंत मजल गेली होती. ब्राह्मणाच्या दर्शनानंतर सचैल स्नान करण्याची प्रथा काही खेडेगावांत होती. 'परपाने नंबकुडटु' (ब्राह्मणावर विश्वास ठेवू नका) ही म्हण अजूनही प्रचारात आहे. ब्राह्मण्याचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी मद्रास प्रांतात चौदा सालापासून चळवळी सुरू झाल्या.

डॉ. नरेश मुदलियार यांनी त्या साली ब्राह्मणेतर मुलांसाठी 'द्रविडीयन होम' या नावाचे एक वसतिगृह काढले. ते फक्त दोनच वर्षे चालले. परंतु राजकीय सत्ता मिळवण्यासाठी 'द्रविडीयन असोसिएशन' या नावाच्या संस्थेचा जन्म येथून झाला. ब्रिटिश राज्यान्तर्गत ब्राह्मणेतरांचे द्रविडीस्तान मिळविणे हा त्या संस्थेचा हेतू होता. एकोणीसशे सोळा साली जस्टिस पक्ष स्थापन झाला. तामीळ भाषेतील 'द्रविडन' नावाचे दैनिक त्याच साली निघाले व चळवळीस खरी खरी सुरुवात झाली. जस्टिस पक्षाने एक मॅनिफेस्टो तेव्हा प्रसिद्ध केला. ब्राह्मणेतरांचे

ब्राह्मणांशी प्रमाण १:२२ असे आहे आणि शूद्रांचे ब्राह्मणांशी प्रमाण १:५ आहे. तरीही ब्राह्मण जातीस नोकऱ्या बहुसंख्येने मिळतात म्हणून त्यात तक्रार केली होती. ब्रिटिश सरकारविषयी राजनिष्ठा प्रकट करताना म्हटले होते, " We are not infavour of any measure which is designed to undermine the influence & authority of the British rulers, who alone in the present circumstances of India, are able to hold the scales even, between creed and class. "

जस्टिस पक्ष हा बोलून चालून रावसाहेब, रावबहादुरांचा पक्ष होता. त्याला मद्रासच्या बहुजन समाजात खोल स्थान नव्हते. त्या पक्षाचे महत्त्व हळहळू अगदीच संपुष्टात आले. त्याच सुमारास रामस्वामी नायक्कर यांचा मद्रासच्या राजकारणात उदय झाला आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीत एक नवे पर्व सुरू झाले.

रामस्वामी नायक्करांची आयुष्यातील ऐंशी वर्षे उलटलेली आहेत तरीही त्यांचा उत्साह दुर्दम्य आहे. आम्ही तिघांनी त्यांना भेटण्याचा फार प्रयत्न केला. दूरध्वनीच्या मार्गदर्शिकेत नायक्करांचे नाव नाही. याचे आश्चर्य वाटून कानिटकरांनी इन्क्वायरीला विचारले, " रामस्वामी नायक्करांचा नंबर काय ? "

पलीकडून मंजुळ आवाजांत प्रश्न आला, " कोण रामस्वामी नायक्कर ?"

कानिटकर उसळून म्हणाले, " तुम्हांला माहीत नाही ? . . . रामस्वामी नायक्कर. . . द्रविड कझगमचे पुढारी ! "

तिकडून गंमतीदार हास्य आले. " ओ ऽऽऽ आय सी ऽऽ — यू वॉन्ट (Periyar) —पेरीयार. " परंतु ते फिरतीला गेले असल्याने भेट झाली नाही.

रामस्वामी यांचे नाव जेव्हा जेव्हा उच्चारले गेले तेव्हा तेव्हा पेरीयार (मराठीत महर्षी ) हे उपपद लावले गेले आणि तसेच गंमतीदार हास्य ऐकू आले. नायक्करांच्या एकंदर व्यक्तिमत्त्वातच गम्मत किंवा मिस्किलपणा भरलेला असावा, असं आम्हांला वाटलं.आम्ही पुढे अनेकांजवळ चौकशी केली.आमचा समज अगदी खरा होता. या गृहस्थाला तांबडी दाढी आहे. पंचाहत्तराव्या वर्षी त्याने वीस–बावीस वर्षांच्या एका मुलीशी लग्न केले. गोड मिठाई खाण्याचा त्याला फार शौक आहे...अजूनही जिभेला ताळतंत्र माहीत नाही. अफाट कल्पना काढण्यात हा माणूस वाकबगार आहे. वाह्यात बोलण्यात याची जीभ प्रवीण आहे. 'तुम्हांला साप आणि ब्राह्मण हे दोघे एकदम भेटले, तर सापाशी मैत्री करा आणि ब्राह्मणाला ठार मारा' हे त्यांचे नमुन्याचे वाक्य !... द्रविडीस्तान स्थापन करण्यासाठी त्याने पूर्वी बॅरिस्टर जीनांशी हातमिळवणी केली होती. काँग्रेसचे राज्य मुंबई किंवा दिल्ली या 'परदेशीय' शहरांतून चालवले जाते ही त्याची मुख्य तक्रार होती. ब्रिटिश लोक येथून निघून गेल्यावर द्रविडीयन जनता 'परदेशीय' आर्यन गुंडांच्या तावडीत सापडेल,

या भीतीने हा गृहस्थ अस्वस्थ होता....सत्तेचाळीस साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याने राष्ट्रीय ध्वजास प्रणाम करण्यास विरोध दर्शविला. गणपतीच्या मूर्ती फोडण्याचे, रामायण आणि महाभारत जाळण्याचे, भारताचा अशोक-चक्रांकित ध्वज आणि नकाशा फाडून टाकण्याचे जाहीर कार्यक्रम याने किती वेळा केले, याची मोजदाद करणे कठीण आहे.

## 'भटांचा नाश' हेच ब्रीदवाक्य

नायक्कर यांचे सर्वच व्यक्तिमत्त्व गमतीदार आहे. तेराव्या वर्षी पहिले लग्न झाले. पण एकोणिसाव्या वर्षी संन्यास घेतला आणि सर्व भारतभर भ्रमण केले. वीस साली काँग्रेसच्या चळवळीत भाग घेतला. परंतु पंचवीस सालापासून त्यांनी काँग्रेसशी फारकत घेतली. 'Self–respect Movement' सुरू केली. आणि लग्नसमारंभातून पुरोहित वर्गाचे उच्चाटन करण्याचा प्रचार केला. हिंदी भाषेला त्यांचा सक्त विरोध आहे. पंचेचाळीस साली त्यांनी 'द्रविड कझगम' हा पक्ष काढला. काळ्या निशाणावर मध्य भागी लाल वर्तुळ असलेला त्यांचा ध्वज आहे, उत्तर भारतीयांनी तामीळनाडची जी पिळवणूक चालवलेली आहे त्याच्या निषेधार्थ कझगमचे स्वयंसेवक काळा पोशाख करतात. सामाजिक बाबतीत ते पुरोगामी आहेत. पक्षसदस्याला कपाळावर भस्म किंवा गंध लावण्याची परवानगी नाही. विधवा विवाह आणि आंतरजातीय विवाह यांचा ते पुरस्कार करतात.

गेल्या दोन निवडणुकांत त्यांनी काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिला. कामराज नाडर हे अब्राह्मण पुढारी आहेत. त्यांचा विजय होणे महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. "कोणत्याही उपायाने भटशाहीचा नाश करणे हे आमचे ब्रीद आहे. कामराजांमुळे ब्राह्मण वर्ग सत्तेपासून दूर ठेवला जाईल," असे नायक्करांच्या एका अनुयायाने आम्हांस सांगितले. "भटांचा नायनाट करण्यासाठी सैतानाशी मैत्री करणेदेखील चूक नाही" असेही तो म्हणाला.

रामस्वामी नायक्कर आणि मद्रासमधील ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ यांबद्दल या साऱ्या गोष्टी ऐकताना, कळत नकळत महाराष्ट्रातील ब्राह्मण–ब्राह्मणेतर चळवळींशी या चळवळीचे कुठे साम्य आहे, कुठे विरोध आहे याचा शोध आमचे मन घेतच होते. त्या दृष्टीनेही आम्ही काही काही प्रश्न विचारले. त्यांची जी उत्तरे मिळाली त्यांवरून थोडयाफार गोष्टी आमच्या ध्यानात आल्या.

महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीबरोबरच दोन गोष्टी दिसतात. पहिली लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, रानडे, आगरकर, सावरकर, माटे–इत्यादींनी विज्ञाननिष्ठ अशी बुद्धिवादाची परंपरा महाराष्ट्रात रुजविली. पश्चिमेचे विज्ञान आणि बुद्धिवाद या प्रेरणा घेऊन मद्रासमध्ये अशा प्रकारचा समाजविचार निर्माण झालेला दिसत नाही. उलट मद्रासमधील पुढारलेला वर्ग धर्माच्या बाबतीत कमा-

लीचा परंपरानिष्ठच राहिला. दुसरी गोष्ट, महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा ही जीवननिष्ठा मानून, त्यासाठी अनेक चळवळी आणि संस्था निर्माण करणारे ज्योतिबा फुले, महर्षी कर्वे आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांसारखे कर्ते समाजसुधारक निर्माण झाले. ब्राह्मण–ब्राह्मणेतर चळवळीतसुद्धा नकारात्मक आणि निषधात्मक भागाबरोबरच, एका विधायक भागाचाही पुरस्कार आपल्याकडे झाला. ज्ञान आणि शिक्षण ही साधने बहुजनसमाजापर्यंत पोहोचवून त्याद्वारे समसंधी निर्माण करून, समाजरचना बदलून पाहणारे शाहू छत्रपती, आंबेडकर आणि भाऊराव पाटील आपल्याकडे झाले. तामीळनाडमध्येही ब्राह्मणेतरांनी शिक्षण–संस्था काढल्या; पण त्यामागे इतकी विधायक आणि इतकी अखंड निष्ठा नव्हती. विज्ञाननिष्ठ बुद्धिवाद आणि सामाजिक सुधारणांबरोबरच आपल्या पुढाऱ्यांनी अखिल भारतीय अशा राष्ट्रवादी चळवळीतही महाराष्ट्राला भिजवत ठेवले. त्यामुळे महाराष्ट्रातल्या कट्टरांतील कट्टर ब्राह्मणाला किंवा ब्राह्मणेतराला भारतापासून फुटून निघण्याची कल्पनाही कधी शिवणार नाही.

याउलट तामीळनाडमध्ये उत्तर–विरोध, हिंदी आणि संस्कृत विरोध, आर्य–विरोध, ब्राह्मण–विरोध अशा सर्व विरोधात्मक गोष्टीच तेवढ्या एकवटल्या. सबंध चळवळीचा मोहराच त्यामुळे फिरला आणि त्यांतून " A Hindu in the present concept may be a Dravidian but a Dravidian *cannot* and *shall not* be a Hindu. " या थरापर्यंत विचार ताणले गेले.

याउलट आपल्या ब्राह्मणेतर चळवळींत निरीश्वरवाद तत्त्व म्हणून किंवा आचार म्हणून आला नाही. ब्राह्मणांच्या शंकराचार्यपीठासारखेच क्षात्र जगद्‌गुरूंचे पीठ कोल्हापूरला आले! मद्रासमधील ब्राह्मणेतर चळवळीत अशा प्रकारचे अनुकरण झाले नाही. त्या चळवळीतील निरीश्वरवाद किती खोल आहे याबद्दल शंका आहे पण तो सांगितला गेला याला महत्त्व आहे. अगदी अलीकडे, नेडूनजेनियन् हे शिक्षणमंत्री एका देवळात गेले होते. तेथे त्यांनी देवाचा भस्म–प्रसाद नाकारला. त्याची कारणे त्यांनी वेगळी दिली तरी (ती पुढे दिली आहेत.) असे कृत्य करण्याइतके सार्वजनिक धैर्य त्यांनी दाखविले हे विशेष. नाहीतर एरवी मुखाने निधर्मीपणाचा घोष करायचा पण निवडणूक आली की देवीसमोर नारळ फोडून दंडवत घालावयाचा असले विसंगत प्रकार आपल्याकडे चालतातच की! मद्रासमधील ब्राह्मण–ब्राह्मणेतर चळवळीचा आणखी एक विशेष असा की ती आपल्यापेक्षा अधिक एकसंध होती. आंबेडकरांमुळे आणि इतर कारणांमुळे मराठे–महार असा संघर्ष आपल्याकडे झाला. अजूनही तो आहे. मद्रासमध्ये परिहा आणि पापानार आपल्याकडील अस्पृश्यांहून कमी जागरूक असल्यामुळे की काय, त्यांच्या जातीचा सवता-सुभा निर्माण झाला नाही. तिकडच्या ब्राह्मणेतरांनी अस्पृश्यांबरोबरचा आपला सांधा इतका आणि असा खिळखिळा होऊ दिलेला दिसत नाही.

द्रविड कझगमचे महत्त्व स्वातंत्र्यानंतर कमी होत गेले. दैनिक 'दिनमणी'चे संपादक त्याबाबत म्हणाले, "स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचना झाली. नेहरूंनी दक्षिण प्रांतांचा एक गट करण्याचेदेखील कबूल केले होते. परंतु कर्नाटक, आंध्र, मल्याळम इत्यादी प्रांतांचे त्याबाबत एकमत झाले नाही. शिवाय, कामराजांच्या आधिपत्याखाली राज्याचे तामिळीकरण झपाट्याने झाले. मंत्रिमंडळात आता एकही ब्राह्मण नाही. अशा अवस्थेत नायक्करांच्या पक्षाचे कार्य संपुष्टात येणे साहजिक आहे."

स्वातंत्र्यप्राप्तीबद्दल आनंद व्यक्त न करणे आणि राष्ट्रीय निशाण जाळणे, या गोष्टी अण्णा दुराई, संपत वगैरे अनुयायांना आवडल्या नाहीत. नायक्करांनी वृद्धावस्थेत लग्न केल्याची गोष्टही त्यांना खटकली. पक्षात त्यामुळेच फाटाफूट झाली व १९४९ साली द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रविडीयन प्रोग्रेसिव्ह फेडरेशन) ची स्थापना झाली.

## संघटनेचा मजबूत पाया

द्रविड कझगमची संघटना विशेष मजबूत नव्हती. नायक्करांचा तो एकखांबी तंबू होता. डी. एम. के. ने मात्र संघटनेत बांधेसूदपणा आणण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक शहरातून वॉर्ड कमिटी आणि खेड्यांतून व्हिलेज कमिटीचे जाळे गुंफले. या कमिटीमध्ये कमीत कमी पंचवीस लोक असलेच पाहिजेत, असा दंडक आहे. साठ सालीच अशा तीन हजार कमिट्या होत्या. आज त्यांची संख्या किती तरी अधिक आहे पक्षाच्या प्राथमिक सभासदांची संख्या अडीच लाखावर आहे. शिवाय तालुका आणि जिल्हा या पातळीवरही पक्षाने अशाच प्रातिनिधिक संस्था काढल्या आहेत. द्रविड मुन्नेत्र कळघम्च्या संघटनेबद्दल भक्तवत्सलम् आम्हांला म्हणाले,–" आम्ही जनतेपासून फार लांब गेलेलो आहोत. आम्ही आमचा दरबार बनविलेला आहे. या उलट डी. एम. के. चे कार्यकर्ते प्रत्येक घराघरांत पोचले आहेत."

भक्तवत्सलम यांच्या बोलण्याची प्रचीती आम्हांला जागोजागी दिसून आली. द्रविड मुन्नेत्र कळघमची संघटना कम्युनिस्ट किंवा जनसंघ यांच्या तोडीची आहे की नाही हे फार जवळून पाहिल्याशिवाय सांगता येणार नाही. (बहुधा ती इतकी सर्वंकष नसावी.) पण हा पक्ष सामान्य लोकांचा आहे–गरीब आणि दलित जनतेत तो प्रिय आहे याची चिन्हे आम्हांला वारंवार दिसली. मद्रासमधील गलिच्छ वस्तीतील घराघरांवर, महाबलिपुरम्च्या वाटेवरील झोपड्याझोपड्यांतील हॉटेल्सवर परिहा आणि पापातार या अस्पृश्यांच्या घरांवर डी.एम. के. चे काळे–तांबडे निशाण फडकताना आम्हांला दिसले. काळा रंग म्हणजे अंधार. तांबडा रंग पहाटेच्या प्रकाशाचा–क्रांतीचा !

बांधकाम खात्याचे मंत्री करुणानिधी हे या पक्षाचे पहिल्या प्रतीचे संघटक आहेत.

संघटना, प्रचार, पक्ष साहित्याचे प्रकाशन, पैसा आणि हिशेब पक्षाच्या या खात्यांवर त्यांचे बरेचसे वर्चस्व असावे, असे दिसते. निवडणुकीतील प्रचार-सभेत हा नेता अक्षरशः झोळी घेऊन हिंडे. म्हणे, "आमचा पक्ष गरीबांचा आहे. काँग्रेससारखे गबर धनिक आमच्या मागे नाहीत. पक्षाची पै-पै आम्ही गरीबांकडून जमविली आहे. आमच्या करुणानिधींनी तर झोळी फिरवून निवडणुकीसाठी अकरा लाख रुपये जमविले," असे 'मूरशोली' दैनिकाच्या उपसंपादकाने आम्हांला मोठ्या अभिमानाने सांगितले. सिनेमांतून येणाऱ्या पैशाचे काय असा अडचणीचा प्रश्न आम्ही त्याला अर्थातच विचारला नाही! कारण डी. एम्. के. आणि सिनेमा धंदा यांचे नातेगोते आहे!

करुणानिधी हे एक उत्तम नटही आहेत. त्यांच्या वागण्या-बोलण्यात तो नाटकीपणा दिसतो. त्यांची लोकप्रियताही अफाट असावी. मैलापुरम विभागात त्यांचे प्रशस्त घर आहे. तेथे आम्ही गेलो होतो; तेव्हा घराला जत्रेचे स्वरूप आले होते. आत शिरकाव करण्यासही जागा नव्हती. आम्ही कसेबसे वर गेलो. तेव्हा, छानदार उत्तरीय पांघरलेले देखण्या चेहऱ्याचे करुणानिधी दिसले. भिंतीवर मातोश्रींचे चित्र होते, आणि त्याच्यावर 'समय सोन्यासारखा आहे आणि कर्तव्य डोळ्यासारखे आहे' ही तामीळ म्हण लावलेली होती. तेथेच 'मूरशोली' (Sound of the drum) या त्यांच्या दैनिकाचे उपसंपादक भेटले. आमच्याशी थोडे बोलून करुणानिधी बाहेर जाण्यासाठी खाली उतरले तेव्हा कित्येक लोक त्यांना स्वतःची गाऱ्हाणी सांगत होते आणि ते शांतपणे ऐकून घेत होते. तेवढ्या गडबडीतही त्यांनी एका लहान मुलाला उचलून घेतले आणि "तुझी काही तक्रार आहे का?" म्हणून विचारले. सदतीस साली महाराष्ट्रात काँग्रेस मंत्रिमंडळे आली, त्या वेळची आम्हांला आठवण झाली. त्या वेळी मंत्र्यांभोवती अशीच गर्दी जमत असे. तेच दृश्य आता मद्रासमध्ये दिसत आहे.

द्रविड कझगम यांच्या मागे फक्त श्रीमंत वर्गातील ब्राह्मणेतरच होते. डी. एम. के. ने नाडर, मारावर किंवा आदि-द्रवीड या लोकांचाही पाठिंबा मिळविला. पक्षाचे बहुतेक कार्यकर्ते आणि स्वयंसेवक कनिष्ठ मध्यमवर्गातील किंवा कामगारवर्गातील आहेत. डी. एम. के. या पक्षाच्या संघटनेतील आणखी महत्त्वाचा विशेष म्हणजे या पक्षाची विद्यार्थी-फळी. बिहार, बंगाल आणि यू. पी. या राज्यांतही विद्यार्थ्यांनी अलीकडच्या राजकारणात भाग घेतलेला होता. पण तामीळमधील विद्यार्थ्यांची दबाव-शक्ती ही त्यांच्यापेक्षा जास्त दिसते. मद्रासमधील काही काही महाविद्यालयांतून द्रविड मुन्नेत्र कळघमचा फार जोर आहे. (काँग्रेसचे केंद्र असलेले असे एकही कॉलेज नाही.) इतकेच नव्हे तर तामिळीकरण, शिक्षणाचे माध्यम, राष्ट्रभाषा या सर्वांबाबत इतर कोणत्याही राज्यांतील विद्यार्थ्यांपेक्षा तामीळनाडमधील विद्यार्थी जास्त जागरूक दिसले. नुकताच विद्यार्थ्यांच्या प्रातिनिधिक संघटनांचा उटकमंडला एक मेळावा भरविण्यात आला. भारतातील पंधरा भाषांना सरकारी

भाषा म्हणून लोकसभेतील-दर्जा दिला गेला पाहिजे, अशीही गर्जना या मेळाव्यात केली गेली. खुद्द अण्णा दुराई या मेळाव्यात उपस्थित होते. त्यांनी जरी विद्यार्थ्यांना याबाबत सबुरीचा सल्ला दिला असला तरी राज्याच्या मुख्य मंत्र्याला विद्यार्थ्यांच्या चळवळीची दखल घ्यावी लागते आहे, यातच द्रविड मुन्नेत्र कळघममधील विद्यार्थी-फळीचे सामर्थ्य दिसून येते. या फळीत कम्युनिस्टही घुसले असण्याचा संभव आहे.

द्रविड मुन्नेत्र कळघममध्ये अर्थातच कोणीही महत्त्वाचा ब्राह्मण नेता नाही. पक्षाच्या विधानसभेतील १२५ सभासदांपैकी आणि लोकसभेतील २५ सभासदांपैकी एकही ब्राह्मण नाही. याबाबत " तुम्ही ब्राह्मणवर्गापैकी कोणाला तिकिट का दिले नाही ?" असा प्रश्न शिक्षणमंत्री नडूंनजेनियन यांना विचारल्यावर, ते क्षणभर अस्वस्थ झाल्यासारखे दिसले. पण क्षणभरच ! लागलीच हसून आणि आपल्या खाजगी चिटणीसांकडे एक मुत्सद्दी कटाक्ष टाकून ते म्हणाले– " एखाद्या ब्राह्मण कार्यकर्त्याने असे तिकीट मागितले असते तर ते आम्ही जरूर दिले असते. बरे, पण तुमच्या महाराष्ट्रात काँग्रेसने किती ब्राह्मणांना तिकिटे दिली ?"

त्यांचा हा प्रश्न एकदम आणि अनपेक्षित होता. आम्ही एकमेकांकडे जरा गोरे-मोरे होऊन पाहिले. श्री. ज. जोशींनी तेवढ्यात प्रसंगावधानाने सांगितले–

" नक्की आकडा आम्हांला माहीत नाही. पण तो थोडा आहे. पण आमच्याकडील ब्राह्मण वर्ग राजकारणाबाबत उदासीनच आहे. "

तेच औदासीन्य इथेही आहे. इकडील सुशिक्षित ब्राह्मणवर्गाला उत्तरेकडील नोकऱ्यांचाकऱ्यामध्ये जास्त रस आहे. आमचाही नाइलाज होतो, त्यामुळे म्हणून आमच्यापुरते आम्ही एवढेच पाहिले की राजाजींच्या स्वतंत्र पक्षात आणि इतर पक्षांत तरी काही ब्राह्मण आहेत ना ? आमच्या पक्षात नसले तरी आमच्या युनायटेड फ्रंटमध्ये काही ब्राह्मण आहेत ना ? (That is alright) बस्स ! –

' That is alright ' हे किती समर्थ शब्द आहेत, हे आम्हांला त्या क्षणी चटकन कळले !

याच संदर्भात ब्राह्मण नसले तरी सुशिक्षित ब्राह्मणेतर वर्गापैकी तरी कितीजण द्रविड मुन्नेत्र कळघममध्ये भाग घेतात हे समजून घेण्याच्या दृष्टीने आम्ही मद्रास विद्यापीठातील श्रीमती चंद्रा मुदलीयार यांना काही प्रश्न विचारले. मुख्यतः प्राध्यापक वर्गाची द्रविड मुन्नेत्र कळघमबद्दल काय प्रतिक्रिया आहे ? या आमच्या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या– " सगळीकडे आहे तेच इथेही आहे. हा वर्ग राजकारणापासून तसा फटकूनच वागतो. पण निरनिराळ्या महाविद्यालयांतील काही ब्राह्मणेत्तर प्राध्यापकांना द्रविड मुन्नेत्र कळघमबद्दल खूप सहानुभूती आहे. त्यांपैकी प्रत्यक्ष कार्यकर्त्यांचा वर्ग थोडा असला तरी ही सहानुभूती सार्वत्रिक आहे. निदान या पक्षाला एकदा चांगली संधी दिली पाहिजे, असे आमच्यापैकी कितीतरी जणांना वाटते !"

द्रविड मुन्नेत्र कळघमच्या पक्ष-संघटनेचे स्वरूप हे असे आहे.

ते कसेही असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे. या पक्षाचे सारे भवितव्य आणि आजचे बळ श्री. अण्णादुराई यांच्या नेतृत्वात आहे.

कनिष्ठ मध्यम वर्गातील मुदलियार जातीत जन्मलेले, ५८ वर्षांचे अण्णा दुराई हे अर्थशास्त्राचे एम्. ए. आहेत. विद्यार्थिदशेपासूनच आंतरजातीय विवाह आणि अस्पृश्यता–निर्मूलन या सामाजिक सुधारणांचा त्यांनी पुरस्कार केलेला होता, तीच स्फूर्ती घेऊन ते जस्टिस पक्षात शिरले. पण ब्रिटिश सरकारने दिलेल्या पदव्यांचा त्याग करण्याचे या पक्षातील सभासदांनी नाकारल्यावर त्यांनी हा पक्ष सोडला. हिंदी–विरोधी चळवळीत १९३७ ते १९३९ या काळात तीन वेळा तुरुंगवास सोसलेला हा एका वेळचा तरुण शिक्षक पुढे साहजिकच रामस्वामी नायक्करांना जाऊन मिळाला. पण वर सांगितलेल्या कारणांमुळे त्यांनी द्रविड कळघम पक्ष सोडला.

## बहुजन समाजाचा नेता

भक्तवत्सलम् यांच्यापासून ते थेट गलिच्छ वस्तीतील सामान्य माणसापर्यंत सर्वांच्या आदराला पात्र झालेल्या अण्णादुराईंचा अभिजात तामीळ साहित्याचा कसलेला व्यासंग मोठा आहे. ते एक दांडगे लेखक आणि झुंजार पत्रकार आहेत. सात तामीळ चित्रकथा, अर्थशास्त्रासकट आणखी बरीच पुस्तके, एक तामीळ आणि एक इंग्रजी अशा वर्तमानपत्राचे दीर्घकाळ संपादन हा त्यांच्या साहित्यसेवेचा प्रपंच आहे.

साऱ्या भारतवर्षाचे लक्ष वेधून घेणाऱ्या या अस्सल तामिळी नेत्याची भेटगाठ व्हावी म्हणून आम्ही खूप प्रयत्न केले. एक–दोनदा सचिवालयात गेलो तर त्यांच्या खोलीबाहेरच्या 'कॉरिडॉर्समध्ये' ५०–६० माणसांचा क्यू होता. ( "हसतमुखाने कॉरिडॉरमधील ही गर्दी कमी करा," असा सल्ला राजगोपालाचारींनी त्यांना दिला होता.) शेवटी तो नाद सोडून त्यांचे एक तरी व्याख्यान ऐकायचेच असा निर्णय आम्ही घेतला. कारण त्यांच्या वक्तृत्वाबद्दलही खूपच ऐकले होते. "लाखालाखांच्या सभा अण्णा दोन-दोन तास नुसत्या झुलवत ठेवतात–" "To see him is to love him" असे उद्गार त्यांच्या भेटेल त्या अनुयायांकडून आमच्या कानांवर आले होते.

आणि हा योग लवकरच आला. कुटुंबनियोजन परिषदेच्या उद्घाटनाच्या प्रसंगी अगदी जवळून आम्ही त्यांचे भाषण ऐकले. त्यांचा वेष अगदी साधा. धोतर, पांढरा कुडता अन् खांद्यावर टॉवेल असा होता. काळा रंग, एक-दोन दिवसांची दाढी, तोंड पानाने रंगलेले, तपकिरीच्या व्यसनाच्या नाकाजवळील खुणा–असे त्यांचे व्यक्तित्त्व होते. मध्यम उंचीचा, थोडाफार स्थूलच असा हा गृहस्थ खराखुरा बहुजन समाजाचा नेता होता हे पाच मिनिटांतच आम्हांला कळून आले. लोक खुषीत होते.

सारखे टाळ्या देत होते–हसत होते. आम्ही शेजारच्या दुभाष्याला त्यांच्या बोलण्याचा आशय विचारला,–" रामाला दोनच मुले होती...भगवान शंकरालाही दोन मुले आहेत...एकूण दोन हा आकडा देवांनाही प्रिय आहे. कमी मुले असणारे देवमाणसांहून किती शहाणे होते–हे लक्षात घ्या. मुला-मुलींना लैंगिक शिक्षण जरूर दिले पाहिजे. मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वीस ठेवायला हरकत नाही. पण त्यासाठी विधायक सामाजिक संस्थांनी एक वातावरण निर्माण केले पाहिजे. "–

मध्येच कोणीतरी श्रोता ओरडला–" तुम्ही पगार केव्हा घेणार ?" (पहिले काही महिने मद्रासच्या मंत्र्यांनी तांदूळ स्वस्त केल्याखेरीज पगार घ्यायचा नाही असे ठरविले होते). अण्णादुराईंनी आपला हात तडफेने हवेत फेकला आणि ते गरजले–" तुमचे जेवण हाच माझा पगार ! तुम्ही ज्या क्षणी तृप्तीची ढेकर द्याल; त्याच वेळी मी माझा पगार घेईन !" अन् या वाक्याबरोबर त्या प्रचंड सभेचा एकदम समुद्र झाला, आणि मग द्रविड मुन्नेत्र कळघमचा जो जयघोष झाला तोसुद्धा समुद्राच्या फुसांडत्या लाटांच्या गर्जनांप्रमाणे !–

या सभेनंतर आम्ही एक ठरविले–रोज 'हिंदू' आणि अन्य तामीळ वर्तमानपत्रांतून अण्णादुराई काय म्हणताहेत हे कधी चुकवायचे नाही. त्या सर्व वृत्तांतून आणि लोकांच्या बोलण्यांतून अण्णा दुराईंचे नेता, म्हणून एक पुसट चित्र आमच्या डोळ्यांपुढे उभे राहिले. इतर कोणत्याही द्रविड मुन्नेत्र कळघमच्या नेत्यांपेक्षा ते राष्ट्रीय बाण्याचे आहेत. पण उत्तर–दक्षिणेतील सांधा म्हणून त्यांच्याकडे आशेने बघावे, इतक्या बावनकशी राष्ट्रीयतेचे ते प्रतीकही वाटत नाहीत. राजगोपालाचारींसारख्या 'ब्राह्मणाचा' त्यांनी घेतलेला आशीर्वाद, 'कामराज आमचेही नेते आहेत' असे सांगून त्यांच्या प्रतिमेचे त्यांनी केलेले अनावरण, के. रामन यांच्यासारख्या जस्टिस पार्टीच्या ब्रिटिशधार्जिण्या कार्यकर्त्याची 'त्यांच्याइतकाच जस्टिस पक्षावर माझाही प्रेमाचा हक्क आहे' असे म्हणून केलेली भलावण–या सगळ्यांत कुठेतरी यशवंतराव चव्हाणांचा 'टच' आहे असे आम्हांला वाटले. पक्षातील विद्यार्थी–वर्गाला ते चुचकारतात पण वेळ आली तर फटकारूही शकतात. करुणानिधींसारख्या महत्त्वाकांक्षी सहकाऱ्याला त्यांच्या इच्छेविरुद्ध जाऊन गृहमंत्रिपद नाकारण्याइतके ते कणखरही आहेत. तसेच केंद्र–सरकार, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्ष, स्वतःच्या पक्षातील कडवे तामीळवादी अनुयायी, राजाजी या सर्वांशी वेगवेगळ्या पातळ्यांवरून आणि पवित्र्यांनिशी वागण्याइतके ते लवचिकही आहेत. एकूण तामीनाडमधील येत्या दशकातील राजकारणाला निर्णायक कलाटणी देण्याचे सामर्थ्य या नेत्यात आहे, यात शंका नाही. मद्रास विद्यापीठातील एक प्राध्यापक अण्णादुराई यांच्याविषयी एकच वाक्य बोलला –'Mark this leader, of the south.' (अपूर्ण)

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
**सायनाचार्य, नासिक**

२२ ते २८ जुलै १९६७

**मेष** : शनि–मंगळांच्या कोंडीत आपण सापडला आहात–ती कोंडी फोडून पार होण्याचे सामर्थ्य तुमच्यात निश्चितच आहे. पण त्यासाठी निर्धाराचे खड्ग आपणांस हाती धरणे भाग आहे. या आठवड्यातच ते महान् कार्य आपण करून दाखवणार आहात.

दि. २५ च्या गुरु–शनी त्रिकोणा-पासून स्फूर्ती घेऊन आपण धीराने पुढे निघालात तर यश तुमच्या मागे धावत येईल.

दि. २५ ते २७ या काली आपल्या जीवनाला एक वेगळेच वळण लागेल आणि त्यामुळेच तुमच्याकडे पाहण्याचा जगाचा दृष्टिकोन बदलून जाईल.

दि. २३–२५–२७ विशेष अनुकूल दिवस.

**वृषभ** : सूर्य पराक्रमस्थानी आला आणि त्या क्षणापासूनच तुमचे नष्टचर्य संपले. आता तुमच्या कर्तृत्वाला दाही दिशा मोकळ्या आहेत.

हा आठवडा खूपच घाईगर्दीचा–धाव-पळीचा जाणवेल. अनेक प्रश्न सोडवावे लागतील, राष्ट्रीय कार्यक्रमात हिरीरीने भाग घ्यावा लागेल. नेत्रदीपक यश संपादण्यासाठी समर्थांचे सहकार्य घ्यावे लागेल. आणि या साऱ्या गोष्टींत आपण या वेळी खात्रीने यशस्वी होणार आहात.

अचाट कर्तृत्वाबरोबरच ईश्वरी कृपे-

चाही या वेळी साक्षात्कार घडून यायला लागेल. आपले कोणतेही कार्यक्षेत्र असो त्यात आपण अनन्यसाधारण यश संपादू शकाल.

दि. २३–२५–२८ नोंद करण्यासारखा काळ.

**मिथुन :** मिथुन राशीच्या व्यक्तींना आता कुणाचीही डर नाही. कोणत्याही गोष्टीबद्दल विवंचना वाटू शकणार नाही. सारे काही अपेक्षेप्रमाणे आणि झटपट घडून यायला लागेल.

गेल्या ५–६ महिन्यांतील तुमच्या स्थगित कार्यांना या आठवड्यापासूनच गती मिळू लागेल.

साहित्य-प्रकाशन, वृत्तपत्रीय क्षेत्रातील व्यक्तींना तर हा काल अपेक्षासाफल्याचा ठरावा. या वेळच्या गुरु–शनी त्रिकोणासारखा योग पुन्हा तुमच्या हयातीत होणे कठीण. (६० वर्षांनीच असे योग अंतारिक्षात घडून येत असतात.) जीवनात जे काही भव्यदिव्य करावयाचे असेल ते याच मुहूर्तावर करून घ्या. पुढे अशी संधी लाभणार नाही.

दि. २५ ते २८ सर्वांगाने अनुकूल काल.

**कर्क :** गुरू प्रथमस्थानी, शनी भाग्यात. अशी संधी एकदाच–फक्त एकदाच–येत असते. त्या वेळी त्या संधीची दखल घेतली नाहीत तर ती पुन्हा दिसणार नाही.

चौथ्या मंगळाकडे सध्या तरी आपण दुर्लक्ष करू शकता. तोही तुमचा रस्ता रोखण्याचे धाडस करू शकणार नाही.

या आठवड्यापासून नवे कार्यक्रम हाती घेण्यात येतील आणि ते यशस्वी करण्यासाठी आपण अटोकाट प्रयत्न करू लागाल.

या कालात प्रत्यक्ष सांपत्तिक लाभ जरी मोठ्या प्रमाणावर झाला नाही तरी नजीकच्या भविष्यकालात घडून येणाऱ्या भव्य दिव्य घटना याच वेळी अंकुरायला लागतील.

दि. २४–२६–२८ या काळाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**सिंह :** एकटा पराक्रमस्थ मंगळ तुमच्या साऱ्या विवंचना मिटवून प्रसन्न व यशस्वी वातावरण निर्माण करण्यास समर्थ आहे. अशा मंगळापुढे सारेच ग्रह टरकतात ! या आठवड्यात अनेक वेळा दूरचे प्रवास घडतील. सामाजिक व राजकीय समस्या सोडविण्यात सिंहाचा वाटा तुम्हांलाच उचलावा लागेल.

यांत्रिक–तांत्रिक व्यावसायिकांना तर हा पराक्रमस्थ मंगळ अपेक्षेबाहेर यश देऊन जाईल.

नव्या व्यवसायाचा आराखडा तयार होईल, विज्ञानाच्या क्षेत्रातही भरीव कार्य करण्याची संधी लाभेल. स्थावराच्या अपेक्षा सफल होतील, वाहनांची अनुकूलताही लाभेल.

दि. २३ ते २६ या वेळी आपल्या अनेक कार्यांना चालना मिळेल.

**कन्या :** या वेळी तरी निदान कन्याराशीसारखी भाग्यवान माणसे क्वचितच पाहावयास मिळतील.

अंतरिक्षातील मोठ्यात मोठे तेजोगोल ( सूर्य व गुरू ) सध्या तुमच्या लाभस्थानी आलेले आहेत. त्यांच्या मोठेपणाला साजेल असा मोठा लाभ पदरी टाकल्याशिवाय ते कसे राहतील.

शिवाय गुरु–शनी त्रिकोणही तुमचे चारित्र्य अधिकाधिक उज्ज्वल करण्यास सतत झटत आहे.

या कालाचा आपण अधिकाधिक लाभ उठवलात तर तुमची सारी हयात उजळून निघेल. अधिकार, संपत्ती, प्रतिष्ठा आणि सांसारिक स्वास्थ्य यांपैकी काहीही—सारेही—कदाचित आपणांस लाभू शकेल.

दि. २३–२५–२७ या काली अपेक्षित घटना घडून याव्यात.

**तूळ :** तुमच्या भाग्यस्थानापासून लाभस्थानापर्यंत अनेक तेजस्वी ग्रहांची मालिकाच पसरलेली आहे, असे दृश्य पुन्हा बारा–पंधरा वर्षे तरी तुम्हांला पाहायला मिळणार नाही. म्हणूनच मला आपणांस असे आवर्जून सांगावेसे वाटते की, या वेळी तुमच्या कर्तृत्वाला दाही दिशा मोकळ्या आहेत. कुठेही गेलात काहीही केलेत तरी तिथे तुमचा सत्कार घडेल. अपेक्षेबाहेर यश पदरी पडेल.

कित्येक दिवसांनी ग्रहांचे हे दुर्मीळ वरदान आपणांस लाभलेले आहे. आता रेंगाळत राहणे, माघार घेणे हे विचारही करण्याचे कारण नाही.

कला–साहित्य क्षेत्रात, विज्ञान-संशोधन विभागात तुमचा बहुमान होईल. सांपत्तिक योगही सुधारू लागतील.

दि. २४–२६–२८ सर्व दृष्टीने अनुकूल काल.

**वृश्चिक :** आपणांस ग्रहमान अनुकूल आहेच. थोडेफार डागळले आहे. बाराव्या मंगळामुळेच. पण त्या अनिष्ट मंगळाची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. तुमच्या दैनंदिन व्यवहारात ढवळाढवळ करण्याचा तर त्याला यत्किंचितही अधिकार नाही.

व्यापारी व्यवहारात नोकरी–धंद्यात थोडेफार खटकल्यासारखे वाटले तरी ही अनिष्टता दीर्घकाल टिकू शकणार नाही. भाग्यस्थ गुरूच्या रूपाने परमेश्वर आपल्या पाठीशी उभा आहे, असा साक्षात्कार क्षणोक्षणी घडून यायला लागेल.

शेतीच्या व्यवहारात बरीच सुधारणा घडेल, औद्योगिक क्रांतीलाही चालना मिळेल.

दि. २३–२५–२८ विशेष अनुकूल दिवस.

**धनू :** आजवर प्रतिकूल ग्रहस्थितीचे तडाखे आपण पुष्कळ सहन केलेत, आता ते

वातावरण निश्चितच निवळत असल्याचा प्रत्यय यायला लागेल. नोकरी–धंद्यांतील पेचप्रसंग सुटायला लागतील, तुम्हांला अनेकांचे हार्दिक साहाय्य लाभू लागेल.

दि. २५ जुलैच्या गुरु–शनी त्रिकोण योगापासून परिस्थिती झपाट्याने पालटत आहे, असा अनुभव यऊ लागेल. कधी न होणारी कामे झटपट उरकली जाऊ लागतील, पैसाही हाती पुरेसा खेळू लागेल.

सांसारिक आपदा आणि विवंचना दूर व्हायला लागतील, भविष्यकालिन प्रगतीची प्रसादचिन्हे दिसायला लागतील.

दि. २३ ते २६ विशेष अनुकूल दिवस.

**मकर** : कित्येक दिवसांपासून सुरू असलेली तुमची प्रगतीची घोडदौड याही कालात निर्वेधपणे सुरू राहील. एकटा दशमातील मंगळही तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध करायला समर्थ आहे. या वेळी जगाने हेवा करण्यासारखे यश तुम्हांला मिळेल. मुख्यत: न्याय, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र यात तुम्ही सदैव आघाडीवर राहाल. या वेळी आपणांस अनेक कामे झटपट उरकावी लागतील. क्षणाची उसंत मिळणार नाही की, काडीचे स्वास्थ्यही नाही. असा काल असूनही तुमचे आंतरिक हेतू निश्चितच सफल होतील. स्थावराचा प्रश्न मिटेल. वाहनाची विवंचनाही अल्पावधीत दूर होईल.

दि. २५ ते २८ स्मरणात राहण्यासारखे दिवस.

**कुंभ** : मंगळ भाग्यस्थानात आल्यापासूनच तुम्हांला यशस्वी व सुखासमाधानाचे दिवस दिसू लागले असावेत आणि या वेळी तर गुरु–शनी त्रिकोणासारखा सहसा लवकर कधी न घडणारा योग तुमच्या वाट्यास आला आहे. क्षणार्धात तुमच्या साऱ्या अनिष्टतेवर पडदा पडेल आणि उज्ज्वल यशाचा व निर्भेळ सुखाचा काल अनुभवण्यास मिळेल. आता अपयशाची धास्ती नाही व विवंचनाही कधी तुमच्या मनाला शिवणार नाही. रंजक व आकर्षक लेखन घडेल. उद्योगधंद्यात नवी भर पडेल. आणि पैशाअडक्याची विवंचनाही बऱ्याच प्रमाणांत सुटेल.

दि. २५ ते २८ या कालावर सर्व लक्ष केंद्रित करा.

**मीन** : या आठवड्याचे बदललेले ग्रहमान आपणांस काहीसे स्वास्थ्याचे व अनुकूलतेचे जाणवेलही. पण मंगळ अष्टमस्थानी असल्यामुळे ज्या एका विशिष्ट गोष्टीबद्दल आपण मनाशी खूणगाठ बांधून आहात, ती गोष्ट घडून यायला अजून बराच काल आपणांस वाट बघावी लागणार आहे. भावी प्रगतीच्या आशा निर्माण होऊ लागतील आणि अपेक्षांप्रमाणे सर्व काही घडण्याची खात्रीसुद्धा वाटू लागेल. या वेळी दूरचा प्रवास करणे इष्ट नाही व जबाबदाऱ्या वाढवून घेणे सुखाचे ठरणार नाही. सामाजिक व राजकीय वातावरणापासून चार हात दूरच राहणे इष्ट ठरेल.

दि. २२, २४, २८ या कालात आपले प्रयत्न यशस्वी ठरतील. ●

साप्ताहिक 'माणूस'

वार्षिक वर्गणी रुपये वीस

• •

१०० रुपये पाठवून
पाच वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

• •

२०० रुपये पाठवून
दहा वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

**राजा शिवछत्रपति**


सप्रेम भेट.

• •

सप्रेम भेट योजना : १५ ऑगस्ट १९६७ पर्यंत

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ. पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**